# नारायण दीक्षित पाटणकर.

चरित्र लेखक

वामन बाळकृष्ण दीक्षित.

# नारायण दीक्षित पाटणकर.

चरित्रकार—

वामन बाळकृष्ण दीक्षित.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. )

सन १९२५.

प्रकाशक—
वामन बाळकृष्ण दीक्षित,
कायगांव-पोष्ट टोका, जि. अहमदनगर.

मुद्रक—
विनायक बाळकृष्ण परांजपे,
नेटिव ओपिनियन प्रेस,
गिरगांव, मुंबई.

# चरित्रकाराचे दोन शब्द.

कोणाचेंहि चरित्र लिहावयाचें ह्मणजे त्या पुरुषाच्या रोजनिशा, जमाखर्च, पत्रव्यवहार, आख्यायिका वगैरेंवर त्याची रचना बरीच करावयाची असते. पूर्वीचें कालीं आपलेकडे रोजनिशा ठेवण्याची वहिवाट नव्हती. ज्या कालीं राजकीय किंवा कर्त्या पुरुषांची ही स्थिती, तेव्हां नारायण दीक्षितांसारख्या साधु पुरुषासंबंधीं बोलावयासच नको.

आमचे चरित्रनायक कोकणांतून देशांत आल्यानंतर सुमारें चाळीस वर्षांचा त्यांचा काल स्नानसंध्या व ईश्वरार्चनांतच गेला. ते सातान्यास येऊन राहिल्यानंतर व पुढें औरंगजेब बादशहाची आणि बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची भेट झाल्यानंतरचा काल त्यांचे साधुत्वाचे प्रसिद्धीचा. हा काल ह्मणजे शके १६२६ पासून तों १६५६ पर्यंत तीस वर्षांचा. ह्या कालांतील जमाखर्च आणि पत्रव्यवहार उपलब्ध व्हावा, असें लेखकास वाटलें, पण तो कांहींच उपलब्ध नाहीं. शके १६५६ पासून पुढील १४ वर्षांचा काल त्यांचे काशीवासाचा. तात्पर्य दीक्षितांची परिस्थिती केवळ तपस्वी वृत्तीची असून ज्येष्ट पुत्र वासुदेव दीक्षित हे अज्ञानावस्थेंत होते. तेव्हां त्या वेळचा फारसा संग्रह नसणें ही सहाजिक आहे. वासुदेव दीक्षितांचे सज्ञानपणापासूनचा संग्रह सांपडावयास पाहिजे होता व तो सर्व संग्रह सातारें येथें होता; पण तो कालचक्राचे तडाख्यांत चाई, उधईचें भक्षस्थानीं पडला आणि अशी नासधूस झालेली दोन तीन पल्ले रद्दी औरंगाबाद येथील हलवायास विकल्याचें सांगतात. वासुदेव दीक्षितांचे ज्येष्ठ चिरंजीव शके १७०९ सालीं निपुत्रिक वारल्यानंतर त्यांचे घरीं ५० वर्षें बायकांचा कारभार, आणि घराण्यांत भाऊबंदकी सुरू झाल्यामुळें एकमेकांवर अविश्वास झाला. त्यामुळें सातारें येथील दप्तरांपैकीं नासधूस झालेले दप्तरांची वर सांगितलेंप्रमाणें व्यवस्था लागली. त्यांतून जीं कांहीं कागदपत्रें राहिलीं तीं हल्लीं उपलब्ध आहेत. आतां काशी येथील दप्तरांची खरी काय स्थिति झाली, हें समजण्यास मार्ग नाहीं. पानपतचे संग्रामानंतर पेशव्यांचे आश्रित बाळकृष्ण दीक्षित यांस काशी सोडण्याचा प्रसंग आला, त्यामुळें पुढें पुष्कळ दिवस काशीस कारकुनामार्फत देखरेख होती. त्यांत बहुतेक इस्टेटीची विल्हेवाट लागली. राहिलेल्या इस्टेटीची व्यवस्था, या घराण्यांतील परशुराम दीक्षित तेथें राहून पाहूं लागले.

ते व त्यांचे चिरंजीव दोघेही कालवश झाल्यानंतर सून अन्नपूर्णाबाई मागें होत्या. त्यांचे बंधु पुरुषोत्तमपंत कारभार पहात होते. बाईचें हयातींतच मोठा वाडा सावकाराजवळ गहाण पडला व इतर वाडे वगैरे विकले गेले. तेथील पुस्तकें आणि दप्तरें यांची काय व्यवस्था झाली, तें ईश्वर जाणें. पुढें यज्ञेश्वर दीक्षित स्वतः काशीस गेले व त्यांनीं कागदपत्रांसंबंधीं पुष्कळ चौकशी केली पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

सारांश लेखनास पोषक असे कागदपत्र मला फारच थोडे सांपडले. श्री त्र्यंबकेश्वर येथील लेख, बाजीराव, चिमाजी आपा, बाळाजी बाजीराव, रघुनाथ बाजीराव यांची व इतर सरदारांची दीक्षित घराण्यास आलेलीं पत्रें व दीक्षितांनीं पेशव्यांस लिहिलेलीं दोन पत्रें, शिवाय वासुदेव दीक्षित व बाळकृष्ण दीक्षित यांचीं पत्रें आणि सनदा, एवढाच काय तो मुख्य आणि कागदोपत्रीं पुरावा आज सांपडला आहे. येणेंप्रमाणें अगदीं तुटक कागदांवरून व घराण्यांत प्रचलित असलेल्या कांहीं आख्यायिकांवरून नारायण दीक्षितांचें हें अल्प चरित्र मी लिहिलें आहे. पुढें कोणी विस्तृत चरित्र लिहिल्यास व त्याला या चूर्णिकेचा उपयोग झाल्यास सदहु लेखक आपल्या अल्प श्रमांचें चीज झालें असें समजेल.

जो कांहीं पत्रव्यवहार व जमाखर्च चरित्रनायकांचें इतस्ततः वंशस्थांचे घरोघर होता तो सर्व कै० यज्ञेश्वर बाळकृष्ण दीक्षित यांनीं मोठे प्रयत्नानें संग्रहित करून व तो सालवार लावून त्यावरून एक शकावली तयार केली होती, तिचा हें चरित्र लिहिण्यास फार उपयोग झाला.

येथें हेंही सांगणें जरूर आहे, कीं हें चरित्र लिहिण्याबद्दल लेखकास मूळ प्रेरणा कै० यज्ञेश्वर दीक्षित यांचीच होती. वर सांगितलेल्या साधनांची सर्वपरी जुळवाजुळवही त्यांनीं केली होती. परंतु लेखकाचें कमनशिबानें सदर चरित्र प्रसिद्ध होण्याचा योग त्यांचे हयातींत आला नाहीं, याबद्दल मला फार दिलगिरी वाटते.

हल्लींचें दीक्षित घराण्यांतील मुख्य श्री. सरदार केशव जगन्नाथ दीक्षित व श्री. गंगाधर यज्ञेश्वर दीक्षित यांनीं चरित्रप्रकाशनास उत्साहपूर्वक साह्य केलें, नाहीं तर आज हें चरित्र तसेंच दप्तरीं राहिलें असतें; तेव्हां त्याबद्दलही मी त्यांचा फार आभारी आहें.

विजया दशमी शके १८४६
मुक्काम कायगांव.

**वामन बाळकृष्ण दीक्षित.**

# प्रस्तावना.

कावगांवकर दीक्षित पाटणकर यांचें घराणें महाराष्ट्रांत सर्वविश्रुत आहे. त्या घराण्याचे संस्थापक परमपूज्य सत्पुरुष नारायण दीक्षित यांचें हें लहानसें चरित्र वाचकांचे हातीं देण्यास मला मोठा संतोष वाटतो. त्यांचे प्रस्तुत वंशज श्रीमंत गंगाधर यज्ञेश्वर ऊर्फ तात्या साहेब दीक्षित यांनीं हें चरित्र आस्थापूर्वक लिहवून त्यास प्रस्तावना लिहिण्याची मला सूचना केली, हा माझा जो त्यांहीं गौरव केला त्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें. वास्तविक या पुस्तकास माझ्या प्रस्तावनेची जरूरच नाहीं. तथापि इतिहास लेखनाचें काम एकदां स्वीकारल्यावर त्या विषयास पोषक अशीं जितकीं अंगें प्रकाशित होतील, तितकीं राष्ट्रास पाहिजेच आहेत, असें समजून, मी हा लहानसा प्रस्तावलेख लिहीत आहे.

पूर्वजांचे स्मरण सदैव जागृत ठेविण्याची इच्छा सर्व राष्ट्रांत आहेच, परंतु दररोज ब्रह्मयज्ञ करण्याचा नियम आह्मांस प्राचीन ऋषींनीं सांगून पूर्वजांचें स्मरण आपल्या धर्माचरणांतच गोवून दिलें आहे. कोणत्याही राष्ट्राचा इतिहास केवळ एका व्यक्तीकडून बनत नसतो. एखादा कल्पक पुढारी राष्ट्रास नवीन उद्योग दाखवील, परंतु तो तडीस नेण्यास सर्व लोक उत्साहानें साह्य करतात, तेव्हांच राज्यासारखीं जोखमाचीं कामें सिद्धीस जातात. शिवछत्रपतींनीं मराठ्यांचें राज्य स्थापिलें आणि पुढें पेशव्यांनीं त्याचा फैलाव केला, त्या कामीं अनेक जातींचे व अनेक पेशांचे लोक आपापल्या शक्ती-प्रमाणें मनोभावें सामील झाले, ह्मणूनच मराठी राष्ट्राचा इतिहास बनला, आणि आज त्याबद्दल अभिमान बाळगण्यास आपणास जागा

झाली. सामान्यतः बाजीरावादि कित्येक प्रमुख पेशव्यांची व शिंदे होळकरादि थोड्याबहुत सरदारांचीं नांवें व त्यांचीं कांहीं तुटक कृत्यें एवढींच आज पावेतों आपल्या परिचयाचीं होतीं; परंतु गेल्या पन्नास वर्षांत इतिहास संशोधनाकडे विद्वानांचें लक्ष जाऊन नाना प्रकारचीं बहुमोल व प्रचंड ऐतिहासिक सामुग्री बाहेर आली आहे व येत आहे, तिच्यायोगानें सतराव्या व अठराव्या शतकांतील मराठ्यांचे उद्योग सुसंगत रीतीनें जुळवितां येतात. त्यावेळच्या नानाविध मंडळींचे कष्ट, त्यांची राष्ट्रसेवा, त्यांचे पराक्रम व स्वार्थत्याग हे सर्व उपलब्ध पुराव्यानिशीं बाहेर आले तरच आपला इतिहास परिपूर्ण होत जाईल. नुसत्या समरांगणावर लढणाऱ्या फौजांनींच मराठ्यांचें राज्य उभारलें गेलें, असा समज असेल तर तो बरोबर नाहीं. लहानसें घर बांधण्यास सुद्धां किती लोकांची मदत लागते हें ध्यानांत आणिलें ह्मणजे, राज्यरूपी इमारत उभारण्यास असंख्य लोकांचें साह्य निरनिराळ्या दिशेनें झालें असलें पाहिजे. शिपायांनीं लढाया मारिल्या; व्यापाऱ्यांनीं फौजांबरोबर संचार करून पैसा व सामान पुरविलें; वकिलांनीं व कारभाऱ्यांनीं वाटाघाटी करून तह व करार ठरविले; लेखकांनीं बातमी पत्रें लिहून ठिकठिकाणच्या हकिकती जिकडच्या तिकडे पोंचविल्या; हिशेबनिसांनी व मामलतदारांनीं वसुलाची तजवीज केली; कारागिरांनीं इमारती, सडका, कोट वगैरे बांधिले; परक्या ठिकाणीं राज्यकारभार सुरू होतांच न्यायाचीं व इतर खातीं निर्माण झालीं. पण अशा सर्व बाह्य कामांबरोबरच विद्वानांनीं, साधूंनीं व सत्पुरुषांनीं ठिकठिकाणीं मंदिरें, अन्नछत्रें, पाठशाळा वगैरे स्थापून मराठ्यांचे राजनीतीसंबंधानें उच्च संस्कृतीच्या भावना लोकांत उत्पन्न केल्या. हे मराठे आपल्या कल्याणाकरितां आले आहेत, आपला धर्म रक्षण करण्याकरितां आले आहेत, अशी तिकडील जनतेची मनोभूमिका या मंडळींनीं आपल्या सत्कृत्यांनीं, आपल्या

औदार्यानें व सदाचरणानें तयार केली. अशा उद्योगानें महाराष्ट्राचें जीवन विस्तृत होऊन, त्याचें महत्तर राष्ट्र बनलें. हल्लीं उत्तर हिंदुस्थानांत सर्व मोठमोठ्या ठिकाणीं महाराष्ट्रीयांच्या बऱ्याच मोठ्या वसाहती दिसतात, त्यांची उत्पत्ति दीक्षितांसारख्यांच्या उद्योगापासून, एकाच्या अनुषंगानें दुसरा, अशा रीतीनें झालेली आहे. असा दृष्टिआड चालणारा व्याप ज्या पुरुषांनीं उरकला त्यांत पाटणकर दीक्षितांचें घराणें तीन पिढ्यापावेतों उत्तरेंत प्रमुख होतें. नारायण दीक्षित हे विद्वान व देशकालज्ञ सत्पुरुष मराठशाहीच्या तत्कालीन उद्योगांत पूर्णपणें समरस झाले होते. नानाप्रकारचीं सत्कृत्यें करून त्यांनीं दक्षिणोत्तर देशांत अपूर्व लौकिक संपादिला. विशेषतः काशी क्षेत्रांत दाक्षिणात्यांचे नांव चिरस्थायी होण्यास ते कारण झाले, हें या चरित्रग्रंथांतील मनोरंजक हकीकत वाचल्यानें कळून येईल. समर्थांनीं अशा कामगिरीचा समावेश युक्तींत केला आहे. ते सांगतात, ' शक्तीनें मिळती राज्यें, युक्तीनें यत्न होतसे । शक्ति युक्ती जिये ठायीं, तेथें श्रीमंत नांदती ॥ याच दृष्टीनें ब्रह्मेंद्रस्वामी व नारायण दीक्षित यांचा उल्लेख एके ठिकाणीं मी केला होता. बाकी त्या संबंधानें उभयतांतील भेद पृ. ५३ वर चरित्रकारांनीं दाखविलेला मला मान्य आहे.

नारायण दीक्षितांची जन्मतिथि उपलब्ध झाल्याचें दिसत नाहीं. परंतु शके १५७१ कार्तिक व० ८ इं० ता० १७।११।१६४९ रोजीं नासिकच्या तीर्थोपाध्यांस त्यांनीं स्वदस्तुरचा लेख लिहून दिला, त्यावेळीं त्यांचे वय किमान पक्ष पंधरा वर्षांचें धरलें तर शके १६७० कार्तिक शु० १४ इं० ता० २४।१०।१७४८ रोजीं त्यांचा अंत झाला, तेव्हां त्यांची उमर शंभरांवर पंधरा वीस वर्षांची असली पाहिजे. मात्र शके १५७१ स विकृति संवत्सर नसून विरोधी आहे. दीक्षितांच्या हांत पुष्कळसे ऐतिहासिक कागद होते ते रा. राजवाड्यांनीं पूर्वीच

छापून प्रसिद्ध केले असून, त्यांच्या योगानें पानपतपूर्वकालच्या इतिहासास बरीचसी सुसंगति आली.

हल्लीं आपल्या इतिहाससंबंधानें समाजांत आस्था व जागृती जोरानें उत्पन्न होत आहे याची साक्ष हें पुस्तक देईल. असाच अभिमान ठिकठिकाणच्या ऐतिहासिक घराण्यांनीं धारण केल्यास, आपला राष्ट्रेतिहास लवकरच सर्वांग परिपूर्ण होईल अशी आशा वाटते. तशी स्फूर्ति या पुस्तकाच्या वाचनानें इतरांचे ठिकाणीं उत्पन्न होवो अशी प्रार्थना करून आणि पुनरपि श्रीमंत तात्या साहेबांचे आभार मानून मी हा लेख संपवितों.

बडोदें, ता. २४ फेब्रुवारी, स० १९२५

गो. स. सरदेसाई.

# नारायण दीक्षित पाटणकर यांचें चरित्र.

## पूर्वपीठिका.

कोणत्याहि सत्पुरुषाचें, साधूचें, अगर राजकारणी पुरुषाचें चरित्र अवलोकन केलें असतां, त्यांत त्याचें चरित्राची कांहीं तरी जाणीव त्याचे पूर्वीचें पिढींत दिसून यते; आणि परमेश्वरी योजनेला अनुसरूनच, कुलावरून मनुष्याचे शिलाची परिक्षा करावी, असें व्यवहारांत म्हणण्याचा परिपाठ पडला आहे. तदनुसार साधुवर्य श्री एकनाथ व श्री रामदास या प्रसिद्ध सत्पुरुषांच्या सप्रेम भगवद्भक्तीचें दिव्य तेज भानुदास आणि सूर्याजीपंत या पूर्वजांपासूनच वृद्धिंगत होऊं लागलें होतें. त्याचप्रमाणें आमच्या चरित्रनायकाचे पितामह हरिहर भट दीक्षित पाटणकर यांचे पासूनच भावी दृश्यमान होणारें भगवद्भक्तीचें बीज रुजलें होतें.

हरिहर भट, शांडिल्य गोत्री, ऋग्वेदी ब्राह्मण, रत्नागिरी नजीक खेड राहटागर येथें राहत असत. हे श्री परशुरामाचे अत्यंत प्रेमळ भक्त असून, त्यांनीं रत्नागिरीस, हल्लीं ज्या टेकडीवर पाटणकर घराण्याची वस्ती आहे त्या ठिकाणीं, श्री परशुरामाच्या मूर्ति स्थापन केल्या त्या अद्यापि आहेत. हरीहर भट हे उत्तम वैदिक व श्रौतस्मार्त कर्मनिष्ठ असून त्यांनीं सोमपूर्वक

---

१ दीक्षितांचे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील लेखांत " दीक्षित " असें लिहिलें आहे. ही गोष्ट वरील विधानाची सत्यता दाखवितें.

अग्निहोत्र घेतलें होतें. त्यांचें पुत्र गोविंद भट दीक्षित हेही पित्याप्रमाणेंच विद्वान असून त्यांची उपाध्धिकपणाची मोठी वृत्ती होती. ह्यांचें कुटुंबाचें नांव राधाबाई होतें. ह्यांस चार पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें होतीं. त्यांचीं अनुक्रमें, दादं भट, विष्णु भट, सदाशिव भट आणि चवथे चरित्र-नायक नारायण भट व कन्या वेणु आका, अशीं नांवें होतीं.

## बालपण आणि लग्न.

चरित्रनायक आठ वर्षांचें होतांच पित्यानें त्यांचा उपनयन संस्कार केला, आणि त्यांचा वेदाध्ययनादि विद्याव्यासंग सुरू झाला. नारायण भटांची बुद्धि अत्यंत तीव्र असल्यामुळें इतर सहाध्यायांपेक्षां त्यांस फारच थोडे परिश्रम करावे लागत. सोळासत्रा वर्षांचें वयांत त्यांचें सर्व वेदाध्ययन पूर्ण होऊन श्रौत व याज्ञीक यांतही त्यांनीं प्राविण्य संपादिलें. गोविंद भट घरचें खाऊनपिऊन सुखी, त्यांची वृत्ती मोठी व मुलगा विद्वान, ही सर्व अनुकूलता पाहून गांवांतिलच भिडे उपनांवाचे गृहस्थांची मुलगी नारायणास सांगून आली. त्यास गोविंद भटजींनीं रुकार दिला आणि सतरावें वर्षींच नारायण भट चतुर्भुज झाले.

## गृहत्याग.

गोविंद भट यांनीं, वडील पुत्र कर्ते व व्यवहारदक्ष झाले, असें जाणून, सर्व प्रपंचाचा भार त्यांचेवर सोंपविला होता; आणि आपण स्नानसंध्या व ईश्वराराधनेंत कालक्षेप करित असत. नारायण भट हे सर्वांत धाकटे असल्यामुळें मातापितरांचें त्यांजवर फार प्रेम होतें व बंधूही प्रापंचिक कामें होतां होईल तों त्यांस सांगत नसत. अर्थात त्यांचा काल त्यांचे आवडी-प्रमाणें स्नानसंध्या, ईश्वरार्चन, अध्ययन व वडिलांची शुश्रुषा यांतच जात असे; त्यामुळें भिक्षुकीसंबंधानें यजमानांची मनधरणी कशी करावी,

ह्याचा अनूभव त्यांस मुळींच नव्हता. याप्रमाणें त्यांची कालक्रमणा चालू असतां, एके दिवशीं गांवांत एका श्रीमंत यजमानाचें घरीं कोणी मृत झाल्या-वरून अंत्येष्ठि सांगण्याकरितां त्यांच्या घरचें पाचारण आलें. त्या वेळीं सर्व बंधू व वडील यांपैकीं कोणींच घरीं नव्हतें. एकटे नारायण भट घरीं होते. पण ते आपल्या देवतार्चनांत मग्न असल्यानें त्यांनीं सहजीं घरीं कोणीं नाहीं असें बोलावणेकऱ्यास सांगितलें. परंतु आलेल्या मनुष्यास नारायण भट हे उपाध्याचे चिरंजीव असून विद्वान आहेत हें माहित असल्यानें, त्यानें यजमानास खरी वस्तुस्थिती कळविली. अर्थात् यजमानास उपाध्याचे निगर्जीपणाचा मोठा राग येऊन त्यानें लागलींच दुसरे ब्राह्मणास बोलावून आपलें काम चाळवुन घेतलें. ज्येष्ठ बंधु दादं भट घरीं आल्यानंतर त्यांस वरील हकीकत समजली; तेव्हां उपाध्धिकपणाचे वृत्तीस हें वर्तन चांगलें नाहीं, हें मनांत येऊन त्यांस बंधुंचा फार राग आला; आणि ते त्यांस म्हणाले कीं—प्रपंच कांहीं माझा एकट्याचाच नाहीं. तुला मुळींच प्रपंचासंबंधीं नफानुकसान पाहण्यास नको, नुस्ती स्नानसंध्या व देवदेवतार्चन करित बसतोस; अशानें संसारगाडा कसा धकावा ? त्यास द्रव्यसाधन हें मूख्य आहे. स्नानसंध्याच करणें तर अरण्यांत जाऊन रहावें. या संसारांत दुसऱ्याचे जिवावर निरुद्योगी राहणें हें लाजिरवाणें आहे, वगैरे वगैरे. या प्रकारचें बंधूंचें भाषण ऐकल्यानंतर नारायण भटांनीं बंधूस साष्टांग नमस्कार घातला; व आपण माझे गुरु, आपले आज्ञेप्रमाणें मी जातो, असें सांगितलें. नंतर तीर्थरूपमातुश्रीस नमस्कार करून त्यांची जाण्यास आज्ञा मागितली; तेव्हां त्यांनीं न जाण्याबद्दल पुष्कळ प्रकारें उपदेश केला; आणि बंधू योग्य कारणाकरितां बोलले त्याचा राग मानूं नये, म्हणून परोपरीनें त्यांस सांगून पाहिलें. परंतु नारायण भटजींनीं एकच गोष्ट सांगितली, कीं दुसऱ्याचें जिवावर आयतें बसून खाण्यापेक्षां ब्राम्हणास भिक्षान्न

सेवन करून स्वदेहाचे सार्थकाचा मार्ग शोधणें हा मुख्य धर्म सांगितला आहे; परमेश्वरकृपेनें ही सोन्यासारखी संधी प्राप्त झाली आहे; तरी आपण कृपा करून मला आज्ञा दिलीच पाहिजे; शिवाय याउपर या गृहांत अन्न-ग्रहण न करण्याचा निश्चय केला असल्यानें कोणतेंही प्रकारें विकल्प मनांत न आणितां, तीन पुत्र आहेत, त्यांचेवर दृष्टि ठेऊन, आशिर्वादपूर्वक मला आज्ञा द्यावी. हें निर्वाणीचें भाषण ऐकून प्रेमातिशयानें मातापितरांस गहिंवर येऊन रडें कोसळलें. दोन घटकापर्यंत सर्वांचे व्यापार स्तब्ध राहिले. नारायण भट समोर तटस्थ उभे होते. मातुश्रीस तर देहभानही राहिलें नाहीं. अखेर वडिल ह्मणाले कीं—नारायणा, तूं ऐकतच नाहींस, जाण्याचा सारखा हट्ट धरून उभा आहेस, तेव्हां तुला काय म्हणावें ? बरें आमचें राहों; पण तुझें लग्न झालें आहे, त्या मुलीची वाट काय? नारायणानें उत्तर दिलें, कीं मीं अवलंबन केलेलें स्थितींत राहण्याची इच्छा असेल तर एका वस्त्रानिशीं तिनें मजबरोबर यावें. इतकें बोलून, पुन्हां मोहपाश अनावर न व्हावा म्हणून वडिलांचा वरील प्रश्न संमति-दाखल समजून मातापितरांस नमस्कार करून ते बाहेर पडले. पतिसहधर्म-चारिणी लक्ष्मीबाई तेव्हां वयानें फार तर पंधरासोळा वर्षांची असेल. परंतु कोणतेहि प्रकारचा किंतु मनांत न आणतां पतीचे वरील आज्ञेनुरूप फक्त मंगळसुत्र गळ्यांत ठेऊन बाकी अलंकार काढून तिनें ते सासूजवळ दिले; व सर्व वडील मंडळीस नमस्कार करून पतीसमागमेंच ती घराबाहेर पडली. वरील प्रकार चालू असतां बहीण वेणुआक्काचे—ही अपत्यहीन विधवा होती—मनांत विचाराचे तरंग चालु होते, कीं आपणास सर्व जन्म व्यर्थ घालविणें आहे; त्यापेक्षां नानाचे समागमांत तीर्थयात्रा करून देहाचें साफल्य तरी होईल. इतक्यांत भावजय निघाली असें पाहतांच आक्कानींहीं वडील व मातुश्रीस नानाबरोबर जाण्याची आज्ञा विचारिली.

ती गोष्ट उभयतां मातापितरांस पसंत पडून त्यांनीं आकास जाण्याची संमती दिली. मग आकाचे आनंदास काय पुसावें ! एकतर नानाचें व तिचें बालपणापासून प्रेम व दोघेंही देवाचें ठिकाणीं अनन्य भक्ती करणारे.

## प्रवास व स्थानपसंति.

येणेंप्रमाणें हें तीन माणसांचें कुटुंब वडीलमातोश्रींची आज्ञा घेऊन घरांतून बाहेर पडलें व रत्नागिरीस श्रीपरशुरामाचें देवळांत त्यांनीं पहिला मुक्काम केला. दुसरे दिवशीं तेथून निघून ते पुळ्याचे गणपतीचे व श्रीपरशुरामाचे मुख्य स्थान यांचें दर्शन करून घाटाखालीं कोल्हापुरास श्रीजगदंबेचे दर्शन घेऊन व नाशिकास गोदास्नान करून श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरीं आले. तेथें वे. रा. चिंतामणभट प्रदक्षिणे यांस त्यांनीं तिर्थोपाध्धिक दिलें. त्र्यंबकेश्वरानंतर मार्गांत तीर्थे व देवदर्शनें करीत व त्याचेच बरोबर आपल्यास राहण्यास सुस्थलाचा शोध करीत फिरतां फिरतां स्वारी गोदातीरीं श्रीक्षेत्र पैठणास आली. सुमारें याच समयांत पैठण क्षेत्रांत श्री एकनाथांनीं शुद्ध केलेली ज्ञानेश्वरी नुकीच उदयास आली होती. चतुःश्लोकी भागवतावरील टीका, भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका, भावार्थ रामायण, वगैरे एकनाथांचे ग्रंथांची प्रसिद्धी श्रद्धेनें लोकांत होऊं लागली होती. दक्षिणेंत रामदास स्वामी, तुकाराम बोवा, रंगनाथ स्वामी वगैरे संतमंडळ गर्जत होतें. पूर्वेस व उत्तरेस तुळशीदास, अद्वैतानंद, नित्यानंद, चैतन्यस्वामी, इत्यादि मोठमोठे भगवद्भक्त आपल्या अलौकिक सामर्थ्यानें, अप्रतीम भक्तीनें आणि निःसीम

---

१ हा दीक्षितांचा अस्सल लेख त्र्यंबकेश्वरकर प्रदक्षिणे यांचे वंशस्थांकडून मिळाला. त्याची मित्ती कार्तिक वद्य ८ शके १५७१ आहे. त्यावरून चरित्रनायकाचे हस्ताक्षर पाहण्यास सांपडावें ह्मणून दिलें आहे. पहा परि. नं. १.

प्रेमानें भगवंताच्या लीला वर्णन करीत होते. अशा भक्तिरसाचे पूर्ण भरभराटीचे समयांत नारायण भट पैठणास आले. आधींच भक्तिरसानें ओथंबलेल्या अंतःकरणास, एकनाथाचें घरीं गंध व कावडी देणारें कृपामूर्ति श्रीकृष्णाचें दर्शन आणि सर्व पापांचें क्षालन करणारें श्री गोदावरीचें स्नान, हे दोन महत् लाभ पटल्यामुळें, नारायण भटांनीं हेंच स्थान राहण्यास पसंत केलें व तेथें ते राहूं लागले.

## कार्यक्रम.

पैठणास राहिल्यावर संसाराचें असारत्व मनांत आणून स्वदेहसार्थकाचें साधनार्थ नारायण भटांनीं गायत्रीपुरश्चरणास आरंभ केला. थंडी मनांत आणिली नाहीं, सूर्याचें प्रखर तापास ते भ्याले नाहींत, अथवा पर्जन्याचे मुसळधारेस ते डगले नाहींत; प्रातः पंचपंचउषःकालीं उठून शौचमुखमार्जन आटोपल्यावर गंगेस स्नानास जातांना आराध्यदैवत श्रीकृष्णाचें दर्शन घ्यावयाचें; गंगेस जाऊन स्नानसंध्योत्तर घरीं औपासन होम करून पुन्हा गंगातिरीं गायत्रीजप करावयाचा; तेथेंच माध्यान्ह संध्या, ब्रह्मयज्ञ करून श्री गोपालकृष्णाचें दर्शन घेऊन घरीं यावयाचें; नंतर मधुकरी मागून आणून, अतीथ, अभ्यागत, बहीण व कुटुंब यांचेंसह भोजन करावयाचें. उर्वरीत कालांत गुरु जगन्नाथ यांचे मुखानें परमात्मबोध श्रवण करावयाचा अथवा गुरु सांगतील तर आपण ग्रंथ वाचावयाचा आणि गुरुकडून त्यांतील रहस्य समजून घ्यावयाचें. अशा क्रमांत त्यांचे दिवस जाऊं लागले. येणेंप्रमाणें छत्तीस वर्षांचें कालांत एकनिष्ठपणें गुरुसेवा व कडकडीत ब्रह्मचर्य व्रतानें राहून त्यांनीं बारा गायत्रीपुरश्चरणें संपविलीं. अर्थातच जसजशी निष्ठा वाढत चालली तसतसें गुरुकृपेचें तारूं अलीकडे येऊं लागून अखेर त्या तारवांत आमचे चरित्रनायक नारायण भटजी

यांस स्थान मिळालें ! गुरुकृपेचें तारवांत दुसरें काय दिसावयाचें आहे ? भगवंताचें सगुणरूप.

## ब्रह्मचर्य.

पुराण कालांतील वसिष्ठ, वामदेव, विश्वामित्र यांच्यासारख्या ऋषींच्या तपश्चर्येचीं वर्णनें तर महतामहत आहेतच. आमच्या चरित्र-नायकाचें कालांतही श्रीरामदासासारखे बालब्रह्मचारी सर्व जन-समूहांत ऐन तारुण्यांत कडकडीत ब्रह्मचर्य पाळून वावरत होते ! तरी नारायण भट यांचें ऐन तारुण्य, तरुण पत्नीचें निकट साहचर्य आणि स्वतंत्रपणा, अशी परिस्थिति असून या पतिपत्नींनीं सारखीं छत्तीस वर्षें व्रतस्थ घालिवलीं ही गोष्ट सामान्य कशी ह्मणावी ! आणि अशा दांपत्यावर गुरूची व ईश्वराची कृपा कां होऊं नये ? होणेंच योग्य व त्याप्रमाणें ती झालीही.

## स्थानपालट.

सगुणरूपाची प्राप्ती झाल्यानंतर गुरुंनीं पैठण सोडून जाण्याची, आश्रमधर्मानुरूप अग्निसेवा करण्याची व घडेल तें ब्राह्मणभोजन घालण्याची आपले शिष्यास आज्ञा केली. या गुरूआज्ञेनुरूप एकांत व ब्राह्मण संतर्पणास सोयस्कर असें स्थल पाहतां, औरंगाबाद शहरानजीक कसबें सातारें हा गांव राहण्यास त्यांनीं पसंत केला; कारण तेथील मोकळी हवा, स्वच्छ पाणी, गर्द छाया आणि निवांत स्थान, हीं सर्व जरूर होतीं. शिवाय औरंगाबादेसारखें मोठें शहर नजीक असल्यामुळें त्यापासून ब्राह्मणसंतर्पणासही उपयोग होणार होता. सारांश, याप्रमाणें सर्व सोयी मनांत आणून पैठणास गुरुचरणीं सर्व निवेदन करून आज्ञा व आशिर्वाद होतांच तें तीन माणसांचें कुटुंब सातान्यास येऊन राहिलें. ही गोष्ट शके १६०९।१० मध्यें घडली असावी.

## आश्रमवास.

सातारें गांवापासून जवळच नदीकिनाऱ्यावर एक पर्णकुटिका बांधून प्रथम नारायण भटांनीं वस्ती केली. ती जागा तेथें प्रसिद्ध असून, त्यांच्या स्नानसंध्येचे जागेवर अद्यापि एक ओटा आहे. त्या शेतजमिनीस 'वरचा बाग' अशी संज्ञा असून ती जमीन दीक्षितांचे वंशजांकडे इनाम चालत आहे. त्या सनदेचा तरजुमा परिशिष्ट नं. २ चा जोडला आहे.

साताऱ्यास येऊन राहिल्यानंतर नारायण भट ईश्वरी कृपेनें उदयास येऊं लागले. देहूचा तुका श्रीकार मिळवून श्री तुकारामबुवा झाला; जांबेंतील उनाड मुलांपैकीं नारायण श्रीसमर्थ रामदास बनला; नेत्रानें अंध व मातेनें रानांत टाकून दिलेलें डोंबाचें पोर संतमंडळांत उदयास येऊन नाभाजी नाम पावलें; मूळ नक्षत्रावर जन्मल्यामुळें मातापितरांनीं टाकून दिलेलें मूल तुळशीदास श्री रामचंद्रांचे गळयांतील हार बनून त्यानें आपल्या कल्पनाशक्तीनें आणि बुद्धिमत्तेनें रामकथा तयार केल्या. याप्रमाणें संतमालिकेंत ही व दुसरी मंडळी जशी अग्रगण्य झाली, तशींच राजकारस्थानांत जी शिरली ती देखील तिकडे अशीच महत्पदास पावली. शिवनेरी किल्ल्यांत जन्मलेले, शंभो मल्हदेवास वाहिलेले, पुराण्या पुण्यांत वाढलेले, शहाजी राजाचे पुत्र हिंदुपदपादशाहीचे संस्थापक होऊन श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज बनले. सारांश राजमंडळांत आणि साधुवृंदांत खेड्यांपाड्यांत बालपण घालवून उदयास आले-ल्यांचीच संख्या इतिहासांत जास्त आढळून येते. याचें शास्त्रीय कारण काय असेल तें असो; पण खेड्यांतील मोकळी हवा, सकस आणि सरस व ताज्या पदार्थांचें सेवन, हीं त्यांच्या बुद्धीस तीव्रता

आणीत असल्यामुळें, तुंबलेलें पाणी फोडून दिलें असतां तें उसळून जसें अनावर होतें, अथवा दाबून धरलेलें कारंजांतील पाणी दाब निघतांच जसें उंच उडतें, तद्वत् खेड्यांतून राहणारे लोकांस गुरु मिळाला असतां ते उद्यास येतात. असो. नारायण भटांनीं सातारें गांव पसंत केलें. तेथें त्रिकाल स्नानसंध्या करावी, भिक्षा मागावी, आल्या अतिथीस भोजन घालावें, साधेल तितकें ब्राह्मणभोजन करावें, आणि ऊर्वरीत काल ईश्वरचिंतन व अध्ययन यांत घालवावा. याप्रमाणें गृहस्थाश्रमाचा कार्यक्रम चालला असतां त्यांची कीर्ती चहूंकडे पसरूं लागली.

## अन्नसंतर्पण.

पैठणास ३६ वर्षे केलेल्या कालक्षेपांत, श्री एकनाथाची आपलें आराध्य दैवत श्रीकृष्णावरील दृढ भक्ती, त्यांची सर्वाभूतीं एकनिष्ठा व त्यांनीं केलेलें अन्नसंतर्पण, या गोष्टी पाहण्यांत आल्यानें वाढलेली श्रद्धा व त्यास गुर्वाज्ञेची पुष्टी मिळाल्यामुळें नारायण भटजींचा अन्नदाना-विषयीं कृतसंकल्प झाला होता. अन्नार्थी कोणीही त्यांचे दाराशीं आला असतां त्यास नकार हें अक्षर कधींच ऐकण्यास मिळालें नाहीं. त्यांचे सुसंगतीचा परिणाम त्यांची पत्नी साध्वी लक्ष्मीबाई हिजवरही घडलाच होता. मोरोपंत कवीनें ईश्वरापाशीं जें मागितलें, त्यांत विशेषें करून "सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानीं पडो," हेंच मागितलें; त्याच प्रमाणें साधुवर्य तुकारामांनीं तरी "नलगे मुक्ती धन संपदा । संतसंग देई सदा ॥" असेंच मागणें मागितलें. तात्पर्य काय, कीं सत्संगतीचा महिमाच असा अगाध आहे, कीं त्या योगानें मनुष्याचे आचार बदलतात, विचार बदलतात, फार तर काय पण तो मनुष्य अगदीं नवा बनतो. दीक्षितांची पत्नी तरी अशीच साध्वी बनली.

संसाराचें पाणी सुकून जाऊन पतिसान्निध्यांत, संतांचें दर्शनानें व हरिकथाश्रवणानें, त्यांचे अंतःकरणांत ज्ञानामृताचे पाझर फुटूं लागले, आणि मी-तूं-पणाची भावनाही त्यांच्यांतून पार नाहींशी झाली; व असें होणें साहजिकच होतें. वाल्या कोळी सप्त ऋषींचे एक दिवसाचे संगतीनें वाल्मीक ऋषी बनला, तर लक्ष्मी बाई पति-मनोगतानुरूप वर्तणारी व्हावी यांत आश्चर्य काय! सारांश दीक्षित स्वक्रियेनें सिद्ध बनले, आणि लक्ष्मी बाई त्यांच्या कृपेनें तत्सम बनल्या. दीक्षितांस अनाचाराखेरीज नकार वर्ज होता, आणि त्यामुळें लक्ष्मी बाईस नकाराची ओळखच झाली नाहीं. नारायण भटांनीं अहो म्हणून हांक मारिली, कीं यांनीं किती जणें आहेत, असें विचारावयाचें. तात्पर्य दारीं आलेल्यास नाहीं ह्मणावयाचें नाहीं, हा नारायण दीक्षितांचा दृढ निश्चय. तसेंच घरांत अन्न नाहीं, अथवा मी करीत नाहीं, हें न सांगण्याचा लक्ष्मी बाईचाही निश्चय. भिक्षा मागून मिळेल त्यांत अतिथि अभ्यागतास भोजन घालावयाचें, हा त्यांचा क्रम. या धर्मादाय पद्धतीचें गांवांतील लोकांस आश्चर्य वाटे, श्रीमंतास लाजिरवाणें होई, आणि कृपण, कुटाळ व असहिष्णु लोकांस तर तें काट्याप्रमाणें सले. "कोणी वंदा अथवा निंदा। आह्मां स्वहिताचा धंदा॥" या तुकोबाचे उक्तीप्रमाणें दीक्षितांचा नित्यक्रम आनंदांत चालू असतां साध्वी लक्ष्मी बाई गरोदर राहिल्या. ज्या घरांत भगवद्भक्ती ओतप्रोत भरली आहे, तेथें डोहाळेहि भगवन्नाम-गौरवात्मक, औदार्यद्योतक, असेच व्हावयाचे; आणि ते तसेच झाले. बाईस डोहाळे पंचपक्वान्नाची लक्ष ब्राह्मणभोजनें घालावीं व श्रीकृष्ण कुल-देवतेचें दर्शनास श्रीक्षेत्र द्वारकेस जावें असेच होऊं लागले. लक्ष्मी बाई गरोदर राहिल्याचें पाहून दीक्षितभगिनी अक्कास फार

समाधान वाटलें व त्यांनीं, बायकांचे रितीप्रमाणें, लक्ष्मी बाईचे परिस्थित्यनुरूप सोहळे करण्यांत व कोड पुरविण्यांत कमतरता केली नाहीं.

## लक्ष्मी बाईचें सत्व व पुत्रजन्म.

दीक्षित औदार्याचे व भूतदयेचे कसास उतरतील, पण त्यांची अर्धांगी अद्याप कच्ची आहे कीं काय, याची परीक्षा भगवान् श्रीकृष्णानें स्वतःच घेतली. एकदां, दीक्षित व वेणु आका घरांत नव्हतीं. लक्ष्मी बाई एकट्याच घरांत व गर्भारपणाचे आठ महिने होऊन गेल्यामुळें अवघडलेल्या. अशी संधी साधून, परमेश्वराची स्वारी मोळीवाली बनली. डोकीला फाटकें चिंधुक, त्यावरून घोंगडीची खोळ, ढुंगणास फाटकी लंगोटी, पायांत फाटक्या वाहणा व हातांत काठी. असा बेमालुम पोषाख पितांबरधारी कमलनयन वासुदेवानें करून स्वारी, डोक्यावर लांकडाची मोळी घेऊन, दीक्षितांचें बिऱ्हाडाजवळ आली, व घेरी आल्याप्रमाणें करून धाडकन दरवाजांत पडली! आवाज ऐकतांच लक्ष्मी बाई कोण, कोण, असें विचारीत बाहेर आल्या, तों मोळीविक्या दरवाजांत पडलेला! डोक्यावरून मोळी खालीं पडल्यामुळें आळें तुटून मोळींतील लांकडें अस्ताव्यस्त झालीं आहेत, हातांतील काठी एका बाजूस पडली आहे, अंगावरील घोंगडी पाठीखालीं अडकून अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं तो सांवळा जगजेठी पोटपाठ एक होऊन पडलेला पाहतांच लक्ष्मी बाईचें कोंवळें अंतःकरण कळवळून, आई कृष्णा बाई! काय तरी तुझी करणी ही! असें ह्मणत ह्मणत त्यांनीं घरांतून पाणी आणून त्याचे डोळ्यांस लाविलें व थोडा वारा घातला; तेव्हां शुद्धीवर येऊन या नटनाटकी श्रीरंगानें पोटावर हात मारून भूक लागली आहे असें सुचविलें. तेव्हां ठीक आहे, असें ह्मणून लाह्याचें पिठांत गूळ घालून कालवून

तें स्वहस्तें लक्ष्मी बाईनीं त्यास भरविलें, व पूर्ण सावध झाल्यावर त्यास पाणी पाजलें. नंतर ढेंकर देऊन पिनाकपाणी वासुदेव यानें चतुर्भुज होऊन लक्ष्मी बाईस दर्शन दिलें, व उत्तम पुत्र होईल असा आशिर्वाद देऊन स्वारी अदृश्य झाली. दीक्षित व आका घरीं आल्यावर त्यांस बाई-नीं सर्व वृत्त निवेदन केलें. उभयतांस अत्यंत संतोष झाला. वेणु आकास तर आपल्यास दर्शनाचा लाभ न झाल्याबद्दल फारच हळहळ वाटली. पुढें लवकरच लक्ष्मी बाई सुसमयीं प्रसूत होऊन पुत्ररत्न प्रसवल्या, व त्याचें नांव वासुदेव ठेविलें. जन्मतिथी शके १६१२ चैत्र शुद्ध १० होय.

## गांवकुटाळ व परमेश्वरी कृपा.

प्रत्येक गांवांत चार प्रकारच्या लोकांची वस्ती असते, व त्यांत गांवकुटाळ म्हणून एक प्रकार असतो. विशेषतः खेडे गांवांत त्यांचा धंदा ह्मणजे वडिलार्जित जें काय असेल तें खावें आणि गांवांतील इतर लोकांच्या निंदा व कुचेष्टा करीत बसावें. त्यांतून विशेषतः ज्याची चार लोक स्तुती अगर गुणानुवाद वर्णन करतात, त्याचें न्यून्य पाहण्याकडे त्यांची दृष्टी कावळ्यासारखी तीक्ष्ण, घ्राणेंद्रिय श्वानाप्रमाणें तिखट, कान सशाप्रमाणें उभारलेले आणि जिव्हा नवयौवनाप्रमाणें चपल असते. त्यांचा उपयोग ते आपले बुद्धी-प्रमाणें सत्पुरुषाचे छळाकडे करित असतात. ह्या त्यांच्या कृतीनें साधु पुरुषांची वृत्ती निर्मल होऊन त्यांचा सत्कीर्तिरूप सुगंध सर्वत्र पसरतो; इतकेंच नव्हें तर सुवर्णाप्रमाणें तावूनसुलाखून तो जास्त उज्वल होतो. साधू वर्ग अशा लोकांस मातेपेक्षां जास्त मान देतो. माता बाह्य मळपूरीष स्वच्छ करिते, पण निंदक सत्पुरुषाचें अंतरंग स्वच्छ करण्यास कारण होतात. मायोपाधीमुळें माता आपत्यदोषांवर कधीं कधीं पांघरूण घालते व कधीं कधीं ते तिला गुणरूपच दिसतात. पण गांवकुटाळांचें तसें नसतें; तर ते साधु पुरुषांचे अंगीं

क्वचित् असलेलें वैगुण्य अगर दोषस्थल याचें आविष्करण करतात. पण त्यामुळें साधू पुरुष सावध होऊन त्याचें परिमार्जन करतात. सातान्यांतील गांवकुटाळांपैकीं एक पुरुष दीक्षितांचा कीर्तिरूपसुगंध वाढविण्यास असाच कारण झाला, ती आख्यायिका खालीं दिल्याप्रमाणें आहे.

सातारें गांवांत गिरिधर लाल या नांवाचा एक धनिक पण कृपण आणि पहिले प्रतीचा गांवकुटाळ गृहस्थ राहत असे. त्याचे दोन मुलगे, ते वडिलांपेक्षांही सवाई होते. त्यांचीं नांवें चिमण लाल व करण लाल अशीं होतीं. दीक्षितांचा अन्नदानाचा लौकिक व लालांची कृपणपणाची परमावधी. ह्या एकमेकांविरुद्ध परिस्थिती व कृतीमुळें लालांचा दुर्लौकीक जास्त होऊन कांहीं स्पष्टवक्ते त्यांचे तोंडावर त्यांची टर उडवूं लागले. त्यामुळें दीक्षितांचा अन्नसंतर्पणाचा क्रम तरी बंद पाडावा अथवा त्यांचें बिऱ्हाड तरी गांवांतून घालवावें, असा गिरिधर लाल व त्याचे मुलांनीं निश्चय करून, काकदृष्टीनें ते संधीची मार्गप्रतीक्षा करीत राहिले. साध्वी लक्ष्मी बाई प्रसूत

---

१ ही आख्यायिका, मोगलाईत बीड येथें 'चंपावती' नांवाचें वर्तमानपत्र रु० त्र्यं० राजुरकर काढीत होते, त्यांतील वर्ष ३ अंक ५०, यांत दिली आहे. त्यांत लाला त्रयीचे कृपणपणाचें वर्णन दिलें आहे; तें असें:—" लक्षाधीश पण कृपणाचार्य गिरिधरलाल हे आपल्या मळ्यांतील चिंचा विकून, दुसऱ्याचे झाडाखालील चिंचोके आणून ते भाजून त्यांची खांडें सुपारी ऐवजीं खात. त्यांचे वडिल चिरंजीव सुपारी पाण्यांत बुचकळून त्या पाण्यानें मुखशुद्धी करीत. धाकटे या दोघांस उधळे ह्मणत. त्यांनीं सुपारी टांगून ठेऊन तिची सावली पाण्यांत पाडावी, व त्या पाण्यावर मुखशुद्धीचें काम चालवावें. " वडिलां इतकी सढळ मंडळी या लेखकानें पाहिली आहे. परंतु चिरंजीवांसंबंधीं अतिशयोक्ती वाटते. तथापि " नानारत्ना वसुंधरा " या दृष्टिनें नारायण दीक्षित जसें एका बाजूचें रत्न बनलें, तशीं हींही रत्नें उत्तर दिशेस कां निपजूं नयेत ! असतील ही !

होऊन पुत्र झाल्याची संधी त्यांना मिळाली. गांवांतील आणखी दाहापांच गांवकुटाळ बगलेंत घेऊन लालांनीं आसपासच्या खेड्यापाड्यांतील सर्व जातींच्या लोकांस त्यांच्याकडे येणारे पैपाहुण्यांसह दीक्षितांचे येथें बारावें दिवशीं बारशाच्या भोजनाचें आगत्यपूर्वक आमंत्रण दिलें; व पुन्हां बोलावणें व्हावयाचें नाहीं, बारा वाजल्यानंतर चिंचेच्या बनांत अगत्य यावें, अशी ताकीद दिली. ही कपटाची कृती, पण अन्नार्थी व भोळे भाविक लोकांस ती खरी वाटली. इकडे दीक्षितांस या गोष्टीचा मागमूसही लागला नाहीं. बारशाचा दिवस उगवला. दीक्षित आपलें नित्य कर्म आटोपून जयकृष्णाचा नामोच्चार करीत नित्याप्रमाणें भिक्षेस निघाले. नियमाप्रमाणें भिक्षेहून परत येऊन माध्यान्हिक कर्मास लागले. आज बारसें ह्मणून फक्त दहापांच ब्राह्मण त्यांनीं भोजनास सांगितले होते. दीक्षितांची पर्णकुटिका चिंचबनांत होती. तिचे समोर आंबे, चिंचा, वगैरे वृक्षांची गर्द छाया होती. सूर्य बरोबर मध्यावर आला असल्यामुळें त्याचे किरण तीक्ष्ण झाले आहेत; पक्षी निर्मळ पाणी पिऊन छायेची जागा पाहून झाडावर बसले आहेत; गुराखी मंडळी गुरांस पाणी पाजून त्यांस सावलींत सोडून आपण आपल्या शिदोऱ्या काढून आपापसांत दे घे करीत आहेत. इकडे वर निर्दिष्ट केलेली लाल आदि कुटाळ मंडळी आपलें भोजन आटोपून दीक्षितांची कशी फजिती होते तें पाहण्यासाठीं बनांत इतस्तत: फिरत आहेत; व मधुन मधुन भोजनास आलेल्या मंडळीस तुह्मीं कशाकरितां आलां ? येथें काय काम आहे ? वगैरे विचारपुस करीत आहेत. कोणास ह्मणतात दीक्षित भिक्षा मागून आतांच आले, पण येथें स्वयंपाक वगैरे कांहीं दिसत नाहीं, तेव्हां त्यांनीं तुह्मांस बोलावून उगाच फसविलें आहे. इतक्यांत दीक्षित वैश्वदेव करून काकबली

देण्याकरितां बाहेर आले, तों त्यांस दिसलें कीं समोर भोजनास मंडळी जमली असुन जागेची धराधरी चालली आहे. मंडळी धोतरें पसरून ही आमची पंगत, ती तुमची पंगत असें ह्मणत आहेत. तें पाहून आश्चर्यचकित होत्साते दीक्षित क्षणभर स्तब्ध उभे राहिले. तों एक स्पष्टवक्ता त्यांचे जवळ येऊन ह्मणाला, वाहवारे भटजी बोवा !!! बारशाचें आमंत्रण गांवोंगांव पाठवून आपण स्वतःचे भोजनाची तयारी करून काकबली टाकण्यास आलास !! आश्चर्य आहे! या सर्व लोकांनीं विन्मुख परत जावें कीं काय ? तेव्हां दीक्षित म्हणाले, शांत व्हा, ज्या भगवंतानें आमंत्रणाची प्रेरणा केली, तोच गोपालकृष्ण आपणांस भोजन घालील, आपण स्वस्थ असावें. आपलें सर्वांचें भोजन झाल्यावांचून मी अन्नग्रहण करणार नाहीं. असें सांगून घरांत जाऊन वेणु आकास ते ह्मणाले, कीं बारशाचें भोजनास बरीच अतिथी मंडळी बाहेर आली आहेत; तेव्हां शिलकेंत असेल तें, तांदुळ, डाळ वगैरे, शिजविण्यास लावा. निमंत्रीत ब्राह्मण मंडळीस, दोन घटका उशीर होईल त्याची क्षमा करावी, असें सांगून, ते देवाची प्रार्थना करण्यास लागले. भगवंता ! तूं भक्तरक्षक आहेस. दुर्योधनानें पांडवांचें सत्व हरण करण्याकरितां शिष्यसमुदायासह दुर्वास ऋषीस रात्रीचें वेळीं सूर्यदत्त स्थाली पालथी घातल्या नंतर पांडवांकडे भोजन मागण्यास पाठविलें असतां, देवा ! तूं भाजीचें पान भक्षण करून ढेंकर दिलीस, तों इकडे सर्व ऋषी मंडळीस परभारें भोजन मिळून पांडवांस तूं संकटांतून मुक्त केलेंस. एकनाथाचे घरीं असलेल्या तुझे कावडीस व ज्या सहाणेवर तूं गंध उगाळिलेंस तीस मी रोज वंदन करीत आहे. देवा ! गजेंद्रानें तरी तुला काय अर्पण केलें ? पण तूं त्याचें संकटीं धावून त्यास संकटांतून मुक्त केलेंस. देवा ! तूं भक्तकामकल्पद्रुम असून भक्तांचे संरक्षणाकरितांच नारसिंहादि अवतार

घेऊन भक्तांचें संरक्षण केलेंस. कदाचित् माझी भक्ती त्यांचे योग्यतेची नसेल ह्मणून माझी उपेक्षा करशील; पण देवा, गोपालकृष्णा ! ! समर्थीनें अंगिकार केल्यावर मग सोडून देतां येत नाहीं. पहा शंकरानें हलाहल म्हणजे परम जहाल वीष, कीं ज्यायोगें त्याचा कंठ नीलवर्ण झाला, पण त्याचा त्याग न करितां, देवाकरितां प्राशन केलें. देवा ! ज्यांनीं या लोकांस माझें येथें भोजनाचें आमंत्रण दिलें, त्यांस तशी प्रेरणा करणारा तरी तुजवांचून दुसरा कोण आहे ? तेव्हां त्या आमंत्रणाप्रमाणें त्याची पूर्तताही तुलाच केली पाहिजे. बरें, हे लोक अन्नावांचून परत गेले, तर मला तुझा दास ह्मणून जग ह्मणतें त्यास बट्टा लागेल, ह्मणजे तुझ्या ब्रीदास बट्टा लागेल. देवा, तुझ्या कृपेच्या सावलीची ही वेळ आहे ! आतां अंत पाहूं नको ! याप्रमाणें देवाची प्रार्थना आणि त्याचा धांवा एकतानतेनें चालु असतां भक्तवत्सल परमात्मा उपेक्षा कशी करील ? लक्ष्मीनारायण ध्यानांत निमग्न आहेत, तों प्रत्यक्ष भगवान् पितांबरधारी श्रीकृष्ण आणि सर्वालंकार मंडित श्री रुक्मिणी देवी प्रत्यक्ष हातांत भांडें घेऊन तेथें येऊन ह्मणालीं, कीं स्वयंपाक सिद्ध असून वाढण्यास कोणी नाहीं, असें समजल्यावरून आम्हीं येथें आलों आहों. नारायण भट कोठें आहेत ? हें शब्द ऐकतांच दीक्षित भानावर येऊन पाहतात तों प्रत्यक्ष भगवान् लक्ष्मीनारायणाचें साक्षात् दर्शन ! ! मग त्या भगवद्भक्तीचें प्रेमास पाझर फुटून त्यांनीं एकदम चरणावर मस्तक ठेविलें आणि देवाचें वात्सल्यतेबद्दल धन्यता मानिली. त्या परमानंदाची कल्पना ज्या प्रेमळ भक्तास ऐन सत्वहानीचें समयीं परमात्मकृपा झाल्याचा अनुभव असेल त्यासच करतां येईल. इतरांस अशक्य आहे. दीक्षितांनीं पाय धरून प्रार्थना केली, कीं देवा ! काय हें ? मी आपल्यास श्रम दिले ! भक्तवत्सला, मी कोणत्या शब्दानें तुझी स्तुती करूं !

जेथें वेदांनीं देखील हात टेकले तेथें माझा पामराचा पाड काय ? देवांनीं अनुग्रहपूर्वक आशीर्वाद देऊन सांगितलें, कीं भटजी उठा आतां, पानें वगैरे मांडण्याची तजवीज करा, जेवणास उशीर कां ? असें ह्मटल्याबरोबर नारायण भटांनीं पानांचे पुडे घेऊन पानें मांडण्याची सुरवात केली. रुक्मिणीबाईनीं घरांत जाऊन, वेणू आका स्वयंपाकाजवळ सचिंत बसल्या होत्या, त्यांस सांगितलें, तुह्मीं बाहेर वाढण्यास अन्न देण्याची तजवीज पहा, मी येथून अन्न देतें. असें ह्मणून त्यांनीं शिजलेल्या अन्नाचें अमृतदृष्टीनें निरीक्षण केलें. प्रत्यक्ष जगन्माता अन्नपूर्णा देवींची कृपा ! मग तेथें काय उणें पडणार आहे ! सारांश केळीचे पानांचीं पुडकीं आणि द्रोणांचे गठ्ठे पाहिल्यावर भोजनासाठीं आतुर झालेली मंडळी स्थीर झाली. गलबला हलकल्लोळ कमी होऊं लागला. थोडक्याच वेळांत सर्व पंक्ती वाढणें होऊन, ‘ बोल गोपालकृष्ण महाराजकी जय, ’ अशा मंगलनाम घोषांत मंडळी भोजनास बसली. दीक्षित मुखानें श्रीकृष्ण, श्रीकृष्ण ह्मणत पंक्तींत, महाराज आपल्यास फार श्रम झाले असून उशीर झाला आहे, स्वस्थ चित्तानें भोजन होऊं द्यावें, याप्रमाणें प्रार्थना करीत आहेत, आग्रहानें वाढवीत आहेत, असा थाट झाला. तात्पर्य जेथें दोन घटकांपूर्वीं कांहीं एक नव्हतें, तेथें शेकडों मनुष्यें भोजन करून जात आहेत, हा अद्भुत चमत्कार पाहून सर्व मंडळी थक्क होऊन गेली.*

* चंपावती पत्रांतील लेखक ह्मणतात कीं:—“ या देखाव्याचें वर्णन एका मुसलमान कवीनें पर्शियन भाषेंत फार मनोरम केलें आहे. मी ज्या वेळीं हें ऐकिलें त्या पूर्वीं जर हें पवित्र नांव, त्यांचा श्रीक्षेत्रकाशी येथील ब्रह्मघाटावरील वाडा, आणि त्याचे कोपऱ्यावर चाललेली पूजा माझे पाहण्यांत आली असती तर त्या कवितेचा लाभ वाचकांस दिला असता. त्या काव्यांत पदार्थांचे वर्णन आणि रुचीही मोठ्या बहारीनें दाखविलीं आहेत. ”

गिरिधर लाल आदि गांवकुटाळ मंडळी दीक्षितांची फजिती कशी काय होते ती पाहण्यास आलेली होती. त्यांनीं हा ईश्वरीप्रसाद अवलोकन करतांच, त्यांची दुर्बुद्धी पार नाहींशी होऊन, उलट परम आदरानें त्या पंक्तींत बसून त्यांनीं प्रसाद ग्रहण केला. याप्रमाणें ब्राह्मणादि सर्व जातींनांच नव्हें तर त्या बनांत आलेल्या पशु-पक्ष्यांना देखील बारशाचें भोजन मिळालें. जगन्माता रुक्मिणी एकटी इतक्या सर्व मंडळीस वाढीत होती. या सर्व भोजनपंक्तींस परमात्मा स्वतः तूप वाढीत होते. ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष अन्नपूर्णा आणि भगवान् परमेश्वर स्वतः उभे, तेथें न्यून कशाचें पडणार !

दुसरा चमत्कार असा झाला, कीं गिरधर लाल यानें गांवकुटाळांस मदतीस घेऊन हा व्यूह रचिला, पण त्याचेच कोठारांतील धान्य आणि त्याच्याच शिलकेंतील पैसा या प्रयोजनास खर्च होऊन, त्याचा खर्च त्याचे कीर्दीवर खुद्द चिमणलालचे हस्ताक्षरानें खर्ची लिहिलेला आढळला; तें पाहून तिघांही पितापुत्रांस वेड लागलें. पुढें तें वेड दीक्षितांचें कृपेनें जाऊन ते पूर्णपणें भक्तिमार्गास लागले.

## औरंगजेबास दाखविलेला चमत्कार व ईनाम.

हिंदु धर्माचे पूर्ण छलक सार्वभौम दिल्लीपती औरंगजेब बादशाह यांचा मुक्काम औरंगाबादेस असतां सातारें जवळील डोंगरखोरा नांवाचें पहाडांत एक पटाईत वाघ आहे, अशी बातमी कळल्यावरून बादशहाची स्वारी शिकारीस गेली होती. ती परत येतांना दोन प्रहर उलटून गेले होते. दिवस शरदृतूचे असल्यामुळें प्रखर उन्हाचे तापानें व शिकारीचे कामगिरीनें बरोबरचे लोक अतिशय श्रांत व

अन्नपाण्यावांचून व्याकूळ झाले होते. सातारें गांवाजवळ आल्यावर नदीचें स्वच्छ पाणी आणि आंबराईची गर्द छाया पाहून अघाडीचे लोक अर्थातच त्या ठिकाणीं वळले. त्यांतील एक घोडेस्वार घोड्याखालीं उतरतांनाच उन्हाचे तापानें मूर्छा येऊन पडला; दुसरा त्यास वारा घालीत होता, तिसरा पानाचे कपट्यांत पाणी घेऊन त्याचे तोंडांत घालीत होता; त्याच संधीस नारायण दीक्षित भिक्षा मागून त्या मार्गानें येत होते. त्यानीं हा प्रकार अवलोकन करून भूतदयेनें व्याकूळ होत्साते त्यांनी झोळींतून अर्धी भाकर व कालवण काढून मूर्छितास खाऊं घालण्यास दिलें; व त्याचेकरितां भांड्यांत पाणीही आणून दिलें. तें अन्न व पाणी त्याचे पोटांत गेल्यावर तो सावध झाला. नंतर तेथें असलेले सर्व लोक क्षुधेनें व्याकुळ झालेले आहेत असें मनांत येऊन दीक्षितांनीं त्या सर्व लोकांस अर्धी भाकर व भाजी देण्यास सुरवात केली. तेव्हां त्या लोकांनीं घोड्यांस पाणी पाजून सावलींत उभें करून कोणी भाकर खाण्यास तर कोणी पाणी पिण्यास सुरुवात केली. हें काम चालु आहे, इतक्यांत बादशहाची स्वारी तेथें येऊन पोंचली व त्यांना सर्व लोक तेथें थांबलेले व खात असलेले दृष्टीस पडले. बादशहा झाला तरी मनुष्यच, क्षुत्पिपासा विकारांनीं त्यांस थोडेंच सोडलें आहे. उन्हाचे प्रखर तापानें तोही श्रमी झालेला असल्यानें त्यानेंही आपला मुक्काम त्या गर्द छायेंत केला; तेव्हां त्यास असें समजलें कीं सदर ब्राह्मण सांई या झाडींत राहत असून त्याचे झोळींत चार पांच मनुष्यांचें अन्न असतां त्यानें या सर्व २००।२५० मनुष्यांस प्रत्येकीं अर्धी भाकर व भाजी दिली. ब्राह्मणाचें हें अभिनव कृत्य ऐकून बादशाह

आश्चर्यचकित झाला; व सत्व पाहण्याचे हेतुनें त्यानें दीक्षितांस सांगितलें कीं साई मलाही भूक लागली आहे. तेव्हां दीक्षितांनीं झोळी झाडून दाखविली व सांगितलें, कीं तुझ्याकरितां मजजवळ कांहीं शिल्लक नाहीं. बादशहानें प्रश्न केला कीं इतकें लोकांस तुह्मीं याच झोळींतून खाण्यास दिलें असतां, मला तुह्मीं नाहीं ह्मणतां याचें कारण काय? एक तर ते लोक खोटें सांगतात ह्मणून त्यांना शिक्षा करीन, किंवा बुद्धिपुरःसर तुह्मीं केलेलीं जादु मला न दाखवाल तर तुह्मांस बाटवून मुसलमान करीन. त्यावर दीक्षित ह्मणाले, तुह्मांस भाकरी न दिली तर मला बाटवीन ह्मणतां! परंतु याच झोळींतून तुह्मांस भोजन घातलें तर मग? बादशाह ह्मणाला, तसें झालें तर हा गांव आपल्यास ईनाम करून देईन. नंतर दीक्षितांनीं त्याच झोळींतून बादशाहाचे समक्ष उत्तम सुग्रास आणि ताजें अन्न काढलें. हा चमत्कार पाहून बादशहा हिन्दु धर्माचा इतका द्वेष्टा, तरी आश्चर्यचकित होऊन संतोषपूर्वक त्यानें कसबें सातारें ( नजीक औरंगाबाद ) हा गांव दीक्षितांस जाहगीर देऊन फरमान ( सनद ) करण्याविषयीं हुकूम केला. परंतु औरंगजेब पुढें लौकरच मृत्यु पावला. त्यामुळें सनद मिळणें तशीच राहिली. कारण दीक्षितांकडून त्या बाबतींत दिल्लीस प्रयत्न झाले नसावेत. पण ही गोष्ट खरी, कीं सातारें गांव दीक्षितांकडे त्या वेळेपासून चालु झाला. कारण शके १६३० सालचें अभयपत्रांत, ज्याचा उल्लेख पुढें आला आहे, " कसबें मजकूर नारायण भट यांस * सर्वमान्य ईनाम आहे " असें ह्मटलें आहे. ह्या प्रत्यंतरावरून वरील इतिहासाशीं मेळ घालतां शके १६२८ चे सुमारास औरंगाबादेस बादशाहाचा मुक्काम

* 'सर्वमान्य इनाम' हे शब्द बादशाही देणगीस लावीत असत.

होता, व पुढें ते लौकरच अहंमदनगर नजीक मृत्यु पावले. तात्पर्य, सनद उपलब्ध नसली, तरी सातारें हा गांव दीक्षितांकडे अजमासें शके १६२८ पासून चालू आहे.

## बाळाजी विश्वनाथ यांची भेट.

चरित्रनायक कोकणांतून देशांत आल्यास पन्नास वर्षांवर काल होऊन त्यांचे तपोबलाचा लौकिक चोंहींकडे दुमदुमला होता. याच सुमारास ब्राह्मणी राज्याचे अथवा पेशवाईचे मूळ संस्थापक बाळाजी विश्वनाथ भट हे श्रीवर्धन येथून राजकोपामुळें वडिलार्जित वतन-वृत्तीचा त्याग करून देशांत जीव संरक्षण करण्याचे हेतूने निघाले, ते घाटाखालीं सासवड येथें येऊन राहिले होते. पुढें ते, भानू आणि अबाजीपंत देशपांडे हे त्रिवर्ग रोजगार निमित्तानें मराठेशाहींत किल्ले सातारा मुक्कामीं आले. बाळाजी जात्या हुशार, महत्वाकांक्षी, घरं-दाज आणि कर्तृत्ववान् असल्यामुळें मराठेशाहीच्या उत्कर्षकालांत आपण पुढें येऊन नांवलौकिकास चढावें, ही त्यांची महत्वाकांक्षा. त्याप्र-माणें त्यांनीं धनाजी जाधवाचे पदरीं नोकरी धरली. पुढें कांहीं कामानिमित्त त्यांस औरंगाबाद प्रांतीं यावें लागलें. नारायण दीक्षित पाटण-कर हे कोकणस्थ आणि सत्पुरुष असल्याचें कर्णोपकर्णीं त्यांस समजलेंच होतें. अशा सत्पुरुषाचे कृपेची जोड आपल्या महत्वाकांक्षेस अवश्य वाटून ते दीक्षितांच्या भेटीस आले. दीक्षितांजवळ सेवा करून कांहीं दिवस राहिले असतां एके दिवशीं दीक्षितांनीं आज्ञा केली कीं " तुह्मीं उत्तम नांवारूपास याल व लौकरच राजलक्ष्मीनें विभूषीत व्हाल. " तो आशिर्वाद शुभ मुहूर्त समजून भोजनोत्तर बाळाजींनें निघण्याची तयारी केली. निरोप देते समयीं आमची ओळख राहुं

द्या, असें नारायण भटजींनीं ह्मटलें असतां बाळाजीनें उत्तर दिलें कीं "मुळास विसरेल तो अधम समजला पाहिजे." बाळाजी एवढेंच ह्मणून राहिले नाहींत, तर त्यांनीं लागलींच एक पत्र दीक्षितांचें नांवे लिहून दिलें कीं "मला जें ऐश्वर्य प्राप्त होईल त्यांतून कांहीं अंश आपले धर्मकृत्यास मदत ह्मणून देईन." हें * पत्र देऊन बाळाजी विश्वनाथ रवाना झाले. पुढें उत्तरोत्तर त्यांचा उत्कर्ष होत गेला; व त्याप्रमाणें ते दीक्षितांस कशी मदत करीत आले, ती हकीकत प्रसंगानुसार पुढें आलीच आहे. ही भेट शके १६२७।२८ चे अखेरीस अगर शके १६२९ चे सालीं झाली असावी.

## बाळाजीचा उत्कर्ष व दीक्षितांचा परामर्ष.

बाळाजी विश्वनाथ दीक्षितांचा आशिर्वाद मिळवून सातारा प्रांतीं गेले. तीं वेळ मोठी धामधुमीची असून महाराष्ट्रांत बऱ्याच उलाढाली चालू होत्या. कर्तृत्ववान् पुरुषास उदयास येण्यास ज्या प्रकारची परिस्थिती लागते त्या प्रकारची परिस्थिती होती. केव्हांही

---

* ह्या पत्रांत काय मजकुर होता हें नक्की सांगता येणें शक्य नाहीं. हें पत्र पुढें बाजीराव बल्लाळ यांनीं नारायण दीक्षित यांजपासून परत घेतलें, अशी आख्यायिका ऐकण्यांत असून, त्याला प्रत्यंतर चिमणाजी आप्पा व बाळाजी बाजीराव यांचें बाजीरावचें मरणानंतर दीक्षितांस जें एक पत्र आलें तें होय. त्या पत्रांत पुढील मजकूर आहेः—"आज पावेतों झालें तें झालें, पत्र दिलें होतें तें फिरोन घेतलें. पुढें नवें जें प्राप्त होत जाईल त्याचा दुहोत्रा देत जावा ह्मणून लिहिलें; तर दुहोत्राच करार करावा असें काय आहे ? सारांश मिळजोड स्वामींच्या आशिर्वादें होईल. वरकड स्वामींची सेवा जे प्रकारें करणें तें प्रकारें करण्यास अंतर सर्वथा होणार नाहीं."— काव्ये० सं० पत्रेयादी पत्र नं० ११ पृ.१० हेंच समग्र पत्र पुढें परिशिष्ट नं० ३ चें पहा.

कर्ता मनुष्य एकदम नांवारूपास येण्यास शांततेची वेळ उपयोगी नाहीं. शिवाजीराजांनीं हिंदुपद पादशाही स्थापन केली, त्यावेळीं जी परिस्थिती होती, तशी परिस्थिती शहाजीचे वेळेस नव्हती, हें उघड आहे. मनुष्य पुढें येण्यास जशी त्याचे स्वतांचे कर्तृत्व-शक्तिची जरूर असते, तशीच आसपासच्या सार्वत्रिक परिस्थितीचीही जरूर असते. तशी परिस्थिती, सत्पुरुषाचा आशिर्वाद आणि स्वतःच्या कर्तव्यतेची उमेद, ह्या सर्व गोष्टी मनांत आणून बाळाजीनें कारकुनी पेशा सोडून लष्करी पेशा स्वीकारला व धनाजी जाधव सेनापतीचें पथकांत ते शिरले; व उत्तरोत्तर कर्तबगारीनें धनाजीचे कारभारी बनले.

औरंगजेबाचे मृत्युनंतर त्याचा पुत्र अजीमशाह तख्तावर आल्यावर त्यानें शाहूराजे यांची सुटका केल्यामुळें, ते राज्यपदारूढ होण्याकरितां दक्षिणेंत येत असतां, हा खरा शाहू नसून तोतया शाहू आहे, असें त्या वेळेस मराठी राज्यसूत्रें हातांत असलेली ताराबाई ह्मणूं लागली. इतकेंच नव्हें तर त्याचें पारिपत्याकरितां परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि धनाजी जाधव सेनापती ह्यांचे बरोबर मोठी फौज देऊन त्यांना रवाना केलें. धनाजी बरोबर बाळाजीही होते. धनाजीनें चौकशी करतां हा तोतया नसून हे शाहू महाराजच आहेत अशी खातरी झाल्यावर रात्रीचे वेळीं धनाजी जाधव आपले मंडळीसह बसून विचार करीत असतां बाळाजी विश्वनाथ ह्यांनीं स्पष्ट व निर्भिडपणानें सांगितलें, कीं आपण व्यक्तीचे

नोकर नसून मराठी तख्ताचे नोकर आहोंत; शाहू महाराज हे वडील आणि गादीचे हक्कदार आहेत, तेव्हां खऱ्या धन्याचे विरुद्ध आपण युद्धास तयार होणें, ही गोष्ट निमकहरामपणाची आहे. शिवाय ताराबाईची आज्ञा तरी खरे राजे यांच्यांशीं लढण्याची नसून तोतयाचें पारिपत्य करण्याची आहे. तेव्हां ज्या पेक्षां पुढें आलेला शाहू तोतया नसून खरे राजे आहेत अशी सर्वांची खातरी झाली आहे, त्यापेक्षां त्यांच्याशीं लढणें सर्वथा गैर आहे. हें बाळाजीचें भाषण धनाजीसह सर्वांस पटलें. तेव्हां महाराजांस भेटून, त्यांचेशीं सलोखा करण्याचें काम धनाजीनें बाळाजीकडेच सोंपविलें. तें काम बाळाजींनें उत्तम प्रकारें पार पाडून धनाजीची व महाराजांची भेट करविली. पुढें ताराबाईचे पक्षाचा मोड होऊन महाराजांनीं सातारचे किल्यावर राज्याभिषेक करून घेतला. ( माघ शुद्ध पक्ष शके १६२९. ) तात्पर्य, ह्या घडामोडींतच बाळाजींचे उत्कर्षास प्रारंभ झाला; आणि हा उत्कर्ष ह्मणजे दीक्षितांच्या आशिर्वादाचें फळ होय, असें बाळाजीपंत पूर्णपणें जाणत होते, व त्याची साक्ष दीक्षितांचे इतिहासांत वेळोवेळीं येतें.

ह्याचें पहिलें उदाहरण ह्मणजे शके १६२९ चे माघ मासीं शाहूराजे गादीवर बसून राज्यव्यवस्था स्थीरस्थावर होतांच ह्मणजे शके १६३० चें भाद्रपद मासीं बाळाजींनीं महाराजापाशीं शिफारस करून दीक्षितांचें राहण्याचें गांवास ह्मणजे औरंगाबादेनजीकचें कसबें सातारें गांवास कोणाचा उपसर्ग लागूं नये ह्मणून एक अभयपत्र दीक्षितांचें करितां पाठविलें. तें पुढीलप्रमाणें आहे:—

श्री.
श्रीशंकर.
श्रीशाहुछत्रपतिरुपानिधी
प्रल्हादसुत गदाधर
प्रतिनिधी

अभयपत्र—समस्त राज-कार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री गदाधर पंडित प्रतिनिधी ताा० मोकदमानि कसबें सातारें पोा० दौलताबाद सुमा तिसा मया अलफ. कसबें माार वेदमूर्ति राजश्री नारायण भट अग्निहोत्री यांस सर्वमान्य ईनाम आहे ह्मणून वेदमूर्तिंनीं विदीत केलें. त्यावरून तुह्मांस अभयपत्र सादर केलें असें. तरी तुह्मी कीर्दि मामुरी करून सुखरूप राहणें. तुह्मास कोणाचा आजार लागणार नाहीं. येविशीं अभय असें. छ. ६ जामादिलाखर. पाा हुजूर ( लेखन सिमा ).

दीक्षितांचें दप्तरांत मराठी राज्यांतील सनदविषयक कायतो हाच आद्य लेख आहे. ह्या लेखांत बाळाजींचें नांव किंवा शिफारस वगैरे बद्दल जरी कांहीं उल्लेख नाहीं, तरी पण मराठी राज्यांत त्यापूर्वी दीक्षितांचा प्रवेश नवता अगर त्यांची माहितीही नसावी; कारण तसे कांहीं लेख अगर पत्रें उपलब्ध नाहींत. उलट ज्या घराण्यांत दंतकथा व आख्यायिका आहेत, त्या बाळाजी विश्वनाथासंबंधींच असल्यामुळें व बाळाजीचे उत्कर्षास आरंभ होऊन शाहू महाराजांचें पदरीं त्यांचा प्रवेश झाल्याबरोबर हें अभयपत्र लिहिलें गेलें असल्यामुळें अभयपत्र बाळाजींच्या शिफारशीनें मिळालें असलें पाहिजे या अनुमानास विशेष बळकटी येते.

वरील लेखावरून दुसरी एक गोष्ट सिद्ध होते, कीं शके १६३० पूर्वीं सातारें हा गांव दीक्षितांकडे " सर्वमान्य इनाम " चालू होता. सर्वमान्य ह्या शब्दाचा त्यावेळचें परिस्थित्यनुरुप अर्थ करावयाचा ह्मणजे " बादशाही देणगी " असाच होईल, असें या लेखकास वाटतें, व तसा अर्थ मानला ह्मणजे औरंगजेब बादशहासंबंधीं वर जी आख्यायिका दिली आहे, तिलाही पण ह्या लेखामुळें पुष्टी मिळते.

## अग्निहोत्र दीक्षा.

बादशहाकडून कसबें सातारें हा गांव ईनाम मिळाल्यानंतर ह्मणजे अनुकूल परिस्थिती प्राप्त झाल्याबरोबर दीक्षितांनीं आपलें घराण्याची पूर्वपरंपरागत अग्निसेवा साधण्याचे हेतुनें सोमपूर्वक आधान सिद्ध केलें, ह्मणजे अग्निहोत्र घेतलें. रोजचा भिक्षान्नाचा परिपाठ सोडून, दर पंधरा दिवसांनीं कोरान्न भिक्षा मागण्याची सुरुवात केली. असें ह्मणतात, कीं या भिक्षेचें धान्य दोन दोन चार चार गाड्या दर पंधरा दिवसांनीं मिळत असें व तें सर्व ब्राह्मणभोजनांत खर्च होत असें. सदर्हु अग्निहोत्राची दीक्षा शके १६२८ ते ३० चे दरम्यान केव्हां तरी घेतली असावी.

शके १६३० सालीं दीक्षितांचे चिरंजीव वासुदेव दीक्षित यांचें लग्न झालें. कृष्णाजी सदाशिव पेठे यांची कन्या सून केली. हे पेठे नाशीक जवळ देवळालीचे राहणारे असून औरंगाबादेस रोजगार निमित्त राहत असत. हे पेठे शके १६७३ सालीं वारले, तेव्हां त्यांची स्त्री सती गेली. ह्यांचे वंशज पुढें पेशवाई अखेर दीक्षितांचें जवळ होते. ह्यांचेकडे दीक्षितांचे निसबतीनें प्रां हरसूल हवेली औरंगाबाद

येथील कमाविशी पेशवे सरकाराकडून होती, व ती बाजीरावांचे अमलापर्यंत चालू होती. ह्या कमाविशीबद्दल पुढीलप्रमाणें आख्यायिका ऐकण्यांत आहे. बाळशास्त्री टोकेकर यांनीं दीक्षितांकडील ही कमाविशी काढण्याकरितां दुसरे बाजीरावांजवळ दोन वेळां प्रयत्न केले. एकदां दुसऱ्याचे कडून बरीच जास्त रक्कम ईजाफा वाढवून मागणी केली असतां पेशव्यांनीं नाहीं ह्मणून सांगितलें. दुसऱ्यानें तर शास्त्री बोवांनीं दुसऱ्याचें नांवें सनद अगदीं तयार करून समोर नेली असतां, श्रीमंतांनीं ती फाडून टाकिली; आणि बाळशास्त्री यांस सांगितलें, कीं मूळ पेशवाई मिळाल्यापासून हरसूल माहालचा मामला दीक्षितांकडे चालू असून त्याचा आजपर्यंत कोणीही त्यांस हिशेब विचारला नाहीं. ते देतील तो मक्ता जमा होत आलेला आहे. असें असतां तो मामला त्यांजकडून काढण्याचा तुह्मीं प्रथम प्रयत्न केला असतां मी नकार सांगितला होता; तरी पुन्हां तुह्मीं ह्या बाबतींत सनद लिहून आणिली हें आश्चर्य आहे ? ह्यावरून पेशवे घराण्याची दीक्षितांवरील भक्ती व्यक्त होते.

वासुदेव दीक्षितांचे लग्न झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं गोकुळ अष्टमीचें पारण्याचें दिवशीं एक बाल ब्राह्मण सकाळीं सोंवळ्यानें येऊन दीक्षितांचें कुटुंबास ह्मणाला, कीं मला फार भूक लागली आहे. बाईनीं सांगितलें, बाळ बैस, मी तुला फराळास देतें. असें ह्मणून बाईनीं दोन दशम्या व गुळ आणि तूप असें देऊन त्यास फराळ घातला व तो मुलगा गेला. पुढें पारण्याचें ब्राह्मणभोजन झालें. रात्रीं दीक्षितांचे स्वप्नांत एक ब्राह्मण येऊन ह्मणाला, कीं तुमचें कालच्या संतर्पणानें माझें समाधान झालें नाहीं, मला पक्वान्न आवडलें नाहीं; गुळ तुपाचें भोजन पाहिजे. त्यावरून दुसरें दिवशीं

दीक्षितानीं गुळ तुप व पांढऱ्या पोळ्यांचें ब्राह्मणभोजन घातलें, आणि त्या दिवसापासून ह्या घराण्यांत गोकुळ अष्टमीचें पारण्यास गुळ तूपच वाढण्याचा सांप्रदाय चालु आहे.

## काशीयात्रा व काशीवास.

दीक्षितांनीं एकदां श्रीक्षेत्र काशीयात्रेस जाण्याचा निश्चय केला. ही बातमी हां हां ह्मणतां चहूंकडे पसरून सरासरी १०००।१२००. मंडळी दीक्षितांचे सोबतीनें यात्रेस जाण्यास तयार झाली. त्या काळीं दीक्षितांसारख्या प्रसिद्ध सत्पुरुषाची सोबत मिळण्याची लोकांस फार जरूर भासत असल्यामुळें तशी संधी लोक दवडीत नसत, आणि ह्मणूनही दीक्षितांचे बरोबर वर सांगितल्याप्रमाणें मोठा मेळा जमला. मार्गांत यात्रेकरूंस कांहीं उपद्रव होऊं नये, ह्मणून औरंगाबाद येथील सुभेदारांचे दिवाण विसा मोरो ह्मणून एक गृहस्थ होते, त्यांनीं दीक्षितांबरोबर रस्त्यानें त्यांस कोणतेंही प्रकारें उपसर्ग न होणेबद्दल व मदतमाविज करणेंबद्दल एक परवाना देऊन आपले हद्दीपर्यंत २५ शिलेदारांची एक तुकडी बंदोबस्ताकरितां दिली; आणि आपले तीर्थरूप व मातोश्री यांस दीक्षितांबरोबर काशीस रवाना केलें. याप्रमाणें चरित्रनायक मोठ्या जमावासह यात्रेस चालले असतां मार्गांत शाहूराजांचे सरदार चिमणाजी दामोदर व परसोजी भोंसले यांनीं आपापले परवाने व शिबंदी बरोबर देऊन व यथोचित सेवा करून दीक्षितांची रवानगी पुढें केली. ते प्रयाग, गयादि क्षेत्रें करून श्रीक्षेत्रीं दाखल झाले. त्याचें पूर्वींच औरंगाबादेहून विसा मोरो यांनीं पांच लक्षाच्या हुंड्या काशिस त्यांचे आडत्याकडे पाठविल्या होत्या व ती रक्कम, नारायण दीक्षित पाटणकर तेथें महायात्रेस येत आहेत, त्यांस देण्यांत यावी, असें पत्र लिहिलें होतें. दीक्षित काशीस दाखल झाल्यावर, आडत्या

तें पत्र आणि रक्कम घेऊन दीक्षितांकडे आला, व त्यांस सर्व मजकूर श्रुत केला. दीक्षितांनीं कळविलें कीं मला रकमेची जरूर नाहीं, सबब पैसे परत करावे. हें ऐकून आडत्या व क्षेत्रवासी मंडळी दीक्षितांचा निरीच्छपणा पाहून थक्क झाली, व आडत्यानें सर्व मजकूर औरंगाबादेस कळविला. त्यावर विसा मोरो यांनीं धर्माचे उद्देशानें काढिलेले पैसे ठेऊन न घेतां काशीस परत पाठवून आडत्यास लिहिलें, कीं दीक्षितांस पुन्हा विनंति करून ही माझी भिक्षा स्वीकारलीच पाहिजे, माघारी सर्वथा पाठवूं नये ह्मणून विनंति करावी व रकम त्यांचे स्वाधीन करावी. याचप्रमाणें आपले वडिलांसही पत्र लिहिलें, व त्यांनींही बहुत प्रकारें दीक्षितांस विनंति केल्यावर दीक्षितांनीं भिक्षा गृहण केली. त्या द्रव्याचा विनियोग दीक्षितांनीं लोकोपयोगी कृत्याकडेच केला. ब्रह्मेश्वराचें देवळाजवळ ब्रह्मवाडी ह्मणून लहानशी काहार ( नावाडी ) लोकांची वस्ती होती, पण तेथें गंगेस घाट वगैरे नव्हता. त्या ठिकाणीं महाराष्ट्र ब्राह्मणांचे वस्तीस योग्य व मुबलग जागा पाहून गंगेस *दोन घांट बांधिले, व आपल्याकरितां एक मोठा वाडा बांधिला. आसपासची काहार वस्तीची जागा विकत घेऊन त्या ठिकाणीं महाराष्ट्र ब्राह्मणांस घरें बांधण्यास फुकट जागा व द्रव्याची मदत वगैरे केली. यांचे बरोबर जी कोंकणस्थ मंडळी काशीस आली होती, त्यांपैकीं ज्यांची घरें बांधण्याची इच्छा होती, त्यांसही जागा दिल्या. +बोडस, चितळे, पाटणकर, वझे, वगैरे मंडळींचे वाडे हल्लीं त्या ठिकाणीं

---

* ब्रह्मघाट व दुर्गाघाट.

\+ ह्या बोडस घराण्यापैकींच प्रसिद्ध विद्वान महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस हे होत. ह्यांचें कायगांवास एक घर व गणपतीचें देऊळ आहे.

आहेत. वझे यांचे घरतर दीक्षितांचें वाड्यांतून उरलेल्या सामानांत बांधून दिलें असें वझे यांचे वंशस्थ अझून सांगतात. ह्या वस्तीस दीक्षित-पुरा किंवा ब्रह्मघाट असें ह्मणतात. ह्याच ठिकाणीं पुढें प्रतिनिधी, सांगलीकर, रामदुर्गकर, नाना फडणीस, वगैरे मोठमोठ्या दक्षिणी सरदारांचें वाडे झाले व ते हल्लींही कायम आहेत.

मराठी रियासत मध्य विभाग ३, पृ० २४८ व २९७ यांत सरदेसाई लिहितात:—" नारायण दीक्षित कायगांवकर मूळचा साधुवृत्तीचा गृहस्थ होता; त्यानें काशींत प्रतिमहाराष्ट्र उत्पन्न केलें. त्याच्या मुलांनीं व नातवांनीं मूळचा साधुवृत्तीचा पेशा कायम ठेऊन, त्यांत सावकारीची व राज-कारस्थानाची भर घातली. ही दीक्षितमंडळी ह्मणजे उत्तरेंतील एक महाराष्ट्रीय शक्ती होती. त्यांच्या कृपेची व आशिर्वादाची लालसा महा-राष्ट्रीय लोक तर ठेवीतच, परंतु अनेक मुसलमान सरदार व प्रत्यक्ष बादशहा सुद्धां ती लालसा धारण करीत. (का. सं. प. या. ३७)"× × बादशाहाच्या दरबारांत सुद्धां त्याचा मान मोठा होता. " बाळकृष्ण दीक्षित दिल्लीस गेला तेव्हां त्यास बादशहानें आदरपूर्वक सन्मानानें शहरांत आणिलें. भेटीचे दिवशीं खुद्द बादशहा दरवाजापर्यंत सामोरे येऊन हात धरून नेऊन बसविलें. फार सत्कार ठेऊन बोलले कीं राजा शाहूचे जे गुरु व ज्या थोरले दीक्षित महाराजांचा पूर्ण आशिर्वाद औरंगजेब बादशहावर जाला, त्यांच्या आशिर्वादानें या बादशाहीची दिवसेंदिवस ऊर्जित दशा आहे. आपले वडील पैगंबरा-प्रमाणें होऊन गेले. आपली तीच योग्यता आहे. तेव्हां आपण येथें येऊन दर्शन दिल्यामुळें आह्मीं आज कृतार्थ झालों, वगैरे भक्ति-पूर्वक भाषणें करून थोरले नारायण दीक्षित महाराजांच्याप्रमाणें सन्मान ठेविला. नंतर पंधरा हजारांचा गांव, जहागिरीचें फर्मान व

पोषाख, पालखी, मोरचेल, चवरी, जवाहीर, वगैरे खिलत दिली, आणि लिहिलें, दीक्षितांस जाहगीरच काय, त्यांचे पुण्य बलवत्तर, त्यांजवर ईश्वराची कृपा, व आपण त्यांचे शिष्य, तेव्हां त्यांस काय कमी आहे ? परंतु रियासतीचें कल्याण व आह्मीं कृतार्थ व्हावें याकरितां ही यत्किंचित् सेवा केली. याप्रमाणें पत्र आलें." हें पत्र पेशव्यानें वासुदेव दीक्षितांस लिहिलेलें आहे. [ सन १७५५, खंड ११-८९ ]

विसा मोरो यांची भक्ती व श्रद्धा दीक्षितांचे ठिकाणीं फार होती. कालेंकरून त्यांनीं चतुर्थाश्रम घेऊन ते सातारे येथें समाधिस्त झाले. त्यांची समाधी हल्लीं साताऱ्यास नदीतीरीं दाखवितात. साताऱ्यास त्यांचा वाडा आहे, तो त्यांनीं दीक्षितांस दिला; तो दीक्षितांचे वंशाकडे असून मोडकळीस आलेला आहे.

ह्याच सुमारास दीक्षितांच्या प्रथम पत्नी लक्ष्मी बाई स्वर्गवासी झाल्या. त्यांचे और्ध्वदेहिक आटोपल्यावर लागलीच मोरभट बापट यांची कन्या चांगली उपवर पाहून त्यांनीं दुसरें लग्न केलें. नंतर चयनपूर्वक पुनराधान करून लक्ष ब्राह्मणभोजन पंचपक्वान्नाचें घातलें. आपण काशीवासास राहून चिरंजीव वासुदेव दीक्षितास कुटुंबासह देशीं रवाना केलें.

## श्री अन्नपूर्णेची पाकनिष्पत्ती.

काशीवासांत असतांना एके दिवशीं तीन प्रहरचे वेळीं यात्रेकरू तेलंग ब्राह्मणांचा एक मेळा आला. भोजन कोठें मिळेल ह्मणून मेळेवाल्यांनीं तपास केला, तेव्हां दीक्षितांकडे सोय व्हावयाचीच, असा लौकिक क्षेत्रांत झाला असल्यामुळें, इतर कोठें न जातां सदर्हु

मेळा त्यांचेकडे गेला. या ब्राह्मणांस भोजनाचें आश्वासन देऊन साहित्य सिद्ध केलें. पण पाकनिष्पत्तीकरितां कोणी मिळेना. क्षेत्रांतील आचारी पाणके आपआपले धंदे आटोपून शांभवीचा स्वीकार करण्याचे तयारींत, तर कोणी स्वीकार करून तदाधीन झालेले. सर्वांकडून नकारच मिळाला. त्यामुळें दीक्षित चिंताग्रस्त होऊन आंतून बाहेर व बाहेरून आंत ह्याप्रमाणें सारख्या येरझारा घालीत होते. ब्राह्मण मार्गाचे श्रमानें क्षुधित झालेले. आतां स्नानसंध्या करून येतील, त्यांस काय वाढावें, अशा विवंचनेंत दीक्षित आहेत, तों आदिमाया श्री अन्नपूर्णेनें, वृद्ध स्त्रीचे रूपाने, दीक्षितांचें घर गांठलें आणि ह्मणाली, कीं असल्या पुण्यकर्मास आपणांस कोणी साह्य मिळत नाहीं, तर मला तो लाभ घेऊं द्यावा; मी स्वयंपाक करते. दीक्षितांनीं बाईची विनंति मान्य केली व संकटीं आश्रय दिल्याबद्दल ते परमेश्वराची प्रार्थना करूं लागले. पुढें लौकरच बाईनीं पाकसिद्धि झाल्याची आरोळी दिली. उघडच आहे, सर्व जगाचे अंतरांत वावरणारी अन्नपूर्णा जेथें उभी आहे, तेथें उशीर कसला किंवा कमतरता कसली! सारांश घरच्या मनुष्यापेक्षां टापटिपीनें व व्यवस्थेनें सर्व तयारी करून ब्राह्मण जेवावयास घालण्याचा समारंभ आटोपला.

स्वयंपाक करण्याचे वेळीं नाकांतील नथ काढून ठेवण्याची प्राकृत बायकांची रीत आहे; त्यास अनुसरून व भक्ताचा महिमा वाढविण्यासाठीं देवीनेंहि नथ काढून दीक्षितांचे घरीं धुराड्यांत ठेविली. सायंकाळचा समय, भक्तजनांकडून सेवा घेण्याची वेळ, अथवा आपल्या भक्ताची कीर्ति चिरस्थाई करण्याचा हेतु, ह्मणूनच कीं काय, देवी नथेविहितच स्वस्थानीं गेल्या. सायंकाळीं पुजासमयीं देवीच्या नाकांत नथ नव्हती! इकडे तिकडे, निर्माल्यांत, वस्त्रांत सर्व ठिकाणीं पुजा-

त्यांनीं पाहिलें, पण नथ सांपडेना; याला विचार, त्याला विचार, परंतु पत्ता लागला नाहीं. जे गाभाऱ्यांत जाणारे ते कबूल करीत नाहींत आणि नथ तर नाहीं; नुकसान थोडें थोडकें नाहीं, पांच हजारांची नथ. पुजाऱ्यांस कांहीं सुचेना. अशा चिंताग्रस्त स्थितींत ते रात्रीं निजले असतां त्यांस दृष्टांत झाला, कीं काल मी दीक्षितांच्या घरीं स्वयंपाकास गेले असतां तेथें धुराड्यांतील कोनाड्यांत नथ काढून ठेविली आहे, ती घेऊन यावी. दुसरें दिवशीं सकाळीं पुजाऱ्यांनीं सदर्हू स्वप्न देवस्थानचे अधिकाऱ्यांस सांगितल्यावरून, अधिकारी पुजारीमंडळीसह दीक्षितांचे घरीं आले; व दृष्टांताप्रमाणें स्वयंपाक घरांतील धुराड्याचें कोनाड्यांत जाऊन पाहतात तों नथ जशीच्या तशीच तेथें सांपडली. दीक्षित यज्ञशाळेंत संध्या करीत बसले होते, त्यांस हा मजकूर कळला. तें ऐकून त्यांस फारच गहिंवर आला, व, हे जगन्माते ! तुला या दासाकरितां किती श्रम करावे लागले, वगैरे प्रकारें त्यांनीं स्तुति केली. सर्व शहरांत ज्याचे त्याचे तोंडीं हीच गोष्ट झाली. सर्व क्षेत्रांत दीक्षितांवरील ईश्वरीकृपेबद्दल फारच लौकिक होऊन ते सत्पुरुष म्हणून त्यांचेवर लोकांची श्रद्धा बसली. इतकेंच नव्हें, तर अढळ श्रद्धेनें प्रेरित होऊन, लोक, देवीनें स्वयंपाक केला त्या वाड्यांतील पाकशाळेच्या कोपऱ्याची पूजा करूं लागले, व ती कोपऱ्याची पूजा ह्या वेळपर्यंत श्रद्धापूर्वक होत आहे.

## सातारें गांवचें इनाम.

शाहू छत्रपतींकडून बाळाजी विश्वनाथ यांस “ सेनाकर्ते ” हें पद (ता० २०।८।१७११ ) मिळालें व अधिक भाद्रपद वद्य ५ शके १६३३ रोजीं त्यांस फौजेचे बेगमीस सरंजाम मिळाला. ह्या महत्पदप्राप्तीबद्दल दीक्षितांचे आशिर्वादाची कृतज्ञता मनांत आणून श्री शाहू छत्रपतींजवळ शिफारस करून कसबें सातारें ह्या गांवाबद्दल इनामपत्र तयार करून घेऊन तें बाळाजीनें दीक्षितांकडे पाठविलें. कारण हा गांव औरंगजेबाकडून

जरी मिळाला होता, तरी त्याची सनद नाहीं, ही गोष्ट बाळाजीस माहित होती. इनामपत्राचें अभावीं गांवास हरकत होऊं नये, हाच उद्देश सदर्हु इनामपत्र व पृष्ठ २५ मधील अभयपत्र पाठविण्यांत व्यक्त होतो. ही सनद खालीं दिल्याप्रमाणें आहे.

शके १६३३, (ता. १९।११।१७११).

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३८ खरनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध नवमी सौम्यवासर क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शाहुछत्रपती स्वामी याणीं मोकदमानी कसबें सातारें तर्फ मार प्रांत दौलताबाद याशीं

श्री
शाहुनरपतिहर्ष
निधान मोरेश्वरसुत
भैरवप्रधान

आज्ञा केली ऐशीजे. वेदमूर्त राजश्री नारायण भट बिन गोविंद भट उपनाम पाटणकर अग्नहोत्री गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबा मार हे किल्ले सातारियाचे मुकामीं स्वामी संन्निध येऊन विनंति केली जे. आपण कुटुंब वत्सल श्रौत स्मार्त कर्म करून स्वामीस आशिर्वाद देऊन आहों. योगक्षेमाचा निर्वाह स्वामींनीं केला पाहिजे. ह्मणून त्यावरून मनांस आणितां भट गोसावी बहुत थोर ब्राह्मण, भले, योग्य, अग्निहोत्रादि श्रौत कर्मे आचरोन स्वामीस आशिर्वाद देऊन आहेत. योगक्षेम चालवणें स्वामीस अवश्यक असें जाणून कसबा मार. कुलबाब, कुलकानु, देखिल हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरु, पाषाण, निधी, निक्षेप, आदिकरून, हकदार व इनामदार खेरीजकरून, भट गोसावी यांस इनाम दिल्हा असे. तरी तुह्मी भट गोसावी यांस रुजू असोन कसबे मारचा ऐवज प्रतिवर्षी भट गोसावी यांस पाववीत जाणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन हें मुख्य पत्र भट गोसावी यांजवळ भोगवटियास देणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. सदरहु इनाम भट गोसावी यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस दिल्हे असें. तरी तुह्मीं कसबे मार.चा ऐवज यांस

व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस प्रतिवर्षीं पाववीत जाणें. जाणिजे लेखना लंकार. मोर्तब.

मर्यादेयं राजते

सुरुसुद्र चार.

## कायगांवचें इनाम.

शके १६३६ सालीं दीक्षित काशीहून अयोध्या, मथुरा, द्वारका वगैरे यात्रा करून देशीं आले, व सातारे येथें त्यांनीं खिरीचे लक्ष भोजन घातलें.

शके १६३७ चें श्रावण शुद्ध १२ रोजीं दीक्षितांचें द्वितीय कुटुंब गंगाबाई ह्या प्रसूत होऊन पुत्र झाला. हें द्वारकाधीश श्रीकृष्णाचें कृपाफळ समजून दीक्षितांनीं त्याचें नांव बाळकृष्ण ठेविलें. पहिला पुत्र गर्भांत असतांच भगवान् वासुदेवानें दर्शन देऊन त्याचे बारशाची भगवानानें सर्व तरतुद ठेविली व रुक्मिणी जगन्मातेनें सर्व लोकांस वाढिलें होतें. त्याचप्रमाणें बाळकृणाचें जन्मापूर्वीं श्री अन्नपूर्णेनें स्वत: पाकनिष्पत्ती करून दीक्षितांचें साधुत्वाबद्दल चहुंकडे कीर्तिरूप परिमल पसराविला होता. बाळकृष्णाचे जन्मोत्सवानिमित्त एक महिनाभर ब्राह्मणभोजन होत होतें, असें ह्मणतात.

दर एकादशीस सकाळीं घरीं होम वगैरे आटोपून मध्यान्हीं पैठण अगर कायगांवीं गोदास्नानास जावयाचें व सायंकाळीं होमास घरीं परत यावयाचें असा दीक्षितांचा नियम होता. एके वेळीं कायगांवीं आलें असतां गांवकऱ्यांनीं येथें येऊन रहावें ह्मणजे गांव आबाद होईल, असा दीक्षितांस आग्रह करून वाड्यास जागा व इनाम देऊन पत्र करून दिलें. ( परि. नं. ३ )

दीक्षितांनीं कायगांव येथील गांवकऱ्यांचे विनंतीस मान देऊन तेथें घर बांधण्यास सुरुवात केली. ही बातमी बाळाजीपंत यांस समजली. त्यांस पेशवाईचें पद या वेळीं प्राप्त झालें होतें. लागलींच त्यानीं श्रीमंत शाहु छत्रपतींजवळ शिफारस करून मौजे कायगांव हा गांव कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी वंशपरंपरा नवीन इनाम करून देवविला. त्या सनदेची नक्कल खालीलप्रमाणें आहे.

## नारायण दीक्षित.

शके १६३९, (ता. २१।९।१७१७)

श्री

वर्धिष्णु
विक्रम शंभु सुनो
रसौ मुद्रा शिवराज-
स्य राजते

स्वातिश्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनाम संवत्सरे भाद्रपद बहुळ सप्तमी इंदुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा शाहु छत्रपती स्वामी यांनीं वेदमूर्ति नारायण भट बिन गोविंद भट, उपनाम पाटणकर,

श्री
राजाशाहुछत्रपती
हर्ष निधान बाळाजी
विश्वनाथ प्रधान

श्री
श्रीआई आदि पुरुष
श्रीराजाशाहुछत्रपती स्वामी
कृपानिधी तस्य श्रीनिवास
परशुराम प्रतिनिधी

गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन अग्नि-होत्री वास्तव्य कसबें सातारें याशीं दिल्हे ईनाम पत्र ऐसेजे. तुमचे विशयीं राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांनीं स्वामीसंनिध किल्ले साता-र्‍याच्या मुक्कामीं विनंती केली जें. वेदमूर्ती त्रिकाळ स्नानसंध्या अग्नि-होत्रादि षट्‌कर्में आचरोन स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून आहेत. यांना योगक्षेम चालिला पाहिजे याजनिमित्त एक गांव ईनाम देऊन चालविलें पाहिजे. ह्मणून त्यावरून मनास आणितां तुह्मी भले ब्राह्मण, योग्य, वेदशास्त्रसंपन्न स्नानसंध्यादिक षट्‌कर्में आचरोन आहां. एदर्थ निमित्य तुमचे चालविल्या स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण आहे. याजकरितां तुमचें चालवणें स्वामीस अवश्यक जाणून स्वामीनीं कृपाळु होऊन मौजे कायगांव प्रों गांडापुर हा गांव कुलबाब कुलकानू खेरिज हक्कदार व ईनामदार देखिल हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, पाषाण, निधि, निक्षेप, आदिकरून चतुःसिमापूर्वक तुह्मास

व तुम्हचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सर्वमान्य ईनाम दिल्हा असें. तरी तुम्ही मौजे मार ईनाम अनभऊन सुखरूप राहणें. लेखना लंकार. मोर्तब.

मर्यादेयं राजते.

तारीख २० सौवालसुासमान रुजूसंमतमंत्री

बार सुद्रसुरुसुद्र बार बार

## सातारें गांवचें सरदेशमुखी इनाम.

ईसवी सन १७१९ ह्मणजे शके १६४०।४१ या सालीं बाळाजी विश्वनाथ पेशवे हे दिल्लीस जाऊन बादशहापासून शाहू राजाचें नांवे चौथ सरदेशमुखीच्या सनदा ता० २४।३।१९ रोजींच्या घेऊन आल्यानंतर कसबें सातारें या गांवचा सरदेशमुखी अमल ईनाम करून देऊन सनदा करून दिल्या त्याच्या नक्कला.

श्री

वर्धिष्णुर्विक्रम
शंभुसूनोरसौमुद्रा
शिव राजस्य राजते

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४६ विकारीनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध सप्तमी भानुवासरे क्षत्रीय कुलावतंस राजा शाहू छत्रपती स्वामी यांणी वेदमूर्ती राजश्री नारायण भट बिन गोविंद भट उपनाम पाटणकर गोत्र

श्री
राजाशाहुछत्र
पती हर्ष निधान बाळा
जी विश्वनाथ प्रधा
न

श्री
आई आदि पुरुष
राजाशाहुछत्रपती
स्वामी कृपानिधी तस्य
परशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

शांडिल्य सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबें सातारें यांशीं दिल्हें ईनाम पत्र ऐसिजे. तुह्मी स्वामी संनिध किल्ले

साताऱ्याच्या मुक्कामीं येऊन विनंती केली कीं कसबें मा।र ता। मा।र प्रांत दौलताबाद हा गांव कुलबाब कुलकानू पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें ईनाम दिल्हा आहे. त्याप्रमाणें आपण ईनाम अनुभवीत आहों. त्यास कसबें मा।र चा सरदेशमुखीचा ऐवज परभारा वसूल होतो. ऐशियास तो सरदेशमुखीचा ऐवज ईनाम करून दिल्हियानें स्नानसंध्यादि षट्कर्मे आचरोन ब्राह्मणसंतर्पण करून स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून राहूं ह्मणोन, त्यावरून मनास आणून तुह्मीं बहुत थोर ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न अग्निहोत्री प्रत्यहीं ब्राह्मणसंतर्पण करितां यास्तव तुमचे चालवणें स्वामीस आवश्यक जाणोन स्वामी तुह्मावरी कृपाळु होऊन मौजे मा।र कुलबाब कुलकानू तुह्मास व तुमच्या पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें ईनाम दिला आहे. त्याप्रमाणें हल्लीं सरदेश मुखीचा ऐवज परभारा वसूल होतो. तो तुह्मास वंशपरंपरेनें ईनाम दिल्हा असें. तरी तुह्मी कसबें मा।रचा ऐवज कुलबाब कुलकानू देखील सरदेशमुखी, खेरीज हक्कदार व ईनामदार अनभऊन सुखरूप राहणें. लेखनालंकार. मोर्तब

मर्यादेयंराजते.

रुजुसुरुनिविस

तारीख २० मोहोरम सु॥ अशरीनमया

बार सुद्र सुरूसुद्र बार

शके १६४१, ( ता० १६।१२।१७१९ )

श्री +

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री

बापुजी बल्लाळ गो। यांस

सेवक बाळाजी विश्वनाथ प्रधान नमस्कार सुरु सन अशरैन मयाव अलफ कसबे सातारें सा। दौलताबाद हा गांव वेदमूर्ती नारायण

+ ह्यावर दिलेल्या सनदेच्या तारखा व बाळाजी विश्वनाथ यांच्या अभ्यु–

भट अग्नोत्री यांस ईनाम कुलबाब कुलकानू देखील सरदेशमुखी करून दिल्हा आहे; व येविशीं राजश्री स्वामींची दानपत्रें सादर झालीं आहेत, तरी तुम्ही मौजे मार वेदमूर्तीस ईनाम चालविणें सरदेशमुखी व आणखी किरकोळ तगादा न लावणें. सद्रहु ईनाम वेदमूर्तीस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें. या पत्राची प्रत लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवटियास वेदमूर्तींजवळ परतोन देणें. जाणिजे छ० २५ मोहोरम [ लेखन सीमा ]

ह्याचप्रमाणें जोत्याजी केसरकर यांचें पत्र आहे. ( परि० नं० ४ )

## बाळकृष्णाचा व्रतबंध व लग्न.

शके १६४४ सालीं बाळकृष्ण दीक्षित याचा व्रतबंध श्रीक्षेत्र द्वारकेस करण्याचें निश्चयानें नारायण दीक्षितांची यात्रेस जाण्याची तयारी झाली. ह्या वेळचे यात्रेचा थाट तर पहिले पेक्षांही अनुपम होता. ह्यावेळीं पांचशें स्वारांचे पथक, मार्गांत सर्व ठिकाणीं बंदोबस्ताचे परवाने वगैरे बाजीराव साहेब पेशवे यांचे साह्यानें मिळाले होते. यात्रेचा जमाव ही मोठा होता. द्वारकेस पोंचल्यावर सुमुहूर्तावर श्रीसंन्निध उपनयन विधि उरकला.

दीक्षित पूर्ण कृष्णभक्त, स्थल श्रीकृष्णाची द्वारका नगरी, आणि मौंजीबंधन* बाळकृष्णाचें ! ! मग त्या योगास काय विचारावें ? मौंजीबंधनानंतर बटु बाळकृष्ण भिक्षेस निघाला, तों प्रत्यक्ष द्वारका-

---

द्याच्या तारखा ताडून पाहिल्या असतां व पृ. ४३ मधील चिमणाजी बल्लाळ आणि बाळाजी बाजीराव यांचे पत्रांतील मजकूर नीट मनन केला असतां बाळाजी विश्वनाथ यांचा दीक्षितांचे आशिर्वादानंतर अभ्युदय झाला व ती गोष्ट बाळाजी विश्वनाथ व पुढील पेशवे कसे जाणून होते हें वाचकांचे लक्षांत येईल. मुळांत कांहीं असल्यावांचून दंतकथा प्रचारांत येत नाहींत, हें स्पष्ट आहे.

* शके १६४५

धीश श्रीकृष्णानें आपल्या पूजेची सुवर्णाची झारी बटूस प्रथम भिक्षा ह्मणून घातली. जन्मास येऊन आणखी मिळवावयाचें तें काय ?

याच ठिकाणीं व याच खेपेस दुसरा असा चमत्कार झाला, कीं एके दिवशीं सायंकाळीं श्रीकृष्णमूर्ती पाळण्यांत निजली आहे, भक्तमंडळी आंदोलनपूर्वक स्तुतिगीतें गात उभी आहेत, तों भगवान् चटकन उठून दीक्षितांचे समीप येत असतां, दीक्षितांनीं ती मूर्ती आपले ओंजळींत घेऊन "देवा निद्रेचा समय अझून झाला नाहींना ?" असें ह्मणून मूर्तीस दृढ आलिंगन दिलें. भक्तशिरोमणीस प्रेमपान्हा अनिवार होऊन श्रीकृष्ण, श्रीकृष्ण, या नामसंकीर्तनांत निमग्न होऊन दीक्षित नाचूं लागले ! हा अनूपम देखावा पाहून "वाहवारे भक्त" ह्मणून एकच गर्जना झाली, आणि श्रीकृष्णापेक्षां त्याच्या प्रेमळ भक्ताच्याच महिमेचा विषय सर्वतोमुखीं झाला. इतकेंच नव्हें तर पुजाऱ्यास दृष्टांत झाला, कीं मला दीक्षितांचें घरीं जाणें आहे. त्यावरून ती भोगमूर्ती पुजाऱ्यानें दीक्षितांकडे आणून पोंचविली. ती मूर्ती हल्लीं कायगांव येथें बाळकृष्ण दीक्षितांचे वंशजाजवळ असून तेथें दरसाल श्रावणमासीं श्रीचा जन्मोत्सव व पारणें मामूलीप्रमाणें होत असतें. भिक्षावळींत मिळालेली सुवर्णाची झारीहि याच ठिकाणीं होती. परंतु कालचक्राचे फेऱ्यांत शके १७२४ सालीं होळकरगर्दीची धाड येऊन कायगांव येथील दीक्षितांचा वाडा लुटून ६ लक्ष रुपयांची लूट नेली, त्यांत सदरहु झारीही गेली. असो द्वारकेस सांप्रदायाप्रमाणें दोन लक्ष ब्राह्मण भोजन घालून दीक्षित श्रीक्षेत्र काशीस आले. तेथें कांहीं दिवस वास करून शके १६५० सालीं परत आपले देशांत आले.

ह्यावेळीं कायगावचे वाड्याचे व गंगेवरील घाटाचें काम तयार झालें होतें. त्याची वास्तुशांती व ब्राह्मणभोजन करून दीक्षित स्वतां सातारे

येथें न राहतां कायगांवींच राहूं लागले. बाळकृष्ण दीक्षितांचे पाठी-वर कन्या झाली तिचें नांव मथुरा ठेविलें होतें. तिचें लग्न ह्याच सालीं केलें. बाबु दीक्षित जोगळेकर नाशीककर यांस ती दिली. कोंकणांत पाटणकरच उपाध्ये, पण देशांत उपाध्ये नाहींत सबब जांवई यांस उपाध्यिक दिलें. तें घराणेंच हल्लीं दीक्षित घराण्याचें कुळोपाध्ये आहे. वासुदेव दीक्षित यांचे पुत्र गोविंद दीक्षित यांचा जन्मही याच सालीं ज्येष्ट कृष्ण २ शके १६५० सालीं झाला.

बाळकृष्ण दीक्षित याचें लग्न अंताजी नाईक मराठे यांचे कन्येशीं निश्चित करून शके १६५५ चें माघमासीं तें केलें. सुनेचें नांव रुक्मिणी ठेविलें.

## देणग्या व इनामें आणि दीक्षितांचा मृत्यु.

मौजे कायगांव येथील सरदेशमुखी अमलाबद्दल कामदारांकडून उपसर्ग होऊं नये ह्मणून बाजीराव यांनीं आज्ञापत्र पाठविलें तें परि. नं० ५ चें पहा.

शके १६५५ सालीं निजामुल्मुल्क बाहादुर यांची व बाजीराव साहेब यांची समक्ष भेट झाली त्या वेळीं कायगांवास मोंगलाचा उपसर्ग लागतो तो न लागावा या करितां त्यांचा परवाना घेऊन पाठविला. त्याचा मराठी तरजुमा परि. नं० ६ चा पहा. ह्याच वेळीं बाजीराव साहेब यांनीं बाळाजी विश्वनाथानीं पूर्वीं दिलेलें पत्र दीक्षितांजवळ परत मागितलें असतां वासुदेव दीक्षित जरा साशंक दिसले. तेव्हां दीक्षित त्यास ह्मणाले पत्रांतच काय जास्त आहे. पत्र असून त्यांचे मनांत नसतां पत्राचा काय उपयोग ? त्यांचे मनांत संशय आला त्यापेक्षां पत्र देऊन त्यांचा संतोष ठेवणें हें उत्तम. असें ह्मणून पत्र परत दिलें. राज्यवृद्धीचे महत्वाकांक्षेमुळें दीक्षित राज्यांत वांटेकरी होतील, तें न व्हावें ही बाजीरावची भावना असावी.

शके १६५६ सालीं दीक्षित काशीस गेले. ते बहुतेक तेथेंच राहिले. बरोबर कनिष्ट पुत्र बाळकृष्ण दीक्षित सहकुटुंब नेले.

शके १६५७ सालीं मथुरेसन्निध धर्मकृत्यास दहा गांव, तेथें आपला अमल बसला ह्मणजे देऊं, असें बाजीराव यांनीं पत्र दीक्षितांचें नावें पाठविलें आहे. (परि. नं० ७) ह्या पत्राबद्दल सरदेसाई मध्यविभाग पु० ३ पानपत प्रकरणांतील पान २९६ वर लिहितात—" नारायण दीक्षितानें बाजीरावाजवळ मथुरेसन्निध धर्मकृत्यास दहा गांव मागितले, याचा अर्थ बाजीरावानें तो प्रांत जिंकण्याचा उद्योग करावा असा दीक्षितांचा उद्देश होता. त्या वेळच्या लौकिक भावना कशा प्रकारच्या होत्या हें यावरून दृग्गोचर होतें. "

शके १६५९ सालीं श्रीमंतानीं बुंदेलखंड सर केल्यानंतर दीक्षितांस रुपये १२००० धर्मादाय खर्चाकरितां पाठविलें. ( परि. नं० ८. )

शके १६६० सालीं हरसूल वगैरे महालच्या जकातीचा अंमल दीक्षितांस ईनाम दिला व सनद दिली. ( परि. नं० ९ ) ह्याच सालीं दीक्षितांच्या द्वितीय पत्नी गंगाबाई ह्या काशीक्षेत्रीं कैलासवासी झाल्या.

शके १६६२ चे वैशाख मासीं बाजीराव साहेब मृत्यु पावले. बाळाजीस पेशवाईची वस्त्रें मिळाल्यानंतर लागलींच त्यांनीं आश्विन मासीं दीक्षितांस पत्र पाठविलें. तें चिमाजी आपा व बाळाजी या दोघांचें नावें लिहिलेलें आहे. त्यावरून दीक्षितांचें ठिकाणची त्यांची श्रद्धा आणि दीक्षितांचा निरपेक्ष उपदेश त्यांना किती पटत असला पाहिजे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. श्रीमंतांचें पत्रांतील पहिलें कलमांत संसर्ग दोषाचे परिहाराबद्दल व दुसरें कलमांत वेदोक्त अनुष्ठानें करण्याबद्दल व त्याचप्रमाणें स्वधर्मे करून आचरण करणें व दुराचारी यांस शासन करणें ह्या गोष्टींचा जो उल्लेख आहे तो मननीय असल्यामुळें साद्यंत पत्रच पुढें देत आहे.

श्री

वैशाख व॥ ५ सोमवार शके १६६२, ( ता० २९।९।४० )

तीर्थरूप वेदशास्त्र संपन्न राजश्री दीक्षित स्वामी, वडिलांचे शेवेशी. अपत्य चिमणाजी बल्लाळ व बाळाजी बाजीराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती क्षेम. आश्विन वद्य ५ मुक्काम कसबे पुणें स्वामीच्या कृपेंकरून यथास्थित असे विशेष. स्वामीनीं ज्येष्ट शुद्ध १० चें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर अर्थ कळला. सारांश स्वामींचें आशिर्वादाचा सर्व आमचा विचार आहे. स्वामींच्या आशिर्वादापेक्षां दुसरें दैवत जाणत नाहीं.

१ संसर्ग दोषांचा परिहार करावा. या विशीं आज्ञा लिहिली तर अवश्यक स्वामींचें आज्ञे प्रमाणें वर्तणूक करूं.

२ कोणी मंत्रशास्त्री भेटतील, कांहीं अनुष्ठान करा ह्मणतील तर ते गोष्ट न करणें. कोणाचा मंत्र न घेणें. शिवपूजन व विष्णुपूजन, व गायत्रीचा जप, व वेदोक्त अनुष्टानें करीत जाणें, ह्मणून लिहिलें. तर आज्ञे प्रमाणेंच करीत जाऊं. स्वधर्मेंकरून आचरण करणें. कोणी दुराचरण करीत असतील त्यांस शासन करावें ह्मणून लिहिलें; त्यास अवश्यमेव लिहिल्याप्रमाणेंच वर्तणूक करूं.

३ रायांचें वैभवाची वृद्धी व्हावी यास्तव आपण बहुत श्रम आज पावेतों केलें, पुढें जों पर्यंत आपण आहे तों पर्यंत तुमच्या कल्याणास्तव श्रम करावयास अनुमान न करूं ह्मणून लिहिलें; तर राऊ स्वामीस मातापित्रांचें ठाईं मानीत होतें; त्यांच्या कल्याणास्तव स्वामीनीं श्रम केलें तर ते गोष्टीचें अपूर्व काय आहे ? बालकाचें

---

१ थोरले बाजीरावानें मस्तानी घरांत बाळगल्यानें सर्व कुटुंबी यांस जो संसर्गदोष पर्यायानें झाला, त्या बद्दल. २ बाजीराव. ३ देवतार्चन.

कल्याण इच्छावें हें मातापितरांस सांगावें लागतेंसें नाहीं. पुढें ही आह्मी लेंकरें स्वामीचीं आहों. आमचें कल्याण व आमची बुद्धी उत्तम कर्माच्या ठाईं दिवसेंदिवस ( लागून ) यशाची अभिवृद्धी होय, ऐसा आशिर्वाद स्वामी देतीलच. व देवाची प्रार्थना करतीलच. यांत संशय नाहीं.

४ राजश्री लक्ष्मण शंकर बुंदेल खंडांतिल, त्यांचे हातून स्वामीकडे खर्चास रवाना करवितों. तो ऐवज स्वामीपाशीं पावता होईल, तो घेऊन उत्तर त्याजपाशीं द्यावें. ऐवजाचा अंगिकार करावा, माघारा सर्वथा पाठऊं नये.

५ अक्रा कावडी रामेश्वरास पाठवाव्या, ह्मणून आज्ञा लिहिली; ऐशियास स्वामीनीं तेथें ब्राह्मण योजून तेथुंनच अक्रा कावडी रामेश्वरास रवाना कराव्या. त्यास पैका पडेल तो लिहून पाठवावा पाठऊन देऊं.

६ राज्यप्राप्तीकरितां पूर्वीं सत्ताविस लक्ष दूर्वा वाहिल्या आहेत, बाकी ब्याहत्तर लक्ष राहिल्या आहेत, त्याचा विध राजश्री वासुदेव दीक्षितांस ठावका आहे. ते विशीं त्यांस सांगितलें असें. ते दूर्वा देवांस वाहतील.

७ चिरंजीव नांनास आमची आज्ञा मान्य असें असेल तर त्यांचे पत्र आज पावेतों आह्मास आलें नाहीं. त्यांचे पत्र आल्यावर त्यांस पाठवित जाऊं, ह्मणून लिहिलें; तर आज पावेतों रायांनीं

---

१ श्रीक्षेत्र काशी येथून. २ श्रीविद्यागणपती ( द्वादश भुजाची मूर्ती ) सदरहु मूर्ती औरंगाबादेनजीक सातारें येथें दीक्षितांचे वंशजाजवळ आहे. ३ बाळाजी बाजीराव यांस. ४ बाजीराव वारल्याबद्दल जें पत्र पाठविलें तें एकटें चिमाजी आपानीं पाठविलें असल्यामुळें दीक्षितांनीं आपले पत्रांत तसा उल्लेख केला आहे. तें पत्र पुढें परि० नं० १० चें पहा.

स्वामींचे आज्ञेस उल्लंघन न केलें. व आह्मास स्वामींचे आज्ञेहून दुसरें दैवत नाहीं. तोच विचार चिरंजीव नानाचा आहे. स्वामीची आज्ञा ह्मणजे केवळ दैवत असेंच मानून वर्तणूक करतील. सांप्रत त्यांच्या आमच्या नांवाचें एकच विनंति पत्र लिहिलें आहे. स्वामीनी त्यांस आह्मांस एकच आशिर्वाद पत्र पाठविलें तरी कार्यास येईल. चिरंजीव नानाचा आमचा कांडी इतका दुसरा विचार आहे असें नाहीं.

८ आज पावेतो जालें तें झालें. पत्र दिलें होतें तें फिरोन घेतलें, पुढें नवें जें प्राप्त होत जाईल त्याचा दुहोत्रा देत जावा ह्मणून लिहिलें; तर दुहोत्राच करार करावा असें काय आहे ? सारांश मिळ-जोड स्वामींच्या आशिर्वादें होईल. बरकड स्वामींची सेवा ज्या प्रकारें करणें त्या प्रकारें करण्यास अंतर सर्वथा होणार नाहीं.

९ सारांश स्वामींचे आज्ञेचे उल्लंघन केल्यास कोण उत्तम फल पावेल ? आह्मास तो स्वामींवेगळें दुसरें दैवतच नाहीं, हेंच बुद्धी वडिलांचे आशिर्वादें करून स्थीर राहील. हा सिद्धांत आहे. तेणें करून सर्व उत्तमच होईल. यांत संशय नाहीं. कृपा पाहिजे हें विज्ञापना.

वरील पत्रानंतर लागलींच मार्गशीर्ष मासीं लक्ष्मण शंकर बुंदेल खंडकर यांजकडून पंधरा हजार रुपये पाठविल्याबद्दल चिमाजी आप्पांचे पत्र श्रीक्षेत्रीं आलें. ( परि. नं० ११ )

शके १६६३ सालीं काशीस पंचपक्वान्नांचें लक्ष भोजन घालून पुढें सिंहस्थाकरितां देशांत येणें बद्दल पत्र पहा. ( परि. नं० १२ ) याच वर्षी दिल्लीस शाहू राजांतर्फे आनंदराव वकीलांनीं दीक्षितांचे कायगांव ईनाम आहे त्याबद्दल बादशाही फरमान घेऊन पाठवावा ह्मणून लिहून पाठविल्यावरून त्यांनीं कमरुद्दीखां चीन बाहादुर वजी-रास व खुद्द बादशाहास अर्ज दिल्यावरून महंमदशाह बादशाहा

याचा फरमान ( सनद ) तयार होऊन ती दीक्षितांकडे पाठविली. तिचा मराठी तरजुमा परि. नं० १३ चा आहे, व सदर फरमानाप्रमाणेंच वजीराचा परवानाही मिळाला. त्याचा ही तरजुमा परि. नं० १४ चा आहे.

शके १६६४ सालीं बुंदेल खंडांतून दीक्षितांकडे पस्तीस हजार रुपये पेशव्यांकडून श्रीक्षेत्रीं आले. ( परि. नं० १५ )

याच वर्षी श्रीमंत बाळाजी बाजीराव रामपुरावर मुक्कामास असतां काशीचे अधिकारी सफदरजंग यांस भीति वाटून त्यांनीं नारायण दीक्षित प्रभृती क्षेत्रस्थ ब्रह्माणांस बोलावून पेशव्यांस मागें फिरवा नाहींतर सर्व ब्राह्मणांस बाटवीन, अशी धमकी दिली. दीक्षित चारशें ब्राह्मणांसह श्रीमंतांचे छावणींत जाऊन काशीवरील मोर्चे परत फिरविण्यास दीक्षितांनीं सांगितलें, तें करण्यांत आलें. पण आह्मांस श्रीचें दर्शन व यात्रालाभ कसा व्हावा असा लोकांनीं प्रश्न केला, तेव्हां दीक्षितांनीं त्यांस लोकांसह सडे बरोबर घेऊन यात्रा करवून परत छावणींत आणलें.

शके १६६५ सालीं परगणें ढाकोणी, सरकार चंदेरी, प्रांत माळवा, हा दरोबस्त महाल दीक्षितांस धर्मादाय ह्मणून नेमून दिला. ( परि. नं० १६ ) पेशवे आणि रघुजी भोसलें ह्यांचे दरम्यान उत्तर हिंदुस्थानांतील हद्दीसंबंधीं चाललेल्या लढ्याचा निकाल होऊन माळवा प्रांताचा मोकासा वगैरे अंमल पेशव्यांकडे लागल्याबद्दल शाहू राजे यांनीं ठरवून करार सपटंबरांत घेतलें व लागलींच आक्टोबरांतील वरील सनद आहे.

शके १६६८ सालीं कायगांवकडे पुष्कळ दुष्काळ असल्यामुळें दीक्षित आपले चिरंजीवास लिहितात—" सांप्रत तिकडे दुष्काळ पडला

---

१ काव्ये० सं० पेश० बखर, पान ७२.

ह्मणून ऐकलें तर या समयात प्रत्येक अन्नार्थ्यास अन्न देत जावें. हजार दोन हजार रुपये अधिक लागले तर मागें पुढें न पाहणें. उभयतां स्थलीं अन्नछत्र चालवीत जाणें. तुह्मी येणार तर यंदा न येणें."

नारायण दीक्षित श्रीक्षेत्र काशी येथें कार्तिक शुद्ध १४ सोमवार शके १६७० रोजी कैलासवासी झाले. त्या समयीं बाळकृष्ण दीक्षित तेथें नसून देशीं आले होते. ते काशीस परत जात असतांना प्रयागास त्यांस दीक्षितांचे निधन वर्तमान कळलें. तेव्हां तेथेंच त्यांनीं वडिलांचें और्ध्वदेहीक केलें. त्याबद्दल आपले वडील बंधूस ते लिहितातः—

" वडिलांची आज्ञा घेऊन स्वार झालों ते पौष शुद्ध ११ सोमवार दिवसा दिडा प्रहर दिवसा प्रयागास पावलो. येथें तीर्थरूपाचें वर्तमान कळलें. ईश्वरें केलें त्यासी उपाय नाहीं. मग दाहा दिवस अशौच धरून अक्रावे दिवशीं प्रीतिश्राद्ध केलें. आजच श्राद्ध आहे. यानंतर राजा नवल राय यांची भेटी घेऊन मग कांहीं ब्राह्मण भोजन, तीर्थरूप करीत होते, त्यांचे व्रत चालले पाहिजे ह्मणून पांच सहस्र ब्राह्मण भोजन घालून मग श्रीस जाऊं. + + चरणरज बापुजी महादेव भट साष्टांग नमस्कार विनंती रा. बाबा बरोबरी कुशल आहों. यासाठीं ताडा मोडा करून भेटी साठीं आलो ते आह्मी अभाग्य, भेटी न झाली. त्यांचे चरण दृष्टीस पडतें मग जे होणार ते होतें. परंतु डोळ्याचे पारणे न झालें उपाय नाहीं. श्रींत व प्रयागीं तीर्थरूप नानांचे तेज आहे तेंच आहे." पत्र पुढें पाहा (परि. नं० १७) याच संबंधी बाळाजी बाजीरावचें ही पत्र आलें (परि. नं० १८)

---

१ सातारें व कायगांव. २ सदरहुपत्र राजवाडे खंड ३ लेखांक ३७१ चें.

# दीक्षितांची काशींतील लोकोपयोगीं कृत्यें.

नारायण दीक्षित यांच्या काशींतलि अनेक सत्कृत्यांपैकीं तीन सत्कृत्यें त्यांच्या परोपकारी वृत्तीची आजही साक्ष देत आहेत. पहिलें:—सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ज्यावरून अनेक भाविक, अभाविक, वृद्ध तरुण, संसारी ब्रह्मचारी, विधूर संन्याशी, संत अगर असंत कार्यार्थ हिंडत असतात, ते ब्रह्मघाट, दुर्गाघाट व त्रिलोचन घाट दीक्षितांनीं बांधले. दुसरें:—राजा हरिश्चंद्राच्या सत्वपरिक्षणाचा प्रश्न ज्या भूमीवर सुटला त्या स्मशान भूमीचें विभाग, श्री काशीविश्वेश्वराचे आज्ञेनें, दीक्षितांनीं पाडून दिले. मनकर्णिका घाटाजवळ स्मशानभूमीची योजना केली. त्या ठिकाणीं डोंबाचा पूर्वापार हक्क असल्यामुळें ते यात्रेकरूं वगैरे गैरमाहितगार लोकांस फार अडवीत व त्रास देत असत, तो न व्हावा म्हणून सरसकट श्रीमंतापासून गरीबापर्यंत सर्वांस सुलभ असा तेरा पैसे ढबु म्हणजे साडे सहा आणे कर घेण्याचा ठराव दीक्षितांनीं करून दिला व तो ठराव अद्यापीहि चालू आहे. तीसरें:—श्रीभागीरथीचे घाटावर स्नानें करणारे व धुणें धुणारे यांचे गर्दीमुळें स्नानसंध्येस बसणाऱ्या ब्राह्मणांस फार उपसर्ग होत असे. तो टाळण्याकरितां ब्रह्म, दुर्गा व त्रिलोचन या घाटांपासून दूर पाण्यांत शिड्या रोऊन त्यावर तक्ते टाकण्यांत आले, व छायेकरितां तक्त्यांवर मांडव व छत्र्या उभारण्याचा उपक्रम केला; आणि त्याप्रमाणें आपापले घाटावर हद्दीहद्दीनें सर्वांना करण्यास सांगितलें. ती आज्ञा सर्वांस मान्य व पसंत होऊन त्याप्रमाणें करण्यास सुरुवात झाली; तो क्रम हल्लींपर्यंत अव्याहत चालू आहे. इतकेंच नाहीं तर यात्रेकरू लोक देखील या कृत्यास मदत करितात. कांहीं लोक आपले खर्चानें स्वतंत्र एक, दोन असे मांडव व छत्र्या उभारून देतात.

कालचक्राचे जबरदस्त फेऱ्यांत आमचा सर्व देश सांपडल्यामुळें धर्ममार्गांतही क्रांती झाली. गोरक्षणाचें ठिकाणीं गोभक्षणाचा सपाटा सुरू झाल्यामुळें गोशालांचा पार फडशा पडला. त्यांतच दीक्षितांची भव्य गोशालाही रिकामी पडली. तथापी त्यांच्या पुण्याईचा विशेष जोर असल्यामुळें त्या जागेच्या एका भागांत श्रीराम व दुसऱ्या भागांत श्रीसरस्वती यांचे वास्तव्य आहे. श्रीराम भागांत रामनामसंकीर्तनाचा जयघोष सतत सुरू आहे, तसाच तो सरस्वतीचें मंदिरांतहि सुरू आहे; आणि हे दोन्ही भाग सावळ्या रामानेंच तयार केले असून त्यांचा उपयोग क्षेत्रांतील व बाहेरील यात्रेकरूंसही होत आहे. इतकेंच नाहीं तर ही गोशाला धर्मसंरक्षक दीक्षितांची आहे, हें दर्शविण्याकरितां असो अथवा आपल्या पूर्वजांचें हक्क राखण्याचे हेतुनें असो; अनेक गाई व गोवत्स या स्थलाच्या बाहेरचे प्रदेशांत रात्रीचे वेळीं विश्रांतीस बसलेले दृष्टिस पडतात. या स्थलास इतकें व अशा प्रकारचें भाग्य येणें हें दीक्षितांच्या सबळ व अढळ पुण्याईचेंच फल आहे.

याशिवाय श्रीक्षेत्रीं दीक्षितांनीं घालून दिलेले दोन चार निर्बंध अद्यापि चालू आहेत. उदाहरणार्थ, एक, घडेवाल्यांनीं रस्त्यांतून घडे कसे न्यावे यासंबंधी; दुसरा, मधुकऱ्यानें एका वाड्यांत दहा बिऱ्हाडें असल्यास प्रत्येकीं मजल्यावर न जातां एके ठिकाणीं उभें राहावें व त्याठिकाणीं ज्यास मधुकरी घालणें असेल त्यानें ती आणून घालावी.

दीक्षितांचें ज्या वाड्यांत लक्षावधि ब्राह्मणभोजनें झालीं, व प्रत्यक्ष श्रीअन्नपूर्णेनें संकटसमयीं दीक्षितांचें सत्व हरण न व्हावें ह्मणून स्वतः पाकनिष्पत्ती केली, त्या ब्रह्मघाटावरील दीक्षितांचे वाड्याचे कोपऱ्याची पूजा देवाप्रमाणें अबालवृद्ध गंधाक्षदा व गंगाजल टाकून अजून करीत आहेत; काशीसारख्या पवित्र क्षेत्रांत

कोट्यावधि लिंगें व हजारों देवालयें आहेत; पुष्कळ देवळें काल-चक्राचे तडाक्यांत सांपडून त्यांचा मागमूसही राहिला नाहीं; पुष्कळ देवळांतील देवांची व लिंगांची कोणी पुजा देखील करीत नाहींत. अशा परिस्थितींत दीक्षितांचे वाड्याचे कोपऱ्याची देवाप्रमाणें जवळ जवळ दोनशें वर्षें सारखी पुजा होणें ही आश्चर्याचीच गोष्ट आहे.

अविंधाच्या ऐन अविंधी कारभाराची लाट पाठीवर घेऊन हिंदु-धर्माचें संरक्षण ज्या विभूतींनीं केलें, अशा विभूतींपैकींच आमचे चरित्रनायक नारायण दीक्षित होत. काशी क्षेत्र विधर्मी राजांचे ताब्यांत असल्यामुळें देवब्राह्मणांस पिडा होते, ती न व्हावी या उद्देशानें घरप्रपंच सोडून दीक्षितांनीं काशीवास पत्करला. त्या कृत्यास ईशकृपेनें लोकांकडून मदतही पुष्कळ मिळाली; आणि त्यांनींही त्याचा विनियोग अन्नछत्रें व ब्राह्मणभोजनें वगैरे धर्मकृत्यें करून आपला उद्देश तडीस नेला.

काशी क्षेत्रीं यात्रेकरू येत, तेही ब्राह्मणभोजनें पुष्कळ करीत असत. परंतु त्यांत भोजनदक्षिणेचा अनियमितपणा फार होता. पंचपक्वानांचें भोजन तर दक्षिणा अर्धा आणा, दोन आणे, चार आणे, इच्छेप्रमाणें यजमान देत. तो अनियामितपणा बंद करून दीक्षि-तांनीं नियम ठरवून दिला. त्याप्रमाणें साधे भोजनास अर्धा आणा, पुरणपोळीस एक आणा, एक पक्वान्नास दोन आणे, व पुढें पंच पक्वान्नांपर्यंत प्रत्येक पक्वान्नास दोन आणेप्रमाणें देण्याची रीत पडली.

## दीक्षितांच्या दैविक चमत्काराबद्दल गोष्टी.

१. औरंगाबादेजवळील सातारें येथें श्रीमल्हारी म्हाळसाकांत यांचे देवस्थान असून जेजुरीप्रमाणें या प्रांतीं त्या स्थानाचें महात्म्य आहे. या प्रांतांतील पुष्कळ लोकांचे हें कुलदैवत असून शेकडों लोक

येथें यात्रेस व दर्शनास येत असतात. येथें प्रतिवर्षी चंपाषष्ठीस मोठी यात्रा भरते. नारायण दीक्षित यांस एके दिवशीं दृष्टांत झाला कीं तुमची पूजा मला फार प्रिय वाटते, याकरितां आह्मी तुमचें घरीं येतो. दीक्षितांनीं त्याचा कांहींच विचार केला नाहीं. दुसरें दिवशीं पुन्हा तसाच दृष्टांत झाला व त्या दिवशींच चंपाषष्ठी होती. चमत्कार असा घडला कीं दीक्षित स्नान, संध्या, होम, आटोपून श्रीचे पूजेस देवाजवळ बसले तों देवळांतील श्री खंडोबाची मूर्ती त्यांना देवांत आढळली. इकडे देवळांतील गुरवासही दृष्टांत झाला, कीं उद्यां आह्मीं दीक्षितांकडे जाणार आहोंत; सबब देवळांत भोग मूर्ति मांडून, संध्याकाळीं आह्मांस देवळांत घेऊन यावें. सदर्हु दृष्टांत दीक्षितांस सांगण्याकरितां गुरव आला; आणि प्रत्यक्ष देवच तेथें त्यांनीं पाहिले. दीक्षितांनीं देवास लघुरुद्र करून षोडशोपचारें पुजा नैवेद्य अर्पण केला; व सायंकाळीं आरती करून देवांना पालखींत घालून मोठे समारंभानें देवळांत नेलें.

त्या वेळेपासून प्रतीवर्षी चंपाषष्ठीचें दिवशीं देवास प्रातःकालीं दीक्षितांचे वाड्यांत आणून तेथें लघुरुद्र, पूजा, नैवेद्य होऊन सायंकाळीं देवळांत देवास पालखींत घालून नेतात. ही वहिवाट अजूनही चालू आहे. येवढा यात्रेचा दिवस, पण देवळांत कांहीं नाहीं, सर्व गर्दी दीक्षितांचे वाड्यांत असते.

२. औरंगजेब बादशहाचे कारकीर्दींत श्रीक्षेत्र काशींतील विश्वेश्वरांचे देवळांत यवनांनीं प्रवेश केला, तेव्हां लिंगांतून मोठ्या ज्वाला निघून त्या मनकर्णिकेंत अदृश्य झाल्या. त्या दिवसापासून विश्वेश्वराची पूजा मनकर्णिका घाटीं श्रीगंगेत होत होती. यवनांनीं देवालयाचा विध्वंस करून त्याजागीं महजत बांधली. पुढें कालेंकरून हिंदुपद पादशाही

स्थापन झाल्यानंतर श्री विश्वेश्वराचें दर्शनास लाखों लोक येत पण श्रीविश्वेश्वराचें देवालय नाहीं. ही उणीव दूर करण्याचें कांहीं मंडळींचें मनांत येऊन पूर्वीं देवालय होतें त्या जागीं जवळच नवीन देवालय बांधून तयार केलें व त्यांत श्रीविश्वेश्वराचे लिंगाची स्थापना व अर्चा करण्याविषयीं क्षेत्रस्थ ब्राह्मणांस विनंति केली. सर्वांनीं विचार केला कीं आपण आर्चा करूं, परंतु ज्या रूपानें देवानें मनकर्णिकेंत उडी घातली, त्याच रूपानें विश्वेश्वर पुन्हा देवळांत आल्याचें जगास दृग्गोचर झालें तरच जगाची खातरी होईल, व लोक पुढें पूजाही करण्यास देवळांत येतील. तेव्हां भट व दीक्षितांनीं देवाची प्रार्थना केली असतां, दृष्टांत झाला कीं तुह्मी आर्चेस सुरुवात केली असतां मी प्रगट होईन; त्याप्रमाणें आर्चेस सुरुवात झाली असतां देवालयाचें कोपऱ्यांत ज्वाला निघाल्या. त्या ठिकाणीं सर्वानुमतें श्रीचे लिंगाची स्थापना केली. विश्वेश्वराचे लिंग कोपऱ्यांत असण्याचें कारण हें आहे.

३. प्रसिद्ध सरदार पटवर्धन यांचे मूळपुरूष हरिभट पटवर्धन यांचे आराध्य दैवत श्री सांब होय. पटवर्धनांचे उत्कर्षानंतर आराध्य दैवताची रोज रुद्राभिषेकपूर्वक पूजा चालू असे. शंकरास ती नापसंत होऊन, मला दीक्षितांकडे पावतें करावें, याऊपर तुमचेंकडे राहणें नाहीं, असा पटवर्धनांस दृष्टांत झाला. त्यांनीं देव पालखींत घालून दीक्षितांकडे पावते केले. ती बाण मूर्ती हल्लीं सातारें येथें दीक्षितांचे वंशस्थाजवळ आहे.

## दीक्षित व ब्रह्मेंद्रस्वामी.

चरित्रनायकांचे समकालीन सत्पुरुषांत ब्रह्मेंद्रस्वामी प्रसिद्ध असून मराठी राज्याशीं त्यांचा विशेष संबंध होता आणि सरदेसाई यांनीं मराठी रियासत मध्यविभाग ३ यांत पान २९८ वर चरित्रनायकाबद्दल

"ब्रह्मेंद्रस्वामी व दीक्षित एकाच वर्गातलें दिसतात" असें लिहिलें आहे. हे शब्द वाचल्यानंतर ब्रह्मेंद्रस्वामींचे चरित्र मी पुन्हा वाचलें. त्यावरून मला असें वाटतें, कीं दीक्षित व स्वामी यांचे चरित्रांत फारच अंतर आहे. प्रथमतः स्वामींचे मागें संसारपाश नसतांना ह्मणजे त्याचा त्याग केल्यानंतर ते संसारचक्राचा हव्यास, संसारी मनुष्यापेक्षां देखील जास्त, करीत होते. इतकेंच नव्हे तर ते शापादपि शरादपी होते. उलट पक्षीं नारायण दीक्षित संसारी असून देखील त्यांचा संसारी हव्यास स्वामींपेक्षां पुष्कळ कमी होता. दीक्षितांचे असें एकही पत्र उपलब्ध नाहीं, कीं ज्याच्यांत त्यांनीं कोणाजवळ कशाची याचना केली आहे. कदाचित् चिमणाजी बल्लाळ व बाळाजींचें पत्रांतील कलम ४ व ८ यांतील मजकुरावरून सरदेसाई यांचा ग्रह तसा झाला असेल असें वाटतें. पण त्याच कलमाचा बारीक विचार केला तर असें पत्र स्वामींजवळ असतें तर तें त्यांनीं कधींच परत दिलें नसतें. स्वामींच्या स्वभावचरित्रावरून या लेखकाचें तरी असें अनुमान आहे. बाळाजी बाजीरावचें नांवें ता. २४।१२।४१ चें जें पत्र आहे (परि० नं० १९) त्यांत पुढील वाक्य आहे. "तुह्मी ह्मणाल जे लोभमुळें करितेंत तर ईश्वर जाणें." स्वामींचें पत्रांतून क्षुल्लक जिनसेपासून तों मोठमोठ्या रकमेपर्यंतच्या मागण्या वारंवार आढळतात. त्यावरून उभयतांचे स्वभाव-वैचित्र्य समजतें आणि कदाचित् योग्यतेचेंही स्पष्टीकरण करतां येईल.

## दीक्षितांची योग्यता.

नारायण दीक्षित पेशव्यांचें मंत्रोपदेष्टे अगर उपाध्ये ह्यांपैकीं कोणतेंही गुरु नसून बाळाजी विश्वनाथ पेशवाई मिळण्यापूर्वीं औरंगाबाद प्रांतीं आले तेव्हां दीक्षित हे सत्पुरुष आहेत हें त्यांस कळल्यावरून ते दीक्षितांचे दर्शनास आले व दीक्षितांजवळ कांहीं दिवस राहिले.

त्या समयीं "उत्तम भाग्योदय होईल" असा त्यांस दीक्षितांनीं आशिर्वाद दिला, आणि तो बाळाजीचें पूर्ण प्रत्ययास आला. हाच कायतो पेशवे आणि दीक्षित घराण्याचा मूळ संबंध. पुढें बाळाजीनें प्रत्येक वेळीं दीक्षितांचे आशिर्वादाची अपेक्षा केलेली दिसते. पण त्याबद्दल प्रत्यंतरास पत्रव्यवहार वगैरे कांहीं उपलब्ध नाहीं. बाळाजीचे प्रत्येक उत्कर्षाचा व दीक्षितांस शाहु राजाकडून मिळालेल्या देणग्यांचे तारखांचा किती मेळ बसतो हें वर प्रत्येक ठिकाणीं दाखविलेंच आहे. तात्पर्य बाळाजी विश्वनाथाची दीक्षितांचे ठिकाणीं जी भक्ती होती ती ते त्यांचे मंत्रोपदेष्टे, गुरु अगर उपाध्ये ह्मणून नसून ते निस्पृह आणि ईश्वरी-कृपेंतील सत्पुरुष ह्या भावनेनें होती, व ती पेशवाईचे अखेरपर्यंत सर्व पुरुषांची कायम होती. उदाहरणार्थ बाळाजी विश्वनाथाचे मृत्युनंतर थोरले बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दींतही कायगांव येथील सरदेशमुखीची सनद व निजामाकडून गावांस उपसर्ग होऊं नये ह्मणून करून दिलेल्या सनदा व मथुरेसंन्निध धर्मकृत्यास दहा गांव देण्याबद्दलचें पत्र आणि त्याहूनही विशेष ह्मणजे बाजीराव व चिमाजीआपा ह्यांचीं मनें कलुषित होऊन खानगी मोकाशाचें गांव रांजणगांव प्रगणे वाळुज ( जिल्हे औरंगाबाद ) बद्दल उभयतांमध्यें लढा पडला असतां तो दीक्षितांनीं मिटविला असतां पुन्हा चिमाजी आपानीं त्यांत कांहीं व्यत्यय आणिला त्याप्रकरणांत बाजीरावानीं दीक्षितांस लिहिलेलें पत्र परि० नं० २० चें पाहा.

---

१ ही गोष्ट शके १६२८।२९ चे सुमारास घडली असावी. २ सदरहु असल पत्र डुबेरकर बर्वे यांचे दप्तरीं आहे. बर्वे बाजीरावचें मातुलाचें वंशस्थ असून बाबुराव मल्हार बर्वे यांजकडे वाळुज महालचा मोकाशांचा मामला होता; व त्यांजकडेसच रांजणगांवचें काम असल्यामुळें सदर पत्र त्यांचे दप्तरी राहिलें. तें कै० यज्ञेश्वर बाळकृष्ण दीक्षित डुबेरें येथें त्यांचे बंधुचे दिवाळसणाकरितां गेले असतां त्यांनीं पाहिलें व त्याची नक्कल आणिली.

या उभयतां बंधूंची मनें कलुषित होण्यास कारण भरतानीस शनवार वाड्यांत जागा दिली हें होय. अशा नाजुक स्थितींत देखील दीक्षितांचे मध्यस्थीची अपेक्षा उभयतांस वाटली, ह्मणजेच दीक्षितांवरची अढळ श्रद्धा आणि आत्मीयपणा हें व्यक्त होतात. पुढें ही बाळाजी व रघुनाथ बाजीराव आणि सदाशिवराव भाऊ यांची राजकारणांतील पत्रें पुष्कळच असून तीं काव्येतिहाससंग्रहांत आणि प्रसिद्ध इतिहास-संशोधक राजवाडे यांचें खंडांत छापलेलीं आहेत. त्यावरून राजकारणा-संबंधीं व इतर वागणुकीसंबंधीं वगैरे स्पष्टोक्तीनें केलेला उपदेशही चरित्रनायकाचा निर्लोभीपणा व योग्यता दाखवितात.

शाहु छत्रपतींजवळ नारायण दीक्षितांची योग्यता किती होती, हें, परभु आणि ब्राह्मणांमध्यें कांहीं तंटा होता, त्या प्रकरणाचे निर्णयासाठीं मोठमोठे क्षेत्रांतील प्रमुख ब्राह्मणांस सातारें येथें बोलाविलें होतें, त्यांत काशीक्षेत्रस्थांत नारायण दीक्षितांतर्फे त्यांचे चिरंजीव वासुदेव दीक्षित गेले होते व सर्वानुमतें निर्णय ठरविला, यावरून स्पष्ट दिसतें.

## उपसंहार.

नारायण दीक्षितांचे चिरंजीव वासुदेव दीक्षित आणि बाळकृष्ण दीक्षित यांनीं दीक्षितांचा लौकिक कायम ठेवून त्या वेळचें राजकारणांत बराच महत्वाचा भाग घेतला होता. निजाम आणि बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे ह्यांचे दरम्यान झालेल्या बहुतेक सर्व राजकारणांत वासुदेव दीक्षितांची मदत पेशव्यांस होती, हें सरदेसाई यांची मराठी रियासत, मध्यविभाग २, प्रकरण २२, “ निजामशाहीचा अपकर्ष ” ह्या प्रकरणावरून दिसून येतें. त्याचप्रमाणें नागपुरकर भोंसले, रघुजी व जानोजी, यांचीही दीक्षितांवर पूर्ण श्रद्धा असून ते राजकारणांतही वासुदेव दीक्षितांची मदत घेत होते, हें त्यांचे प्रसिद्ध झालेल्या पत्र-व्यवहारावरून दिसून येतें.

## नारायण दीक्षित.

वासुदेव दीक्षित यांस निजामाकडून मौजे नायगांव, प्रगणे हरसूल, हा गांव जागीर मिळाला. ( परि० नं० २१ व २२ ); व पुढें याच गांवचा सरदेशमुखी वगैरे स्वराज्यअमलही पेशव्यांकडून मिळाला. ( परि० नं० २३. ) पेशव्यांकडून पालखीची नेमणूक जाली व वर्षासन रु. ५०० झालें (परि० नं० २४ २५ व २६ ). रघोजी भोंसले यांजकडून मौजे बाभुळगांव, शिंदखेडे व मालेगांव, प्रगणें पाटण सांगवी, हीं गांवें व बंगाल प्रांतावर १ रुपये शेंकडा याप्रमाणें उत्पन्न मिळालें. वासुदेव दीक्षित श्रावण वद्य १२ शके १६८२ रोजी सातारें येथें वारले. ( परि० नं० २७ )

बाळकृष्ण दीक्षित शके १६७५ सालीं दिल्लीस गेले होते. तेथें बादशहानें त्यांचा फार आदर करून काशीजवळ शिवराज चंद्रवतीचे अलीकडे रुपये १५००० चा गांव जाहगीर दिला; व रघुनाथ बाजीराव यांनीं पालखी आणि तीन हजारांचा एक गांव दिला. बादशहानें, जवाहीर, मोत्याचा शिरपेंच, चौकडा जोडी, व महावस्त्र वगैरे देऊन त्यांचा फार सन्मान केला. (परि०नं० २८) शके १६७७ सालीं बाळकृष्ण दीक्षित यानीं फाल्गुन शुद्ध ७ सोमवारीं सोमयाग पूर्वक आधान श्रीक्षेत्र काशी येथें केलें. त्यास खर्च ५००० रुपये जाला. ( परि० नं० २९. ) सोनपतपानपत येथील घोर संग्रामानंतर पेशवाईस जो धक्का बसला त्यायोगानें दीक्षितांचें उत्तरेकडील वजन बरेंच कमी झालें. इतकेंच नव्हे तर शत्रूस उत्तेजन मिळालें. त्याचा परिणाम ह्मणजे पौष वा। ६ रोजी कांहीं मंडळींनीं ब्राह्मणासंबंधीं द्वेष मनांत ठेऊन काशीचे वाड्यांत बाळकृष्ण दीक्षितांवर मारेकरी पाठविले होते. दरवाजावरील भय्यांनीं दरवाजाचा बंदोबस्त करून दुसरें दरवाजानें दीक्षितांस परिवारासह वाड्यांतून बाहेर काढून गंगापार करून दिले. तीन महिनें बाहेर गुप्तपणानें काढून अमळ स्थीरस्थावर झाल्यावर बाळकृष्ण

दीक्षित पुन्हा काशीस गेले. ( परि० नं० ३०. ) पुढें काशीस राहणें धोक्याचें वाटल्यानें तेथील स्थावर व जंगम ईष्टेटीची तुर्तातुर्त व्यवस्था करून ते परिवारासह देशांत आले. ज्येष्ट बंधु वासुदेव दीक्षित यांचे ममत्व जें बाळकृष्ण दीक्षितांवर होतें तसें त्यांचे पुत्राचें ठिकाणीं नवतें. बाळकृष्ण दीक्षित देशांत आल्यानंतर काशीकडील गांवांस व इतर उत्पन्नास राज्यक्रांतीमुळें व्यत्यय आल्याबद्दलचीं वगैरे पत्रें येऊं लागल्यानें गोविंद दीक्षित ( पुतणे ) यांचे मनांत विकल्प येऊन एकमेकांचे बनेनासें जालें. अखेर कार्तिक शुद्ध १ शके १६८४ रोजी उभयतां चुलते पुतणे विभक्त होऊन ईष्टेटीच्या वांटण्या होऊन पावत्या फारकत्या जाल्या.

निजामाचे लढाईत जय मिळाल्यास पांच हजार रुपयांचा एक नवीन गांव ईनाम देऊं ह्मणून बाळाजी बाजीराव यांनीं वासुदेव दीक्षिताशीं कबूल केलें होतें. पण वासुदेव दीक्षित यांचा मध्यंतरी मृत्यु झाला. तेव्हां तो गांव देणेंबद्दल नारो बाबजी यांचे नांवें हुकूम जाला कीं " वेदशास्त्रसंपन्न राजश्री गोविंद दीक्षित पाटणकर यांस साल मारी मोंगलाची लढाई फत्ते जालीयावरी एक गांव पांच हजार रुपयांचा ईनाम द्यावा, असा करार आहे. त्यास लढाई फत्ते जाहली याजकरितां त्यांस गांव दिल्हा पाहिजे. ऐशियास दीक्षित बावानीं एक गांव आपणाकडे नेमून द्यावा, ह्मणून पत्र पाठविलें; त्यास हल्लीं हे सनद तुह्मास सादर केली असे. तरी मौजे मार येथील पांचहजार रुपयांचा तनखा व पांचहजार कुलबाब कुलकानु मिळोन वसूल याप्रमाणें असलियास एक गांव दीक्षिताकडे नेमून देणें; आणि या गांवचा वसूल कुलबाब कुलकानू मिळोन पांचहजार रुपयास जाजती असला तरी सदरहु लिहिल्याप्रमाणें दुसरा गांव पांचहजार रुपये तनखा व वसूलही त्याप्रमाणें असेल तो वेदमूर्तीकडे नेमून देऊन हुजूर लिहून पाठविणें " ( बाळा० बाजी० रोज० भाग २ पृष्ट १०८ ) या हुकुमान्वयें मौजे काटे पिंपळगांव हा गांव जागीर मिळाला. (परि० नं० ३१ ).

शके १६८५ मार्गशीर्ष मासीं बाळकृष्ण दीक्षित यांनीं पुनराधान कायगांवीं केलें. पुढें बाळकृष्ण दीक्षित हे चैत्र शुद्ध ३ शके १६९२ रोजीं किल्ले सातारा नजीक खंडोबाची पाली या गांवीं कोंकणांतून येत असतां मार्गांत वारले.

ह्याप्रमाणें चरित्रनायकांचे दोन पुत्रांची दोन घरें होऊन ज्येष्ठ शाखा औरंगाबाद नजीक सातारें येथें राहुं लागली व कनिष्ठ शाखा कायगांव येथें राहुं लागलीं.

गोविंद दीक्षित शके १७०९ सालीं निपुत्रीक वारल्यामुळें त्यांचे पश्चात ज्येष्ट शाखेचें पुढारीपण त्यांचे कनिष्ट बंधु रामचंद्र दीक्षित यांजकडे आलें.

ढाकोणी महाल फार लांब पडूं लागला. दीक्षितांची काशीची वस्ती कायमची उठल्यासारखी झाल्यामुळें देशांत सोयिस्कर असा शेंदुर्णी महाल दुसरे बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दित शके १७१९ सालीं बदलून घेतला. त्याची सनद रामचंद्र दीक्षित यांचे नांवें झाली.

सारांश, नारायण दीक्षितांवर पेशवे घराण्याचे मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ यांची जी सत्पुरुष ह्मणून दृढ भक्ती होती, तिचें बाळाजी बाजीराव व वासुदेव दीक्षित यांचे वेळेस राजकारणांत रूपांतर झालें होतें. पण पानपतचे घोर संग्रामानंतर वरील दोन्ही पुरुष एकदम कालवश झाल्यानें पुढील पिढ्यांविषयीं फक्त पूज्यरूपी आदरभाव मात्र पेशवे घराण्यांतील पुरुषांत अनुवंशिक भावनेने कायम राहिला होता, हें प्रत्येक पेशव्याचे जे पत्रव्यवहार प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून व्यक्त होतें, ह्मणून कांहीं पत्रें ( परि० नं० ३२ ) दिलीं आहेत. शेवटचें बाजीरावची जुने घराण्यांविषयीं अविश्वासाची आणि अनिश्चित वागणुक लक्षांत आणली तर त्यांचे कारकीर्दींत देखील त्यांची दीक्षित घराण्या-

विषयीं, राज्यत्याग करण्याचा अखेर प्रसंग आल्यावर देखील, पुज्य बुद्धी कायम होती हें पुढील गोष्टीवरून व्यक्त होतें. ती विशेष गोष्ट ह्मणजे शेवटचे बाजीरावांनीं अगदीं संकटसमयांत ह्मणजे राज्याचा हक्क सोडते समयीं सर जॉन मालकम साहेबांजवळ दीक्षितांविषयीं शिफारस केली. त्या बाबतींत सर जॉन मालकम साहबे ब्रिग्झ साहेब ( खानदेशचे अधिकारी ) यांस तारीख ३ जुलई सन १८१८ चें पत्रांत लिहितात:—" मी जो त्यांज ( बाजीराव ) बरोबर तह केला आहे, त्यांत दिल्या वचनांपैकीं ही एक गोष्ट आहे. गोखले घराणें खेरीजकरून ज्याच्याविषयीं बाजीराव साहेबांनीं शिफारस केली, असे फक्त विनायक दीक्षित हेच आहेत." ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.


हें पत्र ह्मणजे बाजीराव साहेबांनीं राज्याचा हक्क सोडते समयीं इंग्रज सरकारांकडून कळविलेल्या अटी ( तहनामा ) मान्य केल्या, त्यांतील ५ वें कलमाप्रमाणें लिहिलेलें आहे. बापु गोखले बाजीरावाकडे अखेरपर्यंत राहून अखेर धारातीर्थीं पतन पावले; त्यांचे ताजें स्मरण ह्मणून त्यांचेविषयीं जशी आपली कृतज्ञता बुद्धि व्यक्त केली, त्याचप्रमाणें दीक्षित घराण्याचे आशिर्वादानें बाळाजी विश्वनाथ यांस पेशवाईचें पद प्राप्त झालें, ही त्यांचे घराण्यांसंबंधी अनुवंशिक भावना व श्रद्धा बाजीरावानें व्यक्त केली, असेंच अनुमान सदरील तहनाम्यांतील कलमावरून सिद्ध होतें. सदरिल तहनामा व पत्र परि० नं० ३३ व ३४ चे पाहा.

हल्लीं दोन्हीं शाखांचे मुख्य वंशस्थांची वस्ती शेंदुर्णी येथें असून बाकी मंडळी सातारें, कायगांव, व कांहीं शेंदुर्णी येथें राहतात. दीक्षित घराण्याचा समग्र वंशवृक्ष ( परि० नं० ३५ ) शेवटीं देऊन, हें अल्प चरित्र संपविलें आहे.

चरित्र समाप्त.

परिशिष्ठ नं १.] **परिशिष्टें.** [पृष्ठ ५.

( नारायण दीक्षित पाटणकर कोंकणांतून देशांत आल्यावर, त्यांनीं श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथें वे० रा० चिंतामण भट प्रदक्षणे यांस स्वदस्तुरचा लेख लिहून दिला तो. )



## परिशिष्ट नं० २, पृ० ८.

( कसबे सातारें येथील वरचे बाग ईमानाची सनद अस्सल फारशी. त्याचा तरजुमा.)

कृपाळु ईश्वर

महंमदशा अली
मीर महंमद अगा-
खान

ईजत असार

कृपेनें उमेद्वार होऊन जाणा कीं, नारायण भट राहणार कसबा मजकुर यांच्याकडे कसबा सातारा येथील शिवारांपैकीं वीस बिघे जमीन मदत माष ( उपजिविके ) साठीं हैदर कुली खान आणि महंमह आकीलखान यांचे मोहोरी परवांन्याप्रमाणें पुत्रपौत्रादि वंशपरंपरा मुक्रार जाली आहे. तरी पूर्वींच्या सनदेप्रमाणें त्या ( जमीनी ) चा कबजा आणि भोगवटा हल्लीं चालू असेल तर त्यांचेकडे पूर्वींपासून आहे त्याप्रमाणें वंशपरंपरा चालू ठेवावी. याबद्दल दृढ निश्चयपूर्वक ही सक्त ताकीद समजावी. छ १७ रबीलावल सन ३ जुलूस. मुबारक लिहिले गेले.

( खुद्द हस्ताक्षर चिन्ह )

(सनदेचे पृष्ठ भागावर दप्तरी दाखले घेतल्याच्या तारखा नमूद आहेत त्या.)

ता० १७ रबीलावल सन ११३४ हिजरी.

ता० १८ रबीलावल सन ११३४ हिजरी.

---

१ हा अस्सल कागद उपलब्ध नाहीं. पण तो ई० स० १७२८ चे पूर्वींचा असावा. ( पहा चरित्र पृष्ठ २०।२१ )

२ जुलूस सन ह्मणजे दिल्लीचे बादशहाचा गादीवर बसल्याचा. हा बहुतकरून फिरूक शाहाचें मागून बसलेले बादशहाचा सन असावा.

## परिशिष्ट नंबर ३, पृ० ३५.

( मौजे कायगांव येथील ईनामाबद्दल व वाड्याचे जागेबद्दल सनद. अस्सल कागदावर प्रथम फारशींत मजकुर असून पुढें मराठी. त्याचा उतारा )

शके १६३८ दुर्मुख नाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा सुमासन ११२५ फसली. मुताबिक सन ५ जुलूस फरोखशाही. ते दिवशीं वेदशास्त्र संपन्न राजश्री नारायण भट अग्नहोत्री वलद गोविंद भट पाटणकर हालीं वस्ती कसबे सातारे यांसी देऊजी वलद कान्होजी ईब्न देऊजी मोकद्दम व पुरुषोत्तम वलद रंगोजी पटवारी, धोंड भट वलद शीऊ भट, अनभट वलद गणेश भट, नारायण भट वलद त्रिंबक भट व गोपाळ भट वलद केशव भट, व नान भट वलद उधव भट व बाबदेऊ भट वलद काशी भट धर्मात्कारणी मुजारे व रघुनाथ भट वलद धाकोबा जोशी व समस्त ब्राह्मण मंडळी. व गिराजी वलद सुभानजी व अंताजी वलद कमळजी, सयाजी वलद माऊंजी गायकवाड. संभाजी वलद साजु उसकर व समस्त रयत मौजे कायगाऊं प्रों गांडापूर सा दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद. आत्मसुखे आपले रजावंदीनें लेहोन दीधले ऐसाजे. मौजे मजकूर बहूत दिवस वैरान पडले, पांढरी बेचिराख वैरान पडली, व रान कुल पडीत पडलें. आपल्याच्यानें गांवची बेहबुद न होय ऐशी अवस्ता जाणून तुमची कीर्ति ऐकिली. त्यावरून आपण आवघेजण मिळोन तुमच्या शेवेशीं येऊन आपले वर्तमान कुल तुह्मांस विदित्य केलें. तुह्मास विनंती केलीजे तुह्मी गोदातीरी येऊन गांवावर वस्ती कराल तरी तुमच्यामुळें पांढरी वसल, व शिवारांत लावणी होईल; ऐशी विनंती तुह्मांस केली, ते तुह्मी मान्य केली. ऐशियास आपण समस्त मिळोन संतोष जालों यावरी आपण आपले खुशीनें तुह्मास ईनाम जमीन बंजर लायक जिरात खारीज जमा बिघे १२० एकशेवीस गज रेशमी तुह्मांस जमीन आपण

संकल्प करून दान दिधलें असें. तुह्मी सुखें जमीन किस्तकार करून तेथील महसूल जो होईल तो तुह्मी सुखरूप घेणें. तुमच्या महसुलास हकीम मुजाहीम होईल, त्यास आपण समस्त मिळोन हकमाच्या महसुलाची निशा करूं. तुह्माशीं हकीमाशीं संबंध नाहीं. आपण काया, वाचा, मनसा तुह्मास जमीन दान दिधली असे. व गांवांमध्यें तुह्मांस राहावयासवाडा जमीन आत्राब पांढरी

पांढरी गज इमारती

| अर्ज गज | तूळ गज |
|---|---|
| १६ | २५ |

काळी जमीन खारीज जमा.

गज रेशमी.

| अर्ज जरीब | तूळ |
|---|---|
| १० बिंघे. | १२ बिघे. |

यास हद हदुद पूर्वेस गिराजी व मकाजी व सूर्याजी गायकवाड वाडे. पश्चिमेस जमीन घर व माहादेव भट देव, उत्तरेस जमीन घर देऊजी मोकदम, दक्षिणेस गांवची बीद.

एकूण बिघे १२० यास हद हदुद पूर्वेस गांडापूर वाट. पश्चिमेस शीव जामगाऊ, मढवाट गांडापूर, ऊत्तरेस जिरात वाकोजी गायकवाड. दक्षिणेस गोपाळ भट धर्मात्कारणी व देऊजी मोकदम.

सदरहु काळी व पांढरी तुह्मास रजावंदीनें दीधली असें. सुखें जमीन किस्तकारकरून लेकराचे लेकरी अरजानी करणें व पांढरीवर ईमारत करून सुखरूप नांदणें.

**नि॥ नांगर देऊजी मोकदम.**

**बि॥ पुरशोत्तम रंगनाथ कुळकरणी मौजे मजकुर.**

गोही.

सदरहु लिहिले सही.

**धोंडभट वलद शिवभट धर्मात्कारणी.**

**संभाजी गुसळा वलद दर्जाजी गुसळा.**

आनभट वलद गणेशभट धर्मात-कारणी.
नारायणभट वलद त्रिंबकभट धर्मात्कारणी.
अनंतभट वलद गोपाळभट धर्माधिकारी.

गिराजी वलद सुभानजी पा.
अंताजी वलद बालजी गायकवाड.
सयाजी वलद माऊजी गायकवाड.
कान्होजी वलद रेणकोजी गायकवाड.

पत्राप्रमाणें साक्ष माहादाजी शिद्धेश्वर गागोपंती.
द॥ गिरमाजी विठल अ॥ देशमुख प्रां मजकुर.
द॥ रघुनाथ शंकर देशपांडिये पों मार

---

## परिशिष्ठ नं० ४, पृ० २९.

( कसबे सातारें येथील सरदेशमुखी अमलाबद्दल दुमाला पत्र. )

श्री

छत्रपती. ( शके १६४१. ई० सन १७१९ )

राजश्री वेदमूर्ती नारायण भट बीन
गोविंद भट अग्नहोत्री गोसावी यांस

द———

स्ने॥ जोत्याजी केसरकर आजहत सरदेसमुख दंडवत सुर र न आशरीन मया अलफ. कसबे सातारे तर्फ मार प्रां दौलताबाद, हें गांव राजश्री स्वामीनें तुह्माशीं ईनाम सरदेशमुखी साहोत्रा देखील ईनाम पत्र दिल्हे आहे. त्याप्रमाणें वंशपरंपरेनें आनभऊन सुखरूप असणें सरदेशमुखीचा उपसर्ग तुह्माशीं व गांवाशीं तगादा लागणार नाहीं. जाणिजे छ० १९ सफर हें विनंती.

| |
|---|
| स्वस्तिश्री सुखदा मुद्रा प्रतापोत्कर्ष बुधिनी ॥ सरदेशमुखस्येषा शाहु राजस्य राजते |

| |
|---|
| लेखनावधि |

---

## परिशिष्ठ नं० ५, पृ० ४१.

( मौंजे कायगांव येथील सरदेशमुखी अमलाबद्दल बाजीरावचें पत्र. )

श्री ( शके १६४६ ई. सन १७२४ )

० श्री ५
राजाशाहुनरपती
हर्ष निधान बाजीराव
बल्लाळ मुख्य प्रधा-
न

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान. ता। मोकदमानि मौजे कायगांव प्रां। गांडापुर सुहुर सन खमस आशरीन मया अलफ. मौजे मा।रचे सरदेशमुखीचा आकार होईल तो वेदमूर्ती राजश्री नारायण भट दीक्षित पाटणकर याशीं देविला असे. साल मा।रा पासून साल दरसाल सरदेशमुखीचा आकार होईल तो वेदमूर्तीस पावता करणे, दर दरसाल ताजा सनदेचा उजूर न करणें. तालीक लेहोन घेऊन हें असल सनद भोगवटीयाबद्दल वेदमूर्तीजवळी परतोन देणें. छ २५ सफर. मोर्तब. [ लेखन सीमा. ]

---

## परिशिष्ठ नं० ६, पृ० ४१.

( मौंजे कायगांवबद्दल—फारशी परवाना, नबाब फताजंग सिपाह सालार निजामन्मुल्क बहादुर फिदवी ये महंमदशाह बादशाह यांच्या मोहोरेचा. त्याचा मराठी तरजुमा. )

हल्लींचे व पुढें होणारे आमिलान प्रगणें गांडापुर सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनीयाद यांस लिहिले जाते कीं मौजे कायगांव प्रां।

मजकूर ज्याचा कामील वसूल ४५६१८। चारहजार पाचशें एकसष्ट रुपये पावआणा आहे, हा गांव उच्चपद राज्यांत श्रेष्ठ शाहुराजे यांचे वकील आनंदराव यांचे अर्जावरून नारायण भट जुनारदार ( ब्राह्मण ) यांस जीमनांत लिहिल्याप्रमाणें सन ११४३ फसली खरीफ हंगामा पासून ईनाम मुक्कार केलें आहे तरी; मौजे मजकुरास मशार निल्हेचे ईनामांत स्वाधीन करून देणें. आणि त्यांचे अमलास कोणतेंही प्रकारें हरकत व खलेल न करणें. म्हणजे ते आपले प्रपंचास खर्च करून दौलतीचे आभिष्ट चिंतन करीत राहतील. या बाबें ताकीद निक्षून जाणून लिहिल्याप्रमाणें अमल करणें. छ २५ जिल्हेज सन ११४५ हिजरी.

खुद्द स्वदस्तुरचे फर्दीप्रमाणें खालीं जीमन म्हणजे खुलासा मुक्कार.

मौजे कायगांव प्रगणें गांडापुर सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद ( औरंगाबाद ) महाल जागीर सरकार. ज्याची कामील जमा चार हजार पांचशें एकसष्ट रुपये पाव आणा. हा गांव ईनाम देण्याविषयीं उच्चपद राज्यांत श्रेष्ठ शाहुराजे यांचे वकील आनंदराव यांचे अर्जाप्रमाणें नारायण भट यांस ईनाम बक्षीस दिले. त्याची सनद देण्याबद्दल हुकूम आहे.

स्वदस्तुरचा शेरा कीं सनद देणें.

४५६१८।. कामील कायम.

एक मौजा.

---

## परिशिष्ट नं० ७, पृ० ४२.

( मथुरे संन्निध दहा गांव देऊं केलें बद्दल. )

श्री (ता० २४।७।१७३५ )

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित पाटणकर

स्वामीचे शेवेशीं.

विद्यार्थी बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १४ रबिलावल जाणोन स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनें मथुरे सान्निध धर्मकृत्यास दहा गांव मागितलें. त्यास तेथें आपला अंमल बैसला ह्मणजे दहा गांव तुह्मी मागाल ते ईनाम करून देऊं. सुरू सीत सल्लासेन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

---

## परिशिष्ट नं० ८, पृ० ४२.

( बुंदेल खंड प्रांत ताब्यांत आल्यावर धर्मादायास रुपये पाठविले बद्दल. )

उतारा

रोजकीर्द राजमंडळ स्वारी राजश्री पंत प्रधान सु॥ समान सलासेन मया व अलफ छ १६ रजबु यांत दफाते पत्रें रवा सुदगीचें पोटीं नारायण दीक्षित यांस धर्मादाय रुपये १२००० दिल्ह्याबद्दल सनद बार आहे तिचा उतारा.

वेदशास्त्र संपन्न राजश्री नारायण दीक्षित यास धर्मादाव

१२००० रुपये

मु. श्री

प्रांत बुंदेलखंड येथील ऐवज पैकीं गोविंद बल्लाळ याजकडून देविले श्री मध्यें पावते करून जाब पाठवणें ह्मणून सनद.

---

## परिशिष्ठ नं० ९, पृ० ४२.

( हरसुल महालच्या जकातीची प्रथम देणगीची सनद चिमणाजी बल्लाळ यांची छ ६ रजब सु॥ सन तिसा सलासिन मया व अलफ [ शके १६६० ई० स० १७३८ ] ची. पण हली ती ऊपलब्ध जाली नाहीं. पण पुढें १६७४ ई० स० १७५२ हरसूल महालचे कमाविसदाराचे नांवे सनद बार आहे, त्यांत सद्रहु जकाती वासुदेव दीक्षितांकडे ह्मणून वजा केल्या. त्याचा उतारा. )

रोजकीर्द राजमंडळ स्वारी राजश्री पंत प्रधान सु॥ सलास खमसेन मया व अलफ. छ २० रजब यांत दफाते पत्रांत प्रो हरसुल सातारें व प्रो हवेली अवरंगाबाद येथील बाबती सरदेशमुखीबद्दल सनदा भिकाजी कृष्ण कादार याचे नावें बार आहेत त्यांतील उतारा.

भिकाजी कृष्ण कादार पा हरसुल सातारे व पा हवेली अवरंगाबाद येथील मामला बाबती सरदेशमुखीचा गुदस्त कृष्णाजी केशव यांस होता. त्यास ते मृत्यु पावले याकरितां साल मजकुरी मामला तुह्मास सांगितला असें तरी इमाने इतबारे वर्तोन अमल करणें तेथील मक्ता खेरीज माहाल मार सरकारचे ऐवजाचा मक्ता करार केला बा गु

७००१ बाबती सरदेशमुखीचे माहाल ३

१ पा हरसुल खो मौजे चिकलठाण परगणा खो जकाती बाबती सरदेशमुखी जकाती वासुदेव दीक्षितांकडे आहेत सा वजा.

१ पा सातारे पैकीं का सातारें वासुदेव दीक्षितयाजकडे इनाम बाकी परगणा.

१ पा हवेली अवरंगाबाद सरदेशमुखी निलखी असें.

---

३

मक्ता गु प्रमाणें साल मार

० किता

---

## परिशिष्ट नं० १०, पृ० ४४.

( बाजीराव बल्लाळ वारल्याबद्दल चिमणाजी बल्लाळ यांचें स्वदस्तुरचें पत्र. )

सदरहु अस्सल पत्र इति० संशोधक राजवाडे यांजकडे दिलें होतें. परत आल्याची दप्तरीं अढळ होत नाहीं. त्यांचे खंडांत छापलें असल्यास शोध करीत आहे. तूर्त उपलब्ध नाहीं.

---

## परिशिष्ट नं० ११, पृ० ४५.

(बुंदेल खंडांतून दीक्षितांकडे रुपये १५००० पाठविले.—ता० १३।११।१७४०).

श्री.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे शेवेशी.

विद्यार्थी चिमणाजी बल्लाळ सां। नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता। मार्गशीर्ष शुद्ध पंचमी जाणून स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित यांस रुपये १५००० पंधरा हजार रा। लक्ष्मण शंकर यांजकडून देविले आहेत. मारनिल्हे प्रां। बुंदेल खंड येथें गेलियावर वसुल करून दीक्षितांकडे श्रीस पावते करितील तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असें. बहुत काय लिहिणें लोभ असो दिजे हें विनंती.

पो। मार्गशीर्ष वद्य २ शके १६६२ रौद्रनाम संवत्सरे.

---

## परिशिष्ट नं० १२, पृ० ४५.

( काशीस तूर्त न येतां तेथील अन्नसत्र चालविणें बद्दल नारायण दीक्षितांचें पत्र वासुदेव दीक्षितांस. )

**श्री शंकर.** ( ता० २३।३।१७४६ )

पो। वैशाख वद्य ८ गुरुवार शके १६६८ क्षयनाम संवत्सरे. वनमाळी दासाचे दुकानीं.

**श्रीकृष्ण.** ( सदरहु अक्षरें स्वदस्तुर )

प्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री वासुदेव दीक्षित याशी प्रती

श्रीहून नारायण दीक्षित कृतानेक आशिर्वाद उपरी येथील क्षेम चैत्र शुद्ध १२ परीयंत श्रींत सुखरूप जाणून स्वकीय लिहित जाणें. यानंतर बहुत दिवस वर्तमान कळत नाहीं तर सविस्तर लिहिणे. आमचे वर्तमान तर वरचेवर पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. सांप्रत साडे तेवीस हजार रुपयांची हुंडी तुह्मावर जाबी केली आहे, येथें राखले कृष्णभट पाटणकर जोग धनी रुपये शाहाजानी पंचमेळ—कृष्णभटाचे जमा करून ठेवणें, आमचे नावें लिहिणें. ते येतील मग सांगतील त्याप्रमाणें विल्हेवार लावणें. परंतु जमाखर्च येणेंप्रमाणें करणें, याऐवजी हुंडिया आह्मावर करणें. काशिचा पुसाळकरास रुपये दिल्हे होते ते भिकाजी नाईक मऱ्हाटे याणीं पाठविलें ते वेळेस त्याणी लिहिले कीं मित्ती लिहून पाठवाल त्याप्रमाणें रुपये देऊं. ऐशीयाशी वैशाखांत रुपये दिल्हे ते भाद्रपदांत जमा जाले. चार मास जाले बारा आण्याप्रमाणें रुाो ६० साठ जाले ते आमचे जमा कीजे. माहादेव भट देव याशीं रुाो १०० शत आह्मी तुह्मा बाा वर्षासनाचे दिल्हे. तुह्मी आमचे रुाो शंभर जमा करणें. पूर्वेचे वर्तमान तर हा काल वर पूर्ववतच आहे. निवाडा होत नाहीं. अधिकोत्तर वर्तमान येईल तेव्हां लिहून पाठऊं. राा हरी दीक्षित गोऱ्हे मागाहुन पाठऊं.

सांप्रत तिकडे दुष्काळ पडला ह्मणून आइकतों तर या समयांत अन्नसत्र जो अन्नार्थी येईल त्यांस सर्वांस देत जाणें. हजार दोन हजार रुाो अधीक लागले तर मागें पुढें न पाहणें, ऊभयतां स्थलीं अन्न चालवीत जाणें. तुह्मी येणार ते यंदा न येणें. उष्णकाल लेकरें लहान मार्गीं श्रमी होतील. यास्तव लिहिलें आहे. पुढें देशकाल स्वस्थ आहे तर लिहून पाठऊं मग येणें.

राजकी वर्तमान पेशव्यांचे व बाबुजी नाईकांचे व राजद्वारचे सविस्तर लिहित जाणें. होळकर वगैरे फौजा छत्रपुरास आल्या.

तुह्मावर हूंड्या करितो याचा ऐवज उतरून घेणें. यात्रकरांच्या चिठ्ठ्या तुह्माकडे धोंड भटाबराबर पाठविल्या. त्यांत ऐवज आला काय बाकी काय ते सविस्तर लिहिणें. रुपये येतील ते आमचे जमा करीत जाणें. वरकड वर्तमान यथास्थीत असें. उत्तर वरचेवर पाठवीत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

## परिशिष्ट नं० १२, पृ० ४६.

( दिल्लीचे बादशाहाचा फरमान मौजे कायगांवबद्दल. फारशी लिपीत असल. त्याचा मराठी तरजुमा. ) ( ता. २४।७।४१ इसवी. )

| | | |
|---|---|---|
| याठिकाणीं आरबी लिपीत खुद्द बादशहाचे हातचे सोनेरी शाईनें. मुबारक असें लिहिलें आहे. | **आज्ञापत्र पृथ्वीपती यांचे** | मोहोर फारशी. बादशहाची. |

मौजे कायगांव दरोबस्त प्रगणे गांडापुर सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद ( औरंगाबाद ) येथील वसुल रक्कम रुो ४५६१८। चार हजार पांचशें एकसष्ट रुपये पाव आणा आहे. हा गांव नारायण भट जुन्नारदार ( ब्राह्मण ) याजला या सनदेच्या मागें लिहिलेले अर्जीप्रमाणें इनामी जागीर करून दिल्हा आहे. याजकरितां प्रगणे मजकूर येथील कमाविसदार व जागीरदार व करोडे इत्यादि वर्तमान भावी यांस हुकूम.

मौजे मजकुर येथील सर्व अमल मशारनिल्हेकडे देणें व हरयेक बाबती विषई जागीरदार मजकुर यांस मुजाहीम न होता सर्व बाबती यांस माफ समजून दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणे. असा

सख्त हुकूम जाणावा. तारीख २१ माहे जमादिलावल सन २५ जुलुस. ( ही सनद देणारे बादशाहास गादीवर बसल्याची वर्ष संख्या ).

( जीमन ह्मणजे अर्जदार कोण कोणते आमात्यादि अधिकारी यांणीं काय अभिप्राय दिले, वगैरे विस्तार सनदेचे मागें दिला असतो तो. )

तारिख १८ माहे जिल्हेज रोज गुरुवार सन २४ जुलूस मुताबक सन ११५४ हिजरी तारिख १५ माहे इस्पंदार इलाहि रोजी.

बादशाही दौलतीचे शोभिवंत आमात्य, विश्वासु पोषाक, उत्कृष्ट वंशस्थ व सयदाप्रमाणें योग्यतेचे, वरिष्ट अधिकारी व वारसदार, जाती धर्मानुसार सद्बुद्धीनें बादशाही आधिकार चालविणारें, बादशाही राज्याचे व भांडार कोशाचे माहितगार, सरकारची आज्ञा पूर्णपणें पालन करणारें, सैन्याचे संरक्षण करणें व राज्यवृद्धी करणेबद्दल दक्ष, राज्य व भांडारकोशाचा बंदोबस्त ठेवणारे, अधिकार व लक्ष्मी वर्धमान होण्याविषयीं युक्ती सुचविणारे, दुसरे दोस्त सरकार यांचे राज्यकारणांत विचारपूर्वक मसलत देणारें, युद्धांत पुढारी, सर्व प्रधानांत श्रेष्ठ, सर्व अमीर उमराव व मनसबदारांत श्रेष्ट, सर्व लेखकांत तुमची तलवार श्रेष्ट, सर्व जरीपटक्यांत तुमचा जरीपटका श्रेष्ट, चतुर प्रधान, सरकारी फायद्याविषई एकनिष्ठ, सर्व पृथ्वीचे प्रधान, प्रमुखपणें सर्व आधिकार चालविणारे, युद्धांत विजयी, असे कमरूद्दीनखां चीन बहादूर दक्षिण सुभेजातचे वजीर यांनीं. व सर्व राज्याचे अखबार लिहिणार, सर्व कुलीन लोकांत श्रेष्ट, व बादशाहाचे विश्वासुख ढालशींग यानीं खुद्द पृथ्वीपती यांस विनंती केली कीं नारायण भट्ट जुन्नारदार यांस सदरहु गांव जागीर मिळावा. त्याजवरून पृथ्वीपती यांची आज्ञा जाली कीं मौजे कायगांव प्रगणें गांडापुर सरकार दौलताबाद सुभे अवरंगाबाद या गांवची एकंदर जमा चार हजार पांचशे एकसष्ट रुपये पाव आणा असोन तो मौजा निजामन्मुल्क आसफजाह यांचे

मोहरी परवान्याप्रमाणें जागीर नारायण भट्ट जुन्नारदार यांजकडे चालु आहेच. व त्याबद्दल हल्लीं राजा शाहु छत्रपती यांचे वकील यांनींही विनंती केल्यावरून गांव जागीर दिला ह्मणून आज्ञा देण्यांत आली. तारिख १ जिल्काद सन २४ जुलुस. याप्रमाणें कलमी झालें.

( वर मुख्य प्रधान यांचे महत्व वर्णन केलेंप्रमाणें पुन्हा येथें लिहिले. )

वजिरूल्मुमालिक जुमदतुल मुल्क मदारूल महाम येतमादुद्दवला कमरूद्दीखां चीन बहादुर नुसरत्‌जंग यांचा शेरा जाला कीं हा अर्ज अखबारनवीस यांजकडे दाखल करावा.

अखबारनवीस कुल मुख्त्यार यांचे दस्तखती शेरा जाला कीं दफ्तरचे शिरस्त्याप्रमाणें अर्ज आहे.

वजीरूल्मुमालिक जुमदतुलमुल्क मदारूल महाम येत मादुद्दवला कमरूद्दीखां चीन बहादुर नुसरत्‌जंग यांचा स्वदस्तुर शेरा जाला कीं पुन्हा अर्ज करावा.

त्याजवरून सर्व कुलीन लोकांत विश्वासु, विद्वान, लायक व कृतज्ञ आणि कृपा व बक्षीस देण्यास योग्य आब्दुल मजीदखां यांचे दस्तुरचा शेरा जाला कीं पुन्हा सरकारांत अर्ज दाखल जाला. तारिख १८ रबिलावल सन २४.

वजीरल्मुमालिक जुमदतुलमुल्क मदारूल महाम येतमादुद्दवला कमरूद्दीखां चीन बहादुर नुसरत्‌जंग यांचा शेरा जाला कीं पाहण्यांत आलें.

वजीरूल्मुमालिक जुमदतुलमुल्क मदारूल महाम येतमादुद्दवला कमरूद्दीखां चीन बहादुर नुसरत्‌जंग यांचा स्वदस्तुर शेरा जाला कीं सरकारचे आज्ञापत्र लिहावे.

दफ्तरदार यांचा अर्ज मौजे कायगांव प्रगणे गांडापुर सरकार दौलताबाद सुभे अवरंगाबाद या गांवचा मुकर तनखा काय आहे तो दक्षिणेंतील सुभे जातचे दफ्तरचे मुत्सद्दी यांणीं हुकूम देऊन दाखल्याअन्वये डौल पाठवावा.

मौजे मजकुर येथील जमीनीचा कायम वसुल रुपये ४५६१८। आहे.

एक मौजा सर्व.

वजीरूल्मुमालिक जुमदतुलमुल्क मदारूल महाम येतमादुद्दवला कमरुद्दीखां चीन बहादुर नुसरतूजंग यांचा शेरा कीं निमे रबी अंतइल हिशोबाप्रमाणें ता० २६ रबिलाखर सन २५ जुलुस.

सर्व मौजा शुरू फसल खरीफ सन ११४३ फसलीपासून.

मोहोर फारशी
आसफजाह
यांची

बादशाही दौलतीचे शोभिवंत आमात्य ( वगैरे वर विस्तार लिहिला त्याप्रमाणे येथें पुन्हा विस्तार लिहून वजीरूल्मुमालिक जुमदतुल्मुल्क मदारूल महाम येतमादुद्दवला कमरूद्दीखां चीन बाहादुर नुसरतूजंग यांचे दस्तखत ह्मणजे स्वदस्तुरची खुण.

---

## परिशिष्ट नं० १४, पृ० ४६.

( बादशाही वजीराचा परवाना ( सनद ). फारशी भाषेंत त्याचा मराठी तरजुमा. )

कमरूद्दीखां
चीन बहादुर वजी-
र यांची मोहोर.

(ता० ३०।८।१७४१ ईसवी.)

वर्तमान व भावी नायब व मुत्सद्दी प्रगणे गांडापुर सरकार दौलताबाद सुभे अवरंगाबाद यांस हुकूम कीं पृथ्वीपती यांचे आज्ञापत्र छ २१ जमादिलावल सन २५ जुलूसप्रमाणें मौजे कायगांव दरोबस्त

परगणे मजकुर ज्याचा वसूल चार हजार पांचशें एकसष्ट रुपये आहे. हा गांव नारायण भट जुन्नारदार यांजकडे शुरू फसलपासून सनदेचे पाठीमागें लिहिल्याप्रमाणें इनाम मुकर जाला आहे. त्यास मौजे मजकुर दरोबस्त मशारनिल्हेचे इनाम समजून कबजांत द्यावे. आणि सर्व बाबतीविषई माफी समजावी. दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणे. छ २९ जमादिसानी सन २५ जुलुस. कलमीसुद दस्तखत बैन ह्मणजे लेखनसीमा.

( जीमन ह्मणजे अर्ज वगैरे तपशील जो सनदेचे मागें लिहिला आहे तो. )

कमरुद्दीखां चीन बहादुर नुसरत्‌जंग यांजकडून लालशींग यांस लिहिण्यांत येते कीं पृथ्वीपती यांचा हुकूम दाखल झाला कीं मौजे कायगांव प्रगणे गांडापुर सरकार दौलताबाद सुभे अवरंगाबाद वसूल चार हजार पांचशें एकसष्ट रुपये पाव आणा. हा गांव आसफजाह निजामन्मुल्क सिपाह सालार यांचे परवान्याप्रमाणें नारायण भट जुन्नारदार यांजकडे राजा शाहु छत्रपती यांचे वकील आनंदराव यांचे अर्जावरून बक्षीस केला आहे. छ १ जिल्काद सन २४ जुलुस.

सदरहु हुकुमाप्रमाणें यादी तयार जाली.

महान थोर पृथ्वीपती यांची आज्ञा तारिख २१ जमादिसानी सन २५ जुलुसची ह्या उत्तम समई दाखल झाली आहे कीं मौजे कायगांव दरोबस्त प्रगणें गांडापुर सरकार दौलताबाद सुभे अवरंगाबाद येथील वसूल चार हजार पांचशें एकसष्ट रुपये आहे. हा गांव नारायण भट जुन्नारदार यांस जीमनमध्यें लिहिल्याप्रमाणें ईनाम मुकार जाला आहे. तरी अधिकारी आमीन व मुत्सद्दी व जागीरदार वर्तमान भावी यांस हुकूम कीं मौजे मजकुर दरोबस्त यांचे स्वाधीन करून देणें. आणि सर्व बाबती यांसी माफी आहेत. दरसाल नवीन

सनदेचा आक्षेप घेऊं नये. रोज गुरुवार छ १६ माहे जिल्हेज सन २४ जुलुस. मुताबक सन ११५४ हिजरी. तारिख १५ इस्फंदार इलाहि रिसाले.

वजीरुल्मुमालिक येतमादुद्दवला कमरूद्दीखां चीन बहादुर नुसरत्‌जंग यांचा हुकूम कीं सनद लिहिणें.

मौजा दरोबस्त.

स्वदस्तुरचे चिन्ह.

---

## परिशिष्ठ नं० १५, पृ० ४६.

( बुंदेल खंडांतून ३५००० रुपये श्रीक्षेत्र काशीस दीक्षितांकडे पाठविल्याबद्दल )

रोजकीर्द राजमंडळ स्वारी राजश्री पंत प्रधान सुा सलास आर्बैन मया व अलफ छ ३ मोहरम यांत दफाते पत्राचे पोटी दीक्षित यांस पस्तीस हजार रुपये देण्याबद्दल पत्र बार आहे त्याचा उतारा.

नारो शंकर याजकडे पस्तीस हजाराच्या हुंडिया पाठविल्या त्या माारनिलेस पावोन हुजुर लिहिले त्यावरून सदरहु पैका दीक्षितांस देणें आणि पावलीयाची कबज घेणें. यादो जोशी मुरूडकर याजवर दाहा हजाराची हुंडी पाठविली ऐशास पस्तीस हजाराखेरीज दाहा हजाराचे श्री त प्रयोजन नाहीं यास्तव हुंडी माघारी पाठविली असे. पावेल ह्मणून लक्ष्मण शंकर यांस पत्र १--

मु. श्री

---

## परिशिष्ट नं० १६, पृ० ४६.

( ढाकोणी महाल जागीर दिल्याची सनद. )

श्री
राजाशाहु नरपती
हर्ष निधान बाळाजी
बाजीराव मुख्य
प्रधान.

श्री ( ११।१०।१७४३ ई० )

मा। अनाम देशमुख व देशपांडिये पो। ढाकोणी सरकार चंदेरी प्रांत माळवा यांसी

बाळाजी बाजीराव प्रधान सु॥ आर्बा आर्बैन मया व अलफ. वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित पाटणकर यांस पो। मजकुर माहाल दरोबस्त मुकासा दिल्हा असे. वेदमूर्तीचे तर्फेनें राजश्री रामचंद्र मल्हार यांजकडे कमावीस सांगितली आहे तरी याशीं रुजु होऊन परगणे मजकुरचा दरोबस्त वसुल सुरळीतदेणें. जाणिजे छ ३ रमजान आज्ञा प्रमाण.

[ लेखन सीमा ]

---

## परिशिष्ट नं० १७–अ, पृ० ४७.

( नारायण दीक्षित यांच्या मृत्युपूर्वीचे कार्यक्रमाबद्दलचें पत्र. )

श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित
स्वामिचे शेवेशी.

चरणरज बापुजी महादेव भट श्री काशीहुन त्रिकाळ चरणावर मस्तक ठेवून सां। नमस्कार विनंती येथील क्षेम ता। आश्विन वदि ११ जाणून स्वकीय कुशळ लिहिले पाहिजे. यानंतर बहुत दिवस जाहले स्वामींकडून पत्र येत नाहीं निमीत्य तीर्थस्वरूप राजश्री नाना सचींत आहेत, दोन महिने जाले पत्र नाहीं. पीतांबरदास याणे आपले दुकानी लिहिले होते कीं मी पत्र मागावयाशी रा। वासुदेव

दीक्षितजी जवळ गेलो होतो. त्याणीं उत्तर दिले कीं पत्रें पाठविली आतां पत्र नाहीं, त्यावरून दीक्षितजीची अवकृपा दिसते, तरी तुह्मी रो नारायण दीक्षितांस विनंती करून त्यांचे पत्र घेऊन पाठवणे. हे कृपा करितील, तरी येथें राजश्री नानाशी बहुत गरीब पणें वर्ततो. तथापी त्याणें लिहिलेवरून राजश्री नानानीं स्वामीस पत्र आमचे हातीचे दिले त्याजवरून कळेल. जगन्नाथ भट केळकर यांचा सोम जाला, आधि मंडप शिद्धेश्वरानें घातला त्याची स्त्री विटाळशी जाली मग आश्विन शुध १५ प्रारंभ केला, स्वयंप्रकाश स्वामीचे मतें व राजश्री नानांचे आज्ञा सांगती झाला. राजश्री नानानीं रुो १५० व रो शिवराम कृष्ण लिमये रुो ५० व रो गोविंदपंत कुंटे रु. २५ व राजश्री रामाजी केशव रुो १५ व बापुजी माहादेव भट रुो २५ व गंगाराम दाणी रुो २५ एकुण रुो ३०० मिळाले. या वेगळे तीनशे ब्राह्मणाची सामग्री रो नानानी दिली, कळले पाहिजे. रुतवीज (ऋत्विज) यांची नावें याची यादी पाठविली आहे त्याजवरून कळेल, काळ्याचे झटे तोडून टाकले, रो नाईक याशी रो नानाशी गंगाजळ जाले, राजश्री नाना कोणाचे कामांत पडत नाहींत. वीणे तीन केले येकांती प्रहर बसताती, नारायण स्मरण करिताती, वीणा आपले हाती वाजविताती, चित्तास आले तर गीता अगर विष्णुसहस्रनाम पठण करिताती, प्राथकालीं स्नानसंध्या उपनिषदे पठण करिताती, जो भेटीस येतो तो आनंद पावतो, ग्वाल दास साहा वगैरे कुली भेटीस येत असताती. ब्राह्मणभोजन यथा पूर्वक चालते. मजवर बहुत कृपा, रो रामाजीपंत व गोविंदपंत याशिवाय विशेष करिताती, स्वामीचा सेवक निमित्य यांची कृपा, माझा केवा काय कीं रो नारायण दीक्षितानीं मान गौरव श्रींत करावा. हें मूळ स्वामीचे चरण. जे आज्ञा केली त्याशी मान्य केलें, फिरोन

जाब दिला नाहीं. ज्याप्रमाणें खर्च करवीला त्या प्रों केला, संतोशी जालें. द्रव्य स्वामीचे, पुण्य स्वामीचे, मी पोटास भक्षिले ते माझे, मी ह्मणजे काय ? आणि श्रींत येऊन रा नानानीं बरें ह्मणावे हें अपूर्व आहे. परंतु स्वामीची कृपा निमित्य सर्व आनकुल झालें. आपली मंडळी आली ती आनंदरूप स्वामीचे कृपेंकरून आहेत, × × × × × विशेष शिवेश्वराचा सोम आश्विन वदि १४, प्रारंभ आधा— नास दुसरे दिवस यज्ञ प्रारंभ आहे, गोविंदपंत कुंटे याणी गायत्री पुरश्चरण केलें, रुो ५५ दक्षणा दिली, अतीरुद्र होम द्वारा केला उत्तम केलें, रा रामाजी केशव याणीं उत्तम प्रकारें व्यय केला, स्वामीचे आज्ञेप्रमाणें केला, गोविंदपंत आठ, रामाजीपंत नव, गंगाराम पंत पोवराचा आठ, ये ( णे ) प्रों व्यय राजश्री नानांचे आज्ञे प्रो केला. राजश्री शिवराम पंत लिमये याणी वीस हजाराचा खर्च केला. लक्ष भोजनास संकल्प केला. रूका दक्षणा नित्य पनास ब्राह्मण गंगातीरी. रा श्रीपतराउ प्रतिनिधी यांचे घाटीं बिंदुमाधवीं कथा मास एक करितो. दंपत्य पूजन करितो. दक्षणेस येत नाहीं. रा सदाशिव नाईक याचे घरांत राहत होता, तेथून निघतो ते राहों देत नाहीं दुसरें घर मनिकर्णीकेचे घाटीं केलें. × × ×

आपण कार्तिक वदि ५ स्वार होऊन येतो, भेटी नंतर वर्तमान कुली निवेदन करीन. राजश्री नाना व बाळकृष्ण सर्व आनंदरूप आहेत. चितळयांची कन्या ठीक केली. × × × बहुत काय लिहिणे हे विनंति.

---

१ वासुदेव दीक्षित यांचे कुटुंब व मुलें ( देशांतुन काशीस भेटीस गेली होती )

२ बाळकृष्ण दीक्षित ( नारायण दी॰ चे दुसरें चिरंजीव )

३ बाळकृष्ण दीक्षितांचे प्रथम कुटुंब रखमाबाई निवर्तल्या ह्मणून दुसरे लग्न ह्या चितळ्यांचे मुलीशीं ठरविलें.

## परिशिष्ट नं० १७-ब, पृ० ४७.

( नारायण दीक्षितांचे मृत्युबद्दल बाळकृष्ण दीक्षित यांचे प्रयागचे पत्र. )

श्री

तीर्थस्वरूप राजश्री दादा वडिलांचे शेवेशी.

आपत्ये बाळकृष्ण साष्टांग नमस्कार विनंती. वडिलांची आज्ञा घेऊन स्वार जालो ते पौश शु ॥ ११ सोमवार दीडा प्रहरा दिवसा प्रयागास पावलो. तेथें तीर्थस्रूपाचे वर्तमान कळले, ईश्वरें केलें त्याशीं उपाय नाहीं. मग दाहा दिवस अशोच धरून आकरावें दिवशीं प्रीतिश्राद्ध केलें. आजच श्राद्ध आहे. या नंतर राजा नवलराये याची भेटी घेऊन मग कांहीं ब्राह्मणभोजन तीर्थरूप करीत होतें त्यांचे व्रत चा ( ल ) ले पाहिजे ह्मणऊन पांच सहस्त्र ब्राह्मणभोजन करून मग श्रीस जाऊं. रा॥ कृष्णराव महादेव याणी तीर्थरूप असतां कांहीं वेडी वर्तणुक केली. ते गेलियावर प्रभुचे तडांत रा॥ रामकृष्ण दीक्षित गोडसे ऐसे गेले. ऐसे वर्तमान झाले ते शेवेशी लिहिले. पुढें श्रीस जातो जे वर्तमान होईल ते लिहीन. रा॥ कृष्णराव महादेव हे केवळ आमचे अप्रियाशीं पदोपदीं प्रवर्तक आहे तरी श्रीमंताचे पत्र व मातुश्री काशीबाईचे पत्र ऐशी दोनी पत्रे शिक्षेची पाठवणे. दसारामाचे वर्तमान तरी केशोभटीं लिहिले त्याजवरून निवेदन होईल. ते पैरवी केली पाहिजे. व राजा नवलराय याशीं पत्र व रा॥ बळवंत शिंगास, दोन पत्रें आणिक पाठविली पाहिजेत. दील्लिस पत्रें ( फाटले ) विशई मनसुर आलिखान नबाब याशीं रा॥ बापोजी पंताजवळी पाठवणे. तो त्याची पत्रे पाठवील. आज्ञा विशई कांहीं चिंता न किजे बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

---

१ वासुदेव दीक्षित. २ नारायण दीक्षितांचे. ३ श्रीक्षेत्रकाशीस. ४ हे चासकर काशीबाईचे बंधु.

चरणरज बापुजी माहादेव भट सां नमस्कार विनंती. रो बाबा बरोबरी कुशळ आहों. यासाठीं ताडा मोडा करून भेटी साठीं आलो ते आह्मी आभाग्य भेटी न झाली. त्यांचे चरण दृष्टींस पडतें मग जे होणार ते होते. परंतु डोळ्याचे पारणें न झालें. उपाय नाहीं. श्रींत व प्रयागीं तीर्थरूप नानांचे जे तेज आहे तेच आहे. × × × बहुत काय लिहिणे ही विज्ञापना.

---

## परिशिष्ट नं० १८, पृ० ४७.

श्री

( नारायण दीक्षित यांचे मृत्युबद्दल बाळाजी बाजीराव यांचे पत्र ).

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे शेवेशी.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार विनंती. ऊपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहित आशिले पाहिजे. विशेष. पत्र पाठविले ते पावले. वो नारायेण दीक्षित यांचा काळ अती उत्तम ह्मणावा तैसा योग्याप्रमाणें जाहालियाचा अर्थ विस्तरें लिहिला तो कळला. ऐशास दीक्षित पुण्यवान् होते, त्यांचा काळ ही श्रीमध्यें अती उत्तम जाहला. त्यांचे सर्व प्रकारें सार्थक जाहले. त्याहीं चित्तांत जे आणलें ते ईश्वरें पूर्ण केलें. परंतु आपणांस दुःखाच्या कोटी जाहल्या, त्यास ईश्वर इच्छेस उपाय आहे ऐसे नाहीं. ईश्वराचे तंत्र विचित्र आहे. आपण विवेकी आहेत, या गोष्टीचा विवेकच करून परिहार केला पाहिजे. काशिंत सर्वप्रकारें यथास्थीत चाले ( ल ), वर्षा ( स ) नें वगैरे याजविशीं आपण असतां गुंता काय आहे, त्यांस ईश्वरें जें योग्य तेंच केलें. त्यांचे जागा सर्व प्रकारें आपण

---

१ नारायण दीक्षितांचे. २ येथून सर्व मजकुर खुद्द नानासाहेब यांचे स्वदस्तुरचा आहे. ३ नारायण दीक्षित यांस.

आहेत, या दिवसांत पत्र येत नाहीं. ऐसें नसावें. आपले कृपेकरून येथील सर्व विघ्नें दूर होतील. विशेष काय लिहिणें हे विनंती.

---

## परिशिष्ठ नं० १९, पृ० ५३.

( नारायण दीक्षितांचे पत्र बाळाजी बाजीरावचे नांवें. वागणुकीचा उपदेश व निरिच्छ कनवाळुपणा )

श्री (ता. २४।१२।४१ शके १६६३)

सहस्रायु चिरंजीव विजयी भव राजमान्य राजश्री बाळाजी बाजीराव प्रधान यांप्रती.

श्रीवाराणशीहून नारायण दीक्षित अनेक आशिर्वाद उपरी येथील क्षेम मार्गशीर्ष वद्य १३ जाणोन समस्त सुखरूप असो विशेष. तुमचे पत्र आले, पावोन बहुत समाधान झालें. विशेष. तुमची व चिरंजीव वासुदेव दीक्षितांची भेट[1] जाली. हें वर्तमान दीक्षितांहीं लिहिले जे, "बहुत सन्मान केला. घाटावरून पुढें मनुष्य पाठऊन बलावून सर्व सविस्तर वर्तमान सांगितलें. बहुत सत्कार केला" तरि अपूर्व काय आहे ? हें तुह्मास योग्यच आहे. न कराल तर अपूर्व !

या नंतर ऐकितो कीं जे सर्वांस क्रोधें आहांत. तर ते सर्व तुमच्या वडिलांपासून सोभतीस आहेत. त्यांचा अन्याय जाला ( तर ) तुह्मी क्षमा करावी हें तुह्मा योग्यच आहे. बहुतसा अतिशय न करावा.

या नंतर तुमच्या विषयीं आपण जे ईश्वराची प्रार्थना करायाची ते करीतच आहों. तुह्मीं ह्मणाल जे लोभ मुळे करितेत तर ईश्वर

---

१ ही पेशव्यांची व वासुदेव दीक्षितांची भेट शके १६६३ चे आषाढांत झाली. पहा पेशव्यांची रोजनिशी भाग २ मुकामांची यादी.

जाणे. कैलासवासी बाळाजीपंतांपासून आमचे त्यांचे चालत आले. आणखी आमच्या वचनाचा विश्वास असे. त्यापेक्षां तुमचे तीर्थरूपांची निष्ठा उभयतांच्या आमच्या स्थळीं असें. जे तीर्थरूपासारखे मानीत असत. आह्मीं क्रोधें करून नाना प्रकारें रागी जोत पत्रें हिलीत असों. परंतु त्यांस क्रोध तिल मात्र येत नसे. आणखी आपणही त्याजकरितां श्रम केले ते ईश्वर जाणे. त्यापेक्षां तुमचे उत्कृष्ट नांव व्हावें ऐसा ईश्वरें आह्मास दृष्टांत जाला आहे. परंतु तुह्मीं कारभारा विषयीं अत्यंत सावध रहाणें, कोणे गोष्टीची चिंता न करणें. तुमच्या पित्याच्या स्थळीं ममता होती त्यापेक्षां तुह्मांवर अधिक आहे. बरें हेंच ईश्वराजवळ प्रार्थना करितो जे यांचे उत्कृष्ट चालो. आणखी काय लिहावें ?

यानंतर आमच्या सोबतीस दहा वर्षे रामाजी केशव आहे आमचा ह्मणवितों. त्यास खानदेशचे महाल पहिले कोणी न करी तेव्हां आह्मीं या ब्राह्मणास देवविलें. त्यास पांच साहा वर्षें चालत होते. त्यास एका महापुरुषानें आपलें पुण्य खर्चून मामला काढिला. त्यास दोन तीन वर्षें तो ब्राह्मण आमच्याच आशेनें राहिला आहे. यंदा तुह्मी देणारच होतां हें दीक्षितांहीं आह्मांस लिहिलें होतें. त्यास आतां गतवर्षीं ज्यास महाल होतें त्याणें चढविला, परंतु तोटा आला. त्याजवर आपांहीं त्यास वीस सहस्र सूट दिल्ही असतां यंदा सोळा सहस्र चढ करून मामला त्याणें केला. बरें तुमचे कार्य जाहालें. ते हे आह्मास समाधानच आहे. परंतु तेच महाल एक वेळ त्या ब्राह्मणास करून द्यावे, हा हेतु आमचा आहे. याकरितां लिहिलें असें. सुज्ञा प्रति बहुत काय लिहिणें.

येथें वैशाख मासीं पंच पक्वान्नाचें लक्ष भोजन करावयाचा प्रारंभ करून मग कार्तिक मासा पर्यंत वांचलों तर एक वेळ त्या प्रांतास

१ बाळाजी विश्वनाथ.

सिंहस्थास गोदास्नान करून, उत्तम लक्ष भोजन गोदातिरीं करून सर्वांच्या भेटी घेऊन यावें. दर्शनानंतर सर्व विदित होईल. हे आशिर्वाद.

---

## परिशिष्ट नं० २०, पृ० ५४.

( बाजीराव, थोरले, यांचे पत्र; चिमणाजी आपाचे व [१] त्यांचे आपसांतील झगड्याबद्दल ).

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षित[१] बाबा स्वामीचे शेवेशी.

विद्यार्थी बाजीराव बल्लाळ प्रधान साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ. स्वामीचे आशिर्वादें करून यथास्थित असो विशेष. मौजे रांजणगांव प्रो मजकुर हा गांव खाजगत मुकासा आहे तो राजश्री बाबुराव[२] मल्हार यास दिला आहे. त्यास राजश्री मानाजी जाधव याजपासून चिरंजीव राजश्री चिमणाजी यांणीं बाकीचे ऐवजी पैका घेतला त्यास दरम्यान तुह्मींच आहां. तुह्मी आपले हातें कारभार विल्हेस लाविला आहे. हल्लीं मौजे मजकुरासि वगैरे गांवासि कटकट करणार ह्मणून कळलें. स्वामींनीं दरम्यान होऊन त्याजकडील कारभार चिरंजिवापासून फैसल करून घेतला असतां हल्लीं ते कटकट करणार. ही गोष्ट उत्तम आहेशी नाहीं. स्वामींनीं त्यास माकूल करून सांगणें ते रीसीनें सांगावें. आणि मौजे मजकुरास कटकट न करितां अंमल सुरळीत चालेल ते करावें. अगोदर स्वामीस लिहिलें असावें वास्तव लिहिलें आहे. तरी त्यास फजित[३] करावयाचें ते करून मौजे मजकुराचे वाटेस न जात तें करणें. लोभ असो दिजे हे विनंती.

---

१ नारायण दीक्षित. २ डुबेरकर बर्वे. ३ कायल ( फजीत ).

## परिशिष्ट नं० २१, पृ० ५६.

( मौंजे नायगांवचे जागीरीबद्दल निजामाची सनद फारशी, तिचा मराठी तरजुमा.)

आलमगीर बादशाह
फिद्वी नबाब मुस्तताब मौला
अल्काब खुरषेद ईपतेहार आमि-
रूल्मु मालिक नबाब आशिफुद्दवला
सयद महंमदखां बहादुर जफरजंग
शिपाह सरदार सन ११७३
हिजरी.

आलमगीर बादशाह
फिद्वी विजारत मर्तबत म-
दारूल्महाम मुनीरुल्मुल्क मुनी-
रुद्दवला हैदरयारखां बहादुर बेरजंग
दिवाणदखन सन ११७३
हिजरी.

देशमुख व देशपांडिये व मुकदम व रयत व मुजारी ( कुळकरणी ) प्रगणें हरसुल सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद ( औरंगाबाद ) यांस हुकूम कीं, परगणे मजकुर पैकीं तैहतीस हजार साहाशें दाम खान फेरोजंग यांचे महालांतील ज्याचे वर्णन जीमन मध्यें लिहिले आहे, तो वासुदेव दीक्षित यांचे तैनातीस ईनाम दिला असे. तरी महाल मजकुरास मशार निल्हेचे स्वाधिन करून देणें. व याचे नंतर मामुलप्रमाणें दरगाही सनद पोहोचेल त्याप्रमाणें अंमल करणें. छ ७ जिल्काद सन ७ जुलूस.

जीमनः—खान फेरोजंग यांचे महाल पैकीं प्रगणें हरसूल सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद. यांतून वासुदेव दीक्षित यांचे ईनामांत इतमामा करितां तनखा झाली आहे. तरी महाल मजकुरास मशार निल्हेचे ओहोद्यास देणें. जाबत्या ( मामुल ) प्रमाणें दुसरी सनद पोचल्यानंतर त्याप्रमाणें अमल करणें.

मुक्कर दाम ४२३॥=

नबाब आसीफुद्दवला सयद महंमदखां बहादुर जफरजंग यांचे स्वदस्तुर शेरा कीं, फर्दीतिल शेऱ्याप्रमाणें सनद देणें. छ ५ जिल्काद सन ७

वासुदेव दीक्षित अर्ज करीत आहेत कीं मौजे नायगांव प्रगणें-हरसूल ज्याचा वसूल चारशें तेवीस रुपये चौदा आणे. सरकारचें महालांतून ईनामांत मुकर व्हावे.

मामुलप्रमाणें सनद तयार होईपर्यंत परवाना बक्षीस व्हावा. कैफियत. मौजे नायगांव प्रगणें हरसूल सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद. खानफेरोज्जंग यांचे महाल पैकीं. ज्याची तनखा ( वसूल ) ४२३॥।= बहाल ( कायम ) आहे.

हुजूरांतून दरगाही सनद आणणे व दुसरे सनदेचे तयारी करितां साहा महिन्याचे वायद्याचा मुचलका दप्तरांत पोहोंचला.

३३६०० आज सन ११६९ फसलीपासून.

छ २९ जिल्काद सन ७.

इत्तल्ला ( विनंती ) कीं शाहांत दाखल करणें झालें.

छ २९ जिल्काद सन ७.

हुजूरचे शाहांत दाखल करणें झालें.

छ २९ जिल्काद सन ७ जुलूसवाला.

---

## परिशिष्ठ नं० २२, पृ० ५६.

( मौजे नायगांव बद्दल निझाम सरकारचे फारशी सनदेचा तरजुमा ).

अमीरुल्मुमालिक
मदारुल्मुल्क महंमद
आसफ द्दवला फिद्वी
मुरादखां बहादुर
सन ११७३

जमीदार प्रगणें हरसूल सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बानियाद (औरंगाबाद) यांस कलमी करण्यांत येतें कीं, मयमनत येहेतेसास व दिवाण दक्षिण यांचे मोहोरी परवान्याप्रमाणें मौजे नायगांव प्रगणें मजकुर कायम जमा ४२३॥।= ज्याचा तपशील परवान्याचे पाठीवर लिहिल्याप्रमाणें आहे. तो सन ११६९ फसलीचे रबीसुनयेलपासून वासुदेव दीक्षित यांस तनखा व ईनाम मुकर आहे. याकरितां परवान्याप्रमाणें मौजे मजकुरचा दामदाम मशार निल्हेचे गुमास्ते यांकडे पावत असावे. व हंगामशीर माल वाजब आदा करीत असावी. तारिख २६ जिल्हेज सन ११७३ हिजरी.

जीमनः—वासुदेव दीक्षित यांचे वकीलाची विनंती ही आहे कीं, दक्षिणचे दीवाण यांचे मोहोरी परवान्याप्रमाणें सरकारचे जागीर महाल पैकीं मौजे नायगांव प्रगणें हरसूल सरकार दौलताबाद सुभे खुजस्ते बुनियाद हा गांव सन ११६९ फसलीचे सुल्स रबी सुनयेलपासून ज्याचा वसूल ४२३॥।= मुकर झाला त्याप्रमाणें सनद मिळावी. फक्त

रक्कम रुपये ४२३॥।=

नक्कल हुजूर दफ्तरांत दाखल. ता.२६ जिल्हेज सन११७३हिजरी.

नक्कल दीवाणी दफ्तरांत दाखल. ता. २६ जिल्हेज सन ११७३ हिजरी.

इस्तेफा दफ्तरास नक्कल पोंचली. ता. २६ जिल्हेज सन ११७३ हिजरी.

---

## परिशिष्ट नं० २३, पृ० ५६.

(मौजे नायगांव येथील स्वराज्य अमलाबद्दल माधवराव बल्लाळ पेशवे यांची सनद).

श्री

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत

राजमान्य राजश्री महीपत आनंदराव स्वामी गोसावी यांस

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. कृतानेक नमस्कार विनंती ऊपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहित असिले पाहिजे. विशेष. मौजे

न्यायगांव प्रगणें हरसूल हा गांव वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित पाटणकर यांजकडे मोगलाई अमल दरोबस्त आहे. स्वराज्याचा अंमल साल मजकुरापासून करार करून द्यावा, ह्मणून दीक्षितांनीं विनंती केली त्याजवरून मौजे मजकुरची चौथाई सालमजकुरापासून दीक्षितांकडे द्यावयाचा करार करून आपणांस लिहिलें असें. तरी मौजे मजकुरची चौथाई दीक्षितांकडे सालमजकुरापासून चालवीत जावी. चौथाईचा अमल दीक्षित करतील. आपण चौथाईचा अमल न करावा. जाणिजे, छ २५ शाबान सु॥ सलास सितेन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

## परिशिष्ठ नं० २४, पृ० ५६.

( पालखीची नेमणुन करून दिल्याबद्दल सनद )

श्री. (अधीक आषाढ शुद्ध ४ शके १६७४)
( ता. ४।६।५२ )

राजमान्य राजश्री भिकाजी कृष्ण कमाविसदार
परगणे हरसूल सातारें गोसावी यांस ५

शेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुरू सन सलास खमसेन मयाव अलफ. वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित यांस साल मजकुरी पालखी दिल्ही. त्याची मोईम रुपये १००० एक हजार करार केली. ते तुह्माकडून देविले असे. तर तुह्माकडे हातेबंदीचा ऐवज येणें त्या ऐवजी रुपये.

२९८ फाल्गुन शु० १ प्रतिपदा पोौं.
४४६ चैत्र शु० १ प्रतिपदा पोौं.
२५६ वैशाख शु० १ प्रतिपदा पोौं.

---

१०००

नारायण दीक्षित.

एणेंप्रमाणें एक हजार रुपये देविले आहेत. सदरहुप्रमाणें दरसाल पाववीत जाणें जाणिजे. छ २ साबान. [ लेखन सीमा ]

---

## परिशिष्ट नं० २५, पृ० ५६.

( पालखीचे नेमणुक खर्चाचा बेहेडा. )

श्री

श्री
राजाशाहु नरपती
हर्ष निधान बाळाजी
बाजीराव प्रधा-
न.

( ता. ४।६।५२ )

यादी बेहेडा सरकारातून पालखीची नेमणूक वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित यांजकडे वंशपरंपरा करून देण्यांत आली. तिचे खर्चाची सु॥ सलास खमसेन मयाव अलफ.

४८० भोई इसम ८ दरसाल दर इसमी रुपये ६० प्रमाणें.
७२ हलकारे काठीवाले इसम २ दरसाल रुपये ३६ प्रों.
७२ विटेकरी इसम २ दरसाल रुपये ३६ प्रमाणें.
६० झशालची इसम २ दरसाल रुपये ३० प्रों.
७२ हुजरे २ खिजमतदार १ इसम ३ दरसाल रुो २४ प्रों.

---

७५६

३२ छत्री धरणार इसम १ साल.
३२ चवरी धरणार इसम १ साल.
३६ अबदागिरी धरणार इसम १ दरसाल.
७२ चोपदार इसम २ दरसाल रुपये ३६ प्रों.
७२ भालदार इसम २ दरसाल रुपये ३६ प्रों.

---

२४४

---

१०००

येणें प्रमाणें नेमणुकी ऐवज दरसालिना हरसुल महालावर देणें बद्दल अलादा सनदा पत्र करून दिल्हे, त्याप्रमाणें ऐवज दरसाल मिळत जाईल. छ २ साबान येणेंप्रमाणें करार करावा. ( शिका. )

---

## परिशिष्ट नं० २६, पृ० ५६.

( पालखी वर्षासनाबद्दल सनद, सवाई माधवराव पेशवे यांची ).

श्री

( ज्येष्ठ शु० १४ शके १७१२ ता. २७।५।१७९० )

राजश्री कमाविसदार वर्तमान व भावी बाबती सरदेशमुखी प्रों हरसूल व सातारे व सरदेशमुखी हवेली औरंगाबाद गोसावी यांशीं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य.

स्ने॥ माधवराव नारायण प्रधान आर्शिर्वाद व नमस्कार सु॥ इहिदे तिसे न मयाव अलफ. शके १७१२ साधारण नाम संवत्सरे. वे॥ राजश्री रामचंद्र दीक्षित बिन वासुदेव दीक्षित उपनाम पाटणकर गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन याणीं हुजूर कसबे पुणे येथील मुकामीं येऊन विनंती केलीं कीं आपले बंधु गोविंद दीक्षित यांस सदरहु महालीं वर्षासन व पालखी बद्दल सालिना
रुपये १००० पालखीबद्दल ५०० वर्षासन.

---

१५००

येकुण पंधराशें रुपये पैकीं वजा लक्ष्मीनारायण दीक्षित पावतात. त्याप्रमाणें पावतील. सबब वजा रुपये २५० बाकी

१००० पालखी बद्दल २५० वर्षासन.

---

१२५०

येकूण साडे बाराशें रुपये सद्रहु प्रमाणें चालत आहेत. त्यास ते मृत्यु पावले. यास्तव स्वामीनी कृपाळु होऊन आपले नांवें करार करून देऊन भोगवटियास सनद करून दिल्ही पाहिजे ह्मणोन त्यावरून यांचे बंधु यास वर्षासन व पालखीची नेमणुक पावत होती. त्यास ते मृत्यु पावले. यास्तव यांचे चालविणें अवश्यक जाणोन याजवर कृपाळु होऊन यांचे नांवें सन तिसेना पासून पेशजी प्रमाणें वर्षासन व पालखी बद्दल मिळोन साडे बाराशें रुपये करार करून देऊन हें सनद सादर केली असे. तरी सद्रहु प्रमाणें साडे बाराशें रुपये महालानिहाय येथील बाबती सरदेशमुखीचे ऐवजी पाववीत जाणें. दरसाल ताजे सनदेचा अक्षेप न करणें. या सनदेची प्रति लिहून घेऊन हें सनद अस्सल यांजवळ भोगवटियास परतोन देणें. जाणिजे छ १२ रमजान आज्ञा प्रमाण.

---

## परिशिष्ट नं० २७, पृ० ५६.

( वासुदेव दीक्षित यांचे मृत्युबद्दल बाळाजी बाजीराव पेशवे यांचे पत्र. )

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री गोविंद दीक्षित स्वामीचे शेवेशीं

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार विनंती ऊपरी येथिल कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहित जावें विशेष. वेदशास्त्र संपन्न वासुदेव दीक्षित यांस देवाज्ञा जाल्याचें वर्तमान कळलें. फार वाईट वाटलें. आपण विवेकें करूनच श्रम परिहार केला पाहिजे. पूर्ववत चालेल किमपी कमीपणा होणार नाहीं. बहुत काय लिहिणें हें विनंती.

पो आश्विन वद्य १२ गुरुवार शके १६८२

---

## परिशिष्ट नं० २८, पृ० ५६.

( बाळकृष्ण दीक्षित दिल्लीस गेले समयीं त्यांचा सन्मान बादशहानीं केल्याबद्दल फारशीचा तरजुमा. )

श्री

तत्ववेत्ते वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव बाबा दीक्षित
आपली कृपा अक्षई असावी. स्वामीचे शेवेशी

सेवक बाळाजी बाजीराव पंत प्रधान कृतानेक सांा नमस्कार विज्ञापनाजे येथें क्षेम असोन आपले क्षेम कुशल अक्षयीं ईश्वरापाशीं इच्छित आहों. ऐकण्यांत आले कीं चिरंजीव रा॰ रघुनाथ बाजीराव व होळकर वगैरे लोक फौजे सहित दिल्ली मुक्कामीं पोहोचले. आह्मी ह्मणजे मी नबाब आसफजाह निजामन्मुल्क यांजला त्यांचा सत्कार चांगले रीतिनें त्यांचे संस्थाना योग्य ठेवणें विषईं लिहिलें होतें. त्याजवरून त्याणीं मा।र निल्हेची स्वारी येणेचा हुजूर आकदस फार मोठें यांजला सुचना केल्यावरून त्याणीं दीक्षित मा।रचें सत्काराविषयीं लिहिलें होतें. त्याजवरून नबाब आसफजाह लिहितात कीं जे वेळेस दीक्षित मजकुरची स्वारी देहलीस पोहोचली व ये विषईं हुजूरास सुचना जाली. हुजूरांनीं मजला त्यांचे घेऊन येणें करितां आज्ञा दिल्हे वरून मी तेच वेळेस हुजूराचे आज्ञेप्रमाणें मी सर्व गोष्टींची व्यवस्था ठेऊन त्याजला दिल्ली शहरांत घेऊन येऊन हुजूरास त्यांचे पेशवाई करितां सुचना केल्यावरून त्याणीं दरवाज्या पावेतों येऊन उभैतानीं एकमेकांचे हात धरून सत्कार केला. व हुजूरानीं दीक्षितांची स्तुती अशी केली कीं जसें आपण राजाशाहु छत्रपतीचें गुरू आहांत त्याप्रमाणें माझेही गुरु आहांत, व मोठे महाराजांनीं[१] अवरंगजेब याजला आ।शिर्वाद दिल्हा होता, त्याप्रमाणें राज्याची अभिवृद्धी जाली व आमचे

---

१ नारायण दीक्षितांनीं

मनांत ज्याप्रमाणें आमचे पैगंबराची जशी प्रतिष्टा आहे, त्याप्रमाणें आमचे वडिलांनीं आपला सत्कार ठेविला. व आपण मोठे समर्थ आहांत व आह्मांवर येथें येऊन कृपा करून दर्शन दिल्हे. याचे स्तवन करण्यास मी समर्थ नाहीं. व येणें करून माझें मस्तक आकाशास पोहोचले. सारांष याप्रमाणें भाषण होत राहिलें. व हुजूर यांणीं दीक्षित मजकुराचे आगमन अती अपूर्व समजून दीक्षित महाराजास पंधरा हजार रुपयाची जागीर नजराणा देऊन बादशाही फर्मान सनदा करून दिल्ह्या. व पोशाक व पालखी व खिल्लत जवाहीर ह्मणजे रत्नआलंकार व मोरचेल वगैरे सत्कार बहुत केला. व फार प्रकारें प्रार्थना केली. नवाब निजामन्मुल्क लिहितात कीं इत्की जागीर दीक्षितांचे योग्य नाहीं. कारण कीं त्याजवर परमेश्वराची कृपा अशी आहे कीं त्याजला कोणे गोष्टीची कमी नाहीं. व आपण दीक्षित महाराजांचे वंशस्थ आहांत व आपणासही कांहीं कमी नाहीं. व मी जे सेवा करितो ही राज्याचे अभिवृद्धिकरिता आहे. चिरंजीव रा॥ रघुनाथराव बाजीराव थोडे दिवसांत बनारस ह्मणजे काशीस येणार आहेत. व स्वस्थ आहेत. आपण कोणे गोष्टी विषईं चिंता करूं नये. अक्षई पत्रद्वारें संतोषवीत असावे हें विनंती.

---

## परिशिष्ट नं० २८–अ, पृ० ५६.

( बाळकृष्ण दीक्षितांचा दिल्लीचे बादशाहाकडून सन्मान झाल्याबद्दल. )

श्री

तीर्थस्वरूप राजश्री दादा स्वामी वडिलांचे सेवेशी.

अपत्य बाळकृष्ण दीक्षित साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम. ता॥ कार्तिक वद्य २ गुरुवार जाणून स्वकीय कुशल लेखन करावयाची आज्ञा केली पाहिजे. विशेष काशीतून स्वार होऊन श्रीमंत राजश्री

रघुनाथ पंत दादांचे भेटीस गेलो. वडिलांचे आशिर्वादें सर्वांशीं ओळखी भेटी जाहाल्या. चाळीस दिवस दिल्लीत होतो. श्रीमंतांनीं बहुत स्नेह कृपा केली. कांहीं मेळवावे ह्मणून गेलो नाहीं. उगेंच जावेसें चित्तांत आलें. दिल्ली शहर पाहावें निमित्य गेलों. आपले आशिरवादें सुखरूप घरास आश्विन शुद्ध १४ सोमवारीं आनंदरूप काशींत पावलों. कळलें पाहिजे. विशेष. वडिलांनीं त्रिंबक नाईक वगैरे यास कसबे सातारियाच्या बादशाही फरमानाविशीं लिहिलें होतें; त्यास वजिराचे आर्जी वरी दस्कत करून घेतलें. त्यास वडिलानीं जमीन जुमला किती, तनखा काय, परगणा कोण, तें पत्र लिहून दिल्लीस रवाना करावे. व आह्मास पालखी रा॥ रघुनाथपंत दादानीं व मोत्याचा चौकडा एक दिल्हा व तीन हजार रुपयाचा गांव एक दिल्हा. पादशाहा कडून पंधरा हजार रुपयाचें गांव काशी शिव-भुदानवली चंद्रोतीचे आलिकडे नेमून घेतलें. वडिलांचे अर्जीवरी दस्तक जाहाले. परवाने तयार एका मासा आलीकडे करून देतो ह्मणून निश्चय रा॥ रघुनाथ पंत दादानीं व होळकर याणीं व वकीलानीं सर्वानीं मान्य केलें आहे. या कामासाठीं सिद्धेश्वर महाशब्दे येथें ठेविला आहे. कळलें पाहिजे. विशेष हरिदास कृपाराम यांचे दुकान गडबडलें, परंतु वडिलांचे आशिर्वादें ठरलें आहे. लोकांचे रुपये देतो. दोन दिवस गडबड आह्मी आलो नव्हतो तों जाहाली. आतां आनंदरूप आहे. वडिलांच्या जोगची हुंड्या हजारियाबद्दल रुपये साहा हजार व हरिदास कृपाराम याजबद्दल रुपये चवतीस हजार लहण्या पाठविल्या आहेत. रुपये घेऊन पावलियाचा जाब पाठविला पाहिजे. व मनसा-रामानें हुंडी अठरा हजाराची वडिलांकडे पाठविली आहे. ते रुपये घेऊन अमानत ठेविलें पाहिजेत. आणि त्यास पावलियाचा जाब पाठविला पाहिजे. वरकड जे वर्तमान होईल ते मागाहून लेहून पाठवूं.

परवाना आलतमगा करून घेतले आहेत. त्यास तयार व्हावयासी एक वर्ष पाहेजे. बहूत काय लिहिणें हें बिनंती.

---

## परिशिष्ट नं० २९, पृ० ५६.

( बाळकृष्ण दीक्षित यांणीं काशीस सोमपूर्वक आधान केलें बद्दुल. )

श्री

पो चैत्र वद्य २ शुक्रवार शके १६७८ धातानामसंवछरे

तीर्थस्वरूप राजश्री दादा वडिलांचे शेवशी

अपत्ये बाळकृष्ण दीक्षित पाटणकर कृतानेक सां नमस्कार विनंती येथील क्षेम ताा फाल्गुण शुद्ध पुर्णिमा मंगळवार जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर सांप्रत वडिलांकडील आशिर्वाद पत्र येऊन वर्तमान कांहीं कळत नाहीं. तरी येणारा मनुष्या समागमे आशिर्वाद पत्र पाठविले पाहिजे. विशेष सोमपूर्वक आधान करावे हा हेत होता. तो वडिलांचे आदिर्वादें करून सिद्धितें पावला. फाल्गुण शुध ७ सोमवारीं घरीं आधान केलें. दुसरें दिवशीं मंगळवारीं शुध आष्टमीस त्रिलोचनीं सोम संकल्प केला. ते फाल्गुण शुद्ध ८ मंगळवारापासून शुद्ध १२ शनिवार पर्यंत पांच दिवस पावेतो अनुष्ठान जाहालें. द्वादशी शनिवार सूत्या करून संध्याकाळचें प्रहरा रात्रीस घरास आलो. कळलें पाहिजे.

अनुष्ठानास ब्राह्मण.

४ पहिल्या प्रयोगास.

१ चिरंजीव गोविंद दीक्षित अध्वर्यु.

१ भैरव दीक्षित टिळक. ब्रह्मे.

---

१ अल्तमगा ह्मणजे परंपरा.

१ विनायक दीक्षित चितळे. होते.
१ गणेश दीक्षित ओक. उद्गाते.

———

४

४ दुसऱ्या प्रयोगास.

१ शिद्धेश्वर देव. मैत्रावरूण.
१ गोपिनाथ भट जोगळेकर. ब्राह्मणा छंसी.
१ नारायण दीक्षित पटवर्धन. प्रतिप्रस्थाते.
१ आत्माराम भट करवे. प्रस्थोते.

———

४

४ तिसऱ्या प्रयोगास.

१ विनायक भट गाडगीळ. अछावक.
१ विनायक दीक्षित गुद्दगे. करमेष्टे.
१ प्रभाकर दीक्षित गडबोले. आग्नीध्र.
१ माहादेव भट साठे. प्रतिहोते.

———

४

४ चौथ्या प्रयोगास

१ वैजनाथ भट नवांके. ग्रावस्थोते.
१ आपा भट गद्रे. पोते.
१ माहादेव भट डोंगरे. ऊनेते.
१ नारायण भट लेले. सुब्रह्मण्य.

———

४

१ संभु भट तत्सत सदस्य. १ माहादेवदी॥बापट. सोम प्रवाक.
२ उपद्रष्टे. १ रामकृष्ण दी॥ गोडसे १ गोविंदराम दी॥ जोशी.

———

२०

येणेंप्रमाणें ब्राह्मण नांवनिशीवार.

मधुपर्कास दर ब्राह्मणास दिल्हे जिन्नस बिता.

१ पितांबर १ पामरी १ कासंडी १ तपेली १ पळी १ आसन १ आघ्यां १ पवित्र हस्तमात्रा मासे ३ १ कर्ण मात्रा कुडक्याची जोडी १ रुपया एक गोदान.

———

इतकें मधुपर्कास दिल्हे.

ऋत्विजास दक्षणा. गोदानास अर्धी मोहोरप्रमाणें गोदानें सुमार ११२ एकूण मोहोरा ५६

प्रारंभापासन समाप्तीपर्यंत सभेस प्रतिष्टित ब्राह्मण अग्निहोत्री व पंडित शास्त्री वैदिक व आणखी सर्व क्षेत्रस्थ आले त्यांस दिल्हे— धोतरजोडे १३० धोतरें २६०. रुपया व अधेली व सुक्या मिळून रू॥ ४०० भुरशी दक्षणा दर टके २ दोनप्रमाणें रुपये २७५.

येणेंप्रमाणें अनुष्ठान जाहलें. मधुपर्क व गोदाने व धोतरें व रुपये व अधेली व सुक्या व खुर्दा व किरकोळ साहित्य मिळून रुपये पांच हजार लागतील. कळले पाहिजे. विशेष इकडील वर्तमान तरी धारण प्रस्तु। तरी तांदुळ सोळा शेरापासून अठाविस शेर परियंत आहेत. गहु व चणे नवे तीस शेर. जव नव पासेऱ्या. तूप दोन शेर. तेल दिव्याचे पांच साडे पांच शेर प्रमाणें आहे.

आयुष्ये[illegible] याशीं व येथील अधिकारी याशीं हर्षामर्ष जाहला. यामुळें आ[illegible] चनाऊस येऊन आजी पंचविस दिवस बैसला

आहे. येथील अधिकारी पाहाडांत गंगापार आहे. अद्यापवरी सलूख नाहीं. होणार आहे. रयत दोही सैन्यामुळें लुटिली गेली. कळलें पाहिजे.

विशेष. तुह्मी हुंड्या केल्या होत्या. त्यास शंकर भारथी गोसावी याची हुंडी दहा हजारांची होती. त्यास झाडून रो भिकाजी ना मराठे यांचे मातिनें दिल्हे. वरकड किरकोळ हुंड्या आहेत. त्यापैकीं बहुत करून ऐवज घेतला. बाकी थोडा बहुत ज्याचा राहिला असेल तोही देऊं. एकुण हुंड्याचे रुपये ज्याचे त्यास दिल्हे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे नमस्कार.

चिरंजीव रामचंद्र दीक्षित व हरीहर दीक्षित यांस आशिर्वाद लोभ असो दिजे हे आशिर्वाद.

अपत्यें केशवाने चरणावर मस्तक ठेऊन शीर साष्टांग नमस्कार विनंती. गोविंद दीक्षितांही आध्वर्य उत्तम केलें. दुसरा यज्ञ जाहला. तर निरपेक्ष प्रयोग करीतील. प्रथमच आध्वर्य केलें परंतु उत्तम केलें. श्रोतीं सर्व पाहोन स्तुती केलीं. वडिलांचे पुण्य समर्थ आहे. उत्तम शोभाही जाहाली. सुज्ञाप्रती बहुत काय लिहिणें लोभ असो देणें हे विनंती.

---

## परिशिष्ट नं० २०, पृ० ५७.

(पानपतावर पेशव्यांचा पराजय झाल्यामुळें बाळकृष्ण दीक्षित हे काशी सोडून बाहेर गेल्याबद्दल.)

श्री (ता० २७।१।१७६१)

पो फाल्गुन वद्य १३ शुक्रवार शके १६८२ प्रा ग्वालदास कृपाराम

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंद दीक्षित पाटणकर यांप्रती

श्री वाराणशीहून बाळकृष्ण दीक्षित पाटणकर आशिर्वाद उपरी

येथील क्षेम ता। माघ[1] वद्य ८ बुधवार जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष. इकडिल वर्तमान तरी आह्मी समस्त सुखरूप असो विशेष. श्रीमंत राजश्री भाऊ सरदार व फौजेसह वर्तमान पाणिपतावरी होतें. अबदालीची फौजही आसपासजवळ ती चौ कासाचे अंतरें होती. त्याशीं पौष शुद्ध ८ स युद्ध उभयतां मध्यें भारी जाहालें. प्रातःकालापासून संध्याकाळपर्यंत युद्ध जाहालें उभयपक्षीं लोक बहुत पडले. शेवट श्रीमंताचा मोड जाहला. तमाम सैन्य जें राहिलें तें पळालें. बुनगें लुटिलें. ऐशी खबर लखनऊस आली. लखनउस खुशाली जाहाली. लखनऊचे लिहिलें येथील अधिकारी याशीं आलें कीं बारगीर सर्व मारिले गेले. कांहीं पळाले. ऐशीं खबर आदितवारी पंचमीस संध्याकाळचे सहा घटका रात्रीस कळली. त्याउपरांतिक सोमवारीचे पाहाटेचे साहाघटिका रात्रीस आह्मास खबर मुख्यांनें[2] दिल्ही कीं रात्रीची खबर खरी आहे. तुह्मी सावध राहणें. तेच समईं आह्मी दोघी बायका घेऊन व रो बापुजीपंत व भिऊबाई व केशव दीक्षित पाटणकर व त्याची स्त्री ऐशी तेच वेळेस गंगापर होऊन राम नगरास गेलो. दिवस उगवल्या सोमवार. तेथें सोम मंगळ दोन दिवस होतो. तेथूनही पुढें आणखीं स्थलीं जाणार आहों. जेथें राहुं तेथून पत्र लेहून पाठऊन देऊं. घरीं एक ह्मातारी व अंतोबा. दोघे ब्राह्मण मात्र रक्षण ठेविले आहेत. याप्रकारचे वर्तमान जाहालें. हरिभक्त शिकस्त खाऊन पळाले. परंतु कोणाची काय गत जाहाली, पळाले कोण, हें कांहीं खबर नाहीं. मोड होऊन पळाले, ही खबर सत्य आहे. बरगें पळाले हें खरें. ऐसें दुसरेंही वर्तमान. कालीं मंगळवारीं काशीकर ब्राह्मण लष्करांत होते.

---

